# भारतीय तत्त्वज्ञान

अथवा

# राष्ट्रधर्म

लेखक

डॉ. पुरुषोत्तम गणेश सहस्रबुद्धे

एम.ए.;पीएच.डी.

कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे

# भारतीय तत्त्वज्ञान

अथवा

# राष्ट्रधर्म

लेखक

डॉ. पुरुषोत्तम गणेश सहस्रबुद्धे

एम.ए.; पीएच.डी.

कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे

प्रकाशक :

अ. अं. कुलकर्णी
कॉन्टिनेन्टल प्रकाशन,
टिळक रोड, पुणे २.

सर्व हक्क सुरक्षित
प्रथमावृत्ती : फेब्रुवारी १९६५
किंमत : तीन रुपये

मुद्रक :

शा. चं. आगाशे
श्री शिवाजी प्रिंटिंग वर्क्स,
४९५/४९६ शनिवार, पुणे २

गुरुवर्य प्रा. श्री. म. माटे
यांस
आपण
मला विचार करण्यास शिकविले.

# प्रस्तावना

'महाभारतातील तत्त्वज्ञान अथवा राष्ट्रधर्म' असे या प्रबंधाला नाव दिले आहे ते पूर्ण सार्थ आहे. राष्ट्राच्या अभ्युदयाला अत्यंत अवश्य अशीच ही तत्त्वे, हे सिद्धांत व ही मते आहेत. ऐहिक प्रपंचाचा विचार, ती तत्त्वे सांगणाऱ्या पंडितांनी, जेवढा केला होता त्याच्या शतांश जरी पुढल्या काळात, विशेषतः इ. स. १००० वर्षानंतरच्या काळात येथल्या पंडितांनी केला असता तरी भारताची दुर्दशा झाली नसती. पण दुर्दैव असे की त्या काळात स्वतंत्रपणे तर कोणी समाजचिंतन केले नाहीच पण महाभारताचाही नीट अभ्यास केला नाही. पाश्चात्त्य विद्या येथे येईपर्यंत देशी भाषांत महाभारतातील तत्त्वज्ञान अवतरलेच नाही. या भाषांना रस होता तो त्यांतील रामकृष्णांच्या अद्भुत लीलांमध्ये ! त्यांतील समतेचे तत्त्वज्ञान, प्रयत्नवाद, धनाचे—कृषिगोरक्ष्यवाणिज्याचे—महत्त्व, राजधर्माचे श्रेष्ठत्व, बुद्धिप्रामाण्य, व्यवहारवाद यांची त्यांनी संपूर्ण उपेक्षाच केली. या तत्त्वांची महती जाणण्याची ऐपतच त्या काळात भारतातून नाहीशी झाली होती. अत्यंत खेदाची गोष्ट म्हणजे समाजाच्या प्रगतिपरागतीकडे पाहून आपल्या मूलतत्त्वांची काही चिकित्सा करावयाची असते, त्यांचे गुरुलाघव अनुभवाशी पडताळून पाहावयाचे असते हा विचारच भारतात या काळात कधी प्रभावी झाला नाही. त्यामुळे दारिद्य, अज्ञान, समाजविन्मुखता व पारतंत्र्य हेच आपल्या नाशिबी कायमचे लिहून ठेविले गेले. रजपूत, विजयनगर, मराठे, शीख यांनी या दृष्टीने काही प्रयत्न केले, पण स्थिर असे कोणतेच तत्त्वज्ञान त्यांनी अंगीकारलेले नव्हते. सामाजिक क्रान्तीचे तर त्यांनी प्रयत्नही केले नाहीत. त्यामुळे त्यांचे यश अल्पजीवी व मर्यादितच ठरले.

ब्रिटिश विद्येच्या प्रसारानंतर आपण त्या अंध, मूढ अशा अवस्थेतून काहीसे मुक्त झालो हे खरे. पण गांधीयुगापासून पुन्हा आपल्या राष्ट्रीय प्रपंचात एकांतिक तत्त्वनिष्ठा, अवास्तव विचारसरणी, व्यवहारशून्य दृष्टिकोण, ज्ञानोपासनेची उपेक्षा, शत्रुमित्रांतील विवेकहीनता,

प्रस्तावना

साध्यसाधनांतील तारतम्यहीनता, नकली दारिद्र्यप्रेम या घातक दोषांचा प्रादुर्भाव झाला आणि आजही त्यांचा जोर फारसा कमी झालेला नाही. अशा वेळी महाभारतातील राष्ट्रधर्मांच्या सिद्धांतांचा आपण अभ्यास केला व निष्ठेने त्यांचे पालन केले तर वास्तव, व्यवहारी दृष्टी आपल्याला पुन्हा लाभण्याचा संभव आहे.

धर्म हे साध्य नसून समाजाच्या उत्कर्षाचे साधन आहे, मनुष्याची योग्यता जन्मावरून ठरविण्यापेक्षा त्याच्या गुणांवरून ठरवावी, कृतयुग वा कलियुग हे राजसत्ताधाऱ्यांच्या कर्तृत्वावर अवलंबून असते आणि मोक्ष हे अंतिम साध्य असले तरी ऐहिक राष्ट्रीय प्रपंचाच्या वैभवाकडे कदापि दुर्लक्ष होता कामा नये, हे ते सिद्धांत आहेत. वेदव्यासांच्या आशीर्वादाने आपल्या समाजाला त्यांचा अभ्यास व प्रतिपालन करण्याची बुद्धी होवो अशी शुभेच्छा प्रगट करून ही प्रस्तावना संपवितो.

हा प्रबंध लेखमालेच्या रूपाने प्रथम मार्च, एप्रिल, मे व जुलै १९६१ या महिन्यांच्या 'वसंत'च्या अंकात प्रसिद्ध झाला. तो आता पुस्तकरूपाने प्रसिद्ध होत आहे. भाषांतररूपाने तो हिंदीत प्रसिद्ध व्हावा असे बरेच दिवस मनात होते. पण इतके दिवस जमत नव्हते. आता सुदैवाने ते साधले आहे. 'राष्ट्रधर्म' – लखनौ – संपादक – रामशंकर अग्निहोत्री, या मासिकात व 'रविवासरीय युगधर्म' – नागपूर, जबलपूर, रायपूर, – संपादक – सत्यपाल पटाइत – या साप्ताहिकात हा प्रबंध क्रमशः प्रसिद्ध होत आहे.

माझे मित्र श्री. अनंतराव कुलकर्णी यांनी या प्रबंधाच्या प्रकाशनाची जोखीम हौसेने अंगावर घेतली याबद्दल मी त्यांचा ऋणी आहे.

पु. ग. सहस्रबुद्धे

## अनुक्रम


| | | |
|---|---|---|
| १ | महाभारतातील धर्मशास्त्र | १ |
| २ | महाभारतातील समाजकारण | ३२ |
| ३ | महाभारतातील व्यवहारनीती अथवा राजनीतिशास्त्र | ६१ |
| ४ | महाभारतातील प्रवृत्तिधर्म | १०२ |

# १. महाभारतातील धर्मशास्त्र

## प्रस्तावना

प्रत्येक राष्ट्राच्या संसारामागे त्यांचे एक स्वतंत्र असे तत्त्वज्ञान असते. नीती, राजकारण, धर्म, इहपरलोकींचे यश, स्वकीय परकीय यांशी वागणूक, ध्येय-व्यवहार यांच्या मर्यादा, व्यक्ती व समाज यांचे परस्परांशी संबंध यासंबंधीचे काही सिद्धान्त त्या त्या राष्ट्रातील थोर पुरुषांनी निश्चित केलेले असतात; आणि साधारणतः त्यांचे व त्यांच्या राष्ट्रातील बहुजन समाजाचे वर्तन त्या धोरणाने होत असते. हे जे निश्चित झालेले सिद्धान्त त्यांचे समर्थनहि त्या विचारी पुरुषांनी केलेले असते. हेच सिद्धान्त ग्राह्य का, इतर त्याज्य का, यानेच आपल्या समाजाचे कल्याण कसे होईल, ते सोडल्याने नाश कसा होईल यासंबंधी ते नित्य मीमांसा करीत असतात व लोकांना ती पटवून देत असतात. हे जे त्या त्या राष्ट्रातील विचारी पुरुषांनी निश्चित केलेले सिद्धान्त, त्यांचे समर्थन व त्यांची मीमांसा या सर्वाला त्या राष्ट्राचे तत्त्वज्ञान असे म्हणतात.

माणसाचा पराक्रम रक्तावर अवलंबून असतो, या रक्तात नॉर्डिक रक्त श्रेष्ठ आहे, या रक्ताचे लोक ते श्रेष्ठ, बाकीचे हीन, म्हणून

त्यांच्यांत व इतरांत विवाह होऊ नयेत असे हिटलरच्या जर्मनीत सांगत असत. त्याचप्रमाणे लोकशाही ही विघातक असून एकशाही हीच श्रेष्ठ होय, प्रत्येक युगात कोणी तरी श्रेष्ठ नेता निर्माण होतच असतो, त्याच्यामागे बिनतक्रार सर्वांनी जाणे यातच राष्ट्राचे कल्याण आहे, असेही तेथे शिकविले जात असे. हे सर्व जर्मनीचे त्या काळी राष्ट्रीय तत्त्वज्ञान होते. रशियाचे तत्त्वज्ञान निराळे आहे. रक्तावर काहीच अवलंबून नाही, अर्थ-निर्मितीची साधने समाजाच्या संस्कृतीचे नियमन करतात; वंश, धर्म ही सर्व स्वार्थी लोकांनी माजविलेली ढोंगे आहेत, ती नष्ट करून त्यांमुळे निर्माण झालेले वर्गही नष्ट केले व वर्गविहीन समाज केला तर मानवाची प्रगती होईल अन्यथा होणार नाही, असे सिद्धान्त रशियात सांगितले जातात. त्याचप्रमाणे फ्रेंच, जर्मन, इटालियन, असले राष्ट्रवार विभाग करणे चूक असून भांडवलदार व कामगार असे जगात दोनच वर्ग असतात, तेव्हा जगातल्या कामगारांनी राष्ट्रविचार मनात न आणता सर्वांनी एक झाले पाहिजे असा विचार तेथे सांगितला जातो. हे सर्व रशियाचे तत्त्वज्ञान आहे. फ्रेंच राज्यक्रान्तीच्या आधी, राजशाही, जन्मजात उच्चनीचता हे तत्त्वज्ञान प्रचलित होते, तर राज्यक्रान्तीने समता, बंधुता, स्वातंत्र्य हे तत्त्वज्ञान प्रचलित केले व ते प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला. फ्रेंच राष्ट्राचे आजही तेच तत्त्वज्ञान आहे.

साधारणतः प्रत्येक राष्ट्राचे असेच काही तरी तत्त्वज्ञान ठरलेले असते आणि त्यातील सिद्धान्ताप्रमाणे – त्याचा अर्थ ज्याला जसा समजेल त्याप्रमाणे – त्या देशातील बहुजनसमाज वागत असतो. हे तत्त्वज्ञान म्हणजे राष्ट्राच्या उत्कर्षासंबंधी त्या त्या देशातील तत्त्ववेत्त्यांनी स्वतःच्या समजुतीप्रमाणे ठरविलेले सिद्धान्तच असल्यामुळे त्या तत्त्वज्ञानावर राष्ट्राचे भवितव्य अवलंबून असते असे म्हणण्यास

चिंता नाही. अर्थात बहुजनसमाज जोपर्यंत त्या तत्त्वज्ञानाप्रमाणे वागत आहे तोपर्यंतच ते तत्त्वज्ञान निर्णायक ठरणार हे उघड आहे. पुष्कळ वेळा माणसे ग्रंथात किंवा बुद्धिवादात एक तत्त्वज्ञान मान्य करून आचारात अगदी भलतेच तत्त्वज्ञान अनुसरत असतात. अशा वेळी हा विचार अर्थातच फोल ठरेल. पुष्कळ वेळा दोन राष्ट्रांचे तत्त्वज्ञान एकच असून माणसांची त्यावरील निष्ठा कमी-अधिक प्रमाणात तीव्र असते. त्यामुळेही राष्ट्राच्या भवितव्यात फरक पडत जातो. या सर्व मर्यादा ध्यानात घेणे अवश्यच आहे. पण त्या घेऊनही एवढा विचार निश्चित उरेल की, ज्या अनेक गोष्टींवर राष्ट्राचा उत्कर्षापकर्ष अवलंबून असतो त्यांत तत्त्वज्ञान ही प्रधान गोष्ट आहे.

माणसे कार्याकार्य ठरविताना स्वतःची बुद्धी वापरतात का सर्वस्वी धर्मग्रंथाच्या आहारी जातात यावर राष्ट्राचे भवितव्य अवलंबून आहे हे मान्य केलेच पाहिजे. उच्चनीचता जन्मावर आहे की गुणावर आहे यासंबंधी जो सिद्धान्त राष्ट्राने अंगीकारलेला असेल त्यावर त्याची उन्नती-अवनती काही अंशी अवलंबून राहाणारच. 'व्यक्तीचे हक्क' या कल्पनेचे फाजील स्तोम माजविलेले असेल किंवा व्यक्तीला मुळात हक्कच नाहीत, ती सर्वस्वी समाजासाठी आहे. ही कल्पना फार मूळ धरून असेल, तर त्याप्रमाणे समाजाला वळण लागल्यावाचून राहाणार नाही. माणसांची निष्ठा, कर्तृत्व, कुशल नेत्याची जोड मिळणे, आर्थिक स्थिती इत्यादी इतर अनेक घटक हे आपापल्यापरी निर्णायक होतातच-पण या निर्णायक घटकांत त्या त्या राष्ट्राने अंगीकारलेले तत्त्वज्ञान हा एक घटक निश्चित आहे हे मान्य केले पाहिजे.

राष्ट्राच्या भवितव्यनिर्णयात अतिशय महत्त्वाचे स्थान असलेले

असे जे तत्त्वज्ञान त्या तत्त्वज्ञानाचे आपल्या भरतभूमीत महाभारत-काळी काय रूप होते ते प्रस्तुत प्रबंधात सांगावयाचे आहे. सध्या या भूमीला फार दुर्गती प्राप्त झालेली आहे. तेव्हा इतर अनेक कारणांबरोबर तिने पत्करलेल्या तत्त्वज्ञानात फार अपसिद्धांत असले पाहिजेत असे अनुमान करण्यास तरी हरकत नाही. आणि याच दृष्टीने जो काळ या भूमीला अत्यंत वैभवाचा, भाग्याचा, उत्कर्षाचा व दिगंत कीर्तीचा असा होऊन गेला त्या काळचे तत्त्वज्ञान सध्याच्यापेक्षा श्रेष्ठ असले पाहिजे असा विचार मनात आल्यास त्याला या मीमांसेत स्थान प्राप्त व्हावे यात काही अनुचित नाही. आणि अशा विचाराने आपण महाभारत हा आपला राष्ट्रीय ग्रंथ उचलून घेऊन त्याचे अध्ययन करू लागलो तर आपले अनुमान अगदी योग्य असून त्या वेळचे तत्त्वज्ञान समाजाच्या उन्नतीला सर्वथा उपकारक, अत्यंत उदात्त व पराक्रम, विजिगीषुवृत्ती, यांना प्रेरणा देऊन राष्ट्राला यश, वैभव व कीर्ती प्राप्त करून देण्यास समर्थ असेच होते असे आपल्या ध्यानात येते.

समाजाला वैभवाला नेण्यास समर्थ असे हे तत्त्वज्ञान महाभारतात सापडते यामुळे त्याला विशेषच महत्त्व प्राप्त होते. महाभारत, हा आपला राष्ट्रीय ग्रंथ आहे. या भरतखंडाच्या चारी सीमांच्या आत असा एकही हिंदुसमाज, जाती किंवा व्यक्ती सापडणार नाही की जिच्यावर महाभारतातील विचारांचा, तत्त्व-ज्ञानाचा, धर्ममतांचा, कथांचा संस्कार झालेला नाही. वेद, उपनिषदे हे थोर ग्रंथ या भूमीतलेच आहेत. त्यांचा महाभारता-इतकाच अभिमान येथले पंडित बाळगतात. पण ते खऱ्या अर्थाने राष्ट्रीय ग्रंथ होऊ शकणार नाहीत. कारण समाजातील सर्व वर्ण, सर्व जाती, सर्व स्त्री-पुरुष, सर्व बाल-तरुण-वृद्ध महाभारताच्या

कक्षेत जसे येतात तसे त्या ग्रंथाच्या कक्षेत येत नाहीत. महाभारताचे संस्कार हिंदुमात्राच्या आचारात, विचारात, गृहव्यवस्थेत नीतीच्या कल्पनेत, खाजगी वर्तनात, जाहीर वर्तनात, रक्ताच्या बिंदूबिंदूमध्ये सापडतील. यातच त्या ग्रंथाची थोरवी आहे आणि म्हणूनच तो राष्ट्रीय ग्रंथ आहे.

आणि हे भारतीय तत्त्वज्ञानाचे व भारतीय तत्त्ववेत्त्यांचे संस्कार थोडीथोडकी नव्हे तर आज दोन हजार वर्षे आमच्या मनावर होत आहेत. प्रत्यक्ष भारतीय युद्ध इ. स. पूर्वी ३१०१ या वर्षी झाले. त्या सुमारास प्रथम वेदव्यासांनी 'जय' नावाचा ग्रंथ लिहिला. त्यात फक्त भारतीय युद्धाचे वर्णन केलेले आहे. त्यानंतर त्यांचा शिष्य वैशंपायन याने बहुधा त्यांच्या सान्निध्यातच, त्या जय ग्रंथात सर्व भरतकुळाचा इतिहास घालून तो ग्रंथ २४००० श्लोकांपर्यंत वाढविला व त्याला 'भारत' असे नाव दिले. त्यानंतर जवळ जवळ अडीच हजार वर्षांनी म्हणजे सुमारे इ. स. पू. २५० वर्षे याकाली लोमहर्षण नावाच्या महापंडिताने त्या ग्रंथात त्याच्या काळचे अनेक तत्त्वज्ञानाचे पंथ, धर्मपंथ, नीतितत्त्वे, थोर पुरुषांच्या कथा यांची सुमारे ७५००० श्लोकांची भर घालून सध्याचे रूप त्या ग्रंथाला देऊन 'महाभारत' असे त्याचे नामकरण केले. या रूपात आल्यानंतर दोनतीनशे वर्षांच्या अवधीतच हा ग्रंथ सर्व भरतखंडात पसरून मान्यता पावला. इ. स. ५० या सुमारास इकडे आलेल्या एका डायन क्रायसोस्टोम नावाच्या ग्रीक प्रवाशाने या लक्षश्लोकी ग्रंथाचा उल्लेख केलेला आहे. हा ग्रंथ त्याला पांड्य, केरल या मद्रास इलाख्यातील दक्षिणेकडच्या राज्यात आढळला. यावरून आज दोन हजार वर्षे हा ग्रंथराज भरतखंडातील या भूमीच्या पुत्रांच्या मनांवर अधिराज्य गाजवीत आहे असे म्हणण्यास हरकत नाही.

यानंतरच्या काळात भरतखंडातील भिन्न प्रांतांत अनेक थोर पुरुष होऊन गेले. त्यांनी पराक्रमही केले आणि त्यांतील तत्त्ववेत्त्यांनी थोर असे ग्रंथही लिहिले, पण अखिल भारतीय अधिराज्य त्यांतील कोणालाच प्राप्त झाले नाही. म्हणूनच राष्ट्रीय दृष्टीने विचार करता भारतीयांनी महाभारताचे महत्त्व फारच मानले पाहिजे. माणूस त्रिचनापल्लीचा असो, काश्मीरचा असो, सिंधमधील असो की आसाममधील असो, तेलगू, तामीळ ही त्याची मातृभाषा असो की हिंदी किंवा बंगाली असो, त्याला महाभारताबद्दल सारखाच जिव्हाळा वाटतो. हे भिन्न प्रांतीय व भिन्नभाषी लोक एकत्र आले तर त्यांना सर्वांना एकजीव करणारा पुरुष म्हणजे श्रीकृष्ण हाच आहे आणि त्यांचे भीम, अर्जुन, अभिमन्यू हेच शौर्याचे आदर्श आहेत. या व्यक्तींच्या स्मृति अजूनही इतक्या उज्ज्वल व प्रभावी आहेत की, यांच्या स्मरणाने आजही अगदी दूरच्या प्रांतातील भारतीयांना एकमेकांच्याजवळ आल्यासारखे वाटते.

असा हा राष्ट्रीय ग्रंथ म्हणजे एक काल्पनिक कथांचे भारूड नसून एक जिवंत इतिहासग्रंथ आहे ही विशेष भाग्याची गोष्ट आहे. महाभारतात अनेक अद्भुत, अमानुष, दैवी अशा घटना वर्णिलेल्या आहेत. आणि त्या वातावरणात इतरही कथा सापडून दूषित झाल्या आहेत. पण या कथा वगळल्या, व इतर कथांवर आलेले पटल दूर करून आपण जाणत्या दृष्टीने न्याहाळून पाहू लागलो की कठोर तर्कदृष्टीला पटणारा, वाटेल त्या कसोटीला उतरणारा, प्रमाणांनी सिद्ध होणारा असा शुद्ध इतिहास आपल्या हाती लागतो.

पुष्कळ वेळा राष्ट्रामध्ये सद्गुणसंवर्धन व्हावे म्हणून तेथील तत्त्ववेत्ते अनेक प्रकारच्या काल्पनिक कथा रचून त्यांचा प्रसार

करतात. सत्याने वागल्यास शेवटी सुख निश्चित मिळते, परमेश्वराची भक्ती केली तर तो भक्ताच्या कुटुंबीयांना अंतर देत नाही, परोपकार करणाराला नेहमी उत्तम लोक प्राप्त होतो, नीच वर्तन करणारास त्याचे प्रायश्चित्त मिळाल्याखेरीज रहात नाही इत्यादी तत्त्वे बहुजन समाजाला कळावी व त्याने ती आचरावी म्हणून अनेक प्रकारच्या कथा रचल्या जातात व त्यांत तशी तशी बरीवाईट फळे परमेश्वराने दिली अशी वर्णने केलेली असतात. आपल्या पुराणांतल्या अनेक कथा व संतवाङ्मयातल्या कथा याच जातीच्या आहेत. सद्गुण-संवर्धनासाठी रचलेल्या त्या काल्पनिक व अद्भुत अशा कथा आहेत. महाभारतातील कौरवपांडवांच्या, श्रीकृष्णाच्या कथाही अशा काल्पनिक कथा आहेत असे रमेशचंद्र दत्त, वेबरप्रभृती काही पंडितांचे मत आहे.

भारतातील या कथांवर स्वप्नातही करणे अशक्य असा जर एखादा आरोप असेल तर हा होय. नीतितत्त्वांच्या प्रसारासाठी काही तरी काल्पनिक लिहावयाचे असते तर व्यासांनी द्रौपदीला या सर्व आख्यानाची नायिका केली नसती. पाच पतींना वरणारी, भर सभेत परपुरुषाच्या स्पर्शाने दूषित होणारी अशी ही स्त्री सद्गुणसंवर्धनासाठी निर्माण केली आहे असे म्हणणे म्हणजे अर्थाचा अनर्थ करण्यासारखे आहे. द्रौपदीची भारतातील स्वभावरेखा ही एक दिव्य व अलौकिक रेखा आहे. अरण्यात पतीबरोबर कष्ट सहन करण्यात तिने दाखविलेले धैर्य, तिच्या बोलण्यातून दिसून येणारी तिची बुद्धिमत्ता व विवेचक दृष्टी, तिची पतिनिष्ठा या सर्व गुणांनी ही मानिनी कोणी शापभ्रष्ट देवता आहे असे वाटते. असे हे स्वभावचित्र जर काल्पनिक असते तर लेखकाने तिच्या अंगी वरील वैगुण्ये चिकटविली

नसती. पण त्यांचाही त्याने उल्लेख केला आहे यावरूनच ही कृती काल्पनिक नसून ऐतिहासिक आहे या म्हणण्यात शंका राहात नाही. सद्गुणांच्या गोष्टींत मध्यंतरी संकटे आली तरी शेवटी सर्व गोड झाले असे दाखविणे अवश्य असते. एरवी माणसे कोणत्या विलोभनाने सद्गुणांचे आचरण करणार? पण येथे काय प्रकार आहे? या स्त्रीला अंती फल काय मिळाले? तिचे पाचही पुत्र शत्रूने चिरून टाकले, भावाला यज्ञीय पशूसारखा बुकलून ठार मारला आणि पुढे सगळा निर्वंश होण्याची पाळी आली.

नीतिबोधाच्या चौकटीत स्वतः श्रीकृष्णाचे चरित्रसुद्धा बसणार नाही. या वीराने कंसाचा वध केला येथवर ठीक आहे. पण पुढे त्यानेच आपली फजिती कशी झाली त्याचे जे वर्णन केलेले आहे ते त्याच्या देवपणाशी अगदीच विसंगत आहे. जरासंधाच्या पराक्रमाचे धर्मराजाजवळ वर्णन करताना श्रीकृष्ण म्हणाला, 'युधिष्ठिरा, जरासंधाने भोजकुलातील सर्व क्षत्रियांची राज्यलक्ष्मी हरण केलेली आम्ही पाहिली. आणि त्याच्या भयाने आम्ही मथुरा देश सोडला व द्वारकेस पळून गेलो. आमची एकंदर अठरा राजकुले होती. पण आमच्या असे ध्यानात आले की, आम्ही सर्व आपल्या सर्व सामर्थ्यानिशी जरासंधाशी तीनशे वर्षे जरी झुंजलो तरी त्याचा पराभव होणार नाही. तेव्हा घाबरून जाऊन आम्ही पश्चिमेस पळून गेलो व द्वारका नगरी वसविली. तेथे भक्कम दुर्ग बांधले व पुत्रकलत्रासह तेथे राहिलो, तेव्हा आम्ही निर्भय झालो.'

कल्पनेने निर्माण केलेल्या अद्भुत दैवी पुरुषाला हे बोलणे कसे शोभेल! श्रीकृष्णाचा अंतही सद्गुणांच्या फळाला शोभेसा झाला

नाही. शेवटी यादववीर त्याच्या आज्ञेत राहीनासे झाले, खुद्द त्याचा पुत्र प्रद्युम्न व सेनापती सात्यकी हे मद्य पिऊन उन्मत्त झाले, म्हणून श्रीकृष्ण अरण्यात निघून गेला. तेथे एका व्याधाच्या बाणाने त्याला मृत्यू आला. त्यानंतर त्याच्या स्त्रियांची फारच विटंबना झाली. अर्जुन त्यांना घेऊन हस्तिनापुरास जात असताना त्या स्त्रियांना रानटी लोकांनी पळवून नेले व काही स्त्रिया स्वखुषीने त्यांच्याबरोबर गेल्या. अर्जुन एवढा पराक्रमी पण त्याचे काही चालले नाही. हा हृदयद्रावक शेवट कोणचा नीतिबोध करण्यास समर्थ आहे. या घटना म्हणजे कठोर सत्ये आहेत. भूतार्थ आहेत. मृत्युलोकीची जाणीव करून देणाऱ्या त्या इंगळ्या आहेत. ती सद्‌गुणाचरणाची रम्य विलोभने मुळीच नाहीत

महाभारतात अशा अनेक कथा आहेत. खुद्द व्यासांचा जन्म, द्रोण, कश्यप इत्यादी व्यक्तींचे जन्म, अभिमन्यूचा मृत्यू, पांडवांची विजयानंतरची स्थिती, कुंती-रुक्मिणी या स्त्रियांची अंतकाळची स्थिती या घटना इतिहास म्हणूनच स्वीकारल्या पाहिजेत. भारतीय लेखक मोठे निर्भय पुरुष होते. काही तरी गुलाबी कथा सांगून लोकांची दिशाभूल करावी असा त्यांचा मुळीच हेतू नव्हता. कठोर सत्यानेच समाजाची प्रगती होत असते, सत्य इतिहास हीच समाजाची ठेव आहे, हे ते जाणून होते. त्या काळच्या लोकस्थितीला अनुसरून स्वतःच्या ज्ञानाच्या मर्यादेप्रमाणे त्यांनी काही काल्पनिक कथाही आपल्या ग्रंथात गोवल्या असल्या तरी त्यामुळे सर्वच कथा तशा आहेत असे म्हणणे सर्वथैव प्रमाणशून्य आहे. मूळ कथा शुद्ध स्वरूपात पाहिली तर तो इतिहास आहे याविषयी लेखकाच्या मनात बिलकुल संदेह नव्हता असे दिसते व म्हणूनच तो आपल्या मनात राहू देणे हे योग्य नाही.

अशा या इतिहासग्रंथातले जे तत्त्वज्ञान पुढे सांगावयाचे आहे त्याचा प्रणेता म्हणजे प्रख्यात भारती पुरुष श्रीकृष्ण हा होय. महाभारताला कार्ष्ण ( श्रीकृष्णाचा ) वेद म्हणतात ते अगदी यथार्थ आहे. श्रीकृष्णाइतका प्रगल्भ बुद्धीचा, कर्तृत्वशाली, प्रज्ञावंत, व्यवहारकुशल, ज्ञानी व पराक्रमी पुरुष अजूनही साऱ्या त्रिभुवनात झाला नाही असे म्हटले तर, ज्याने महाभारत स्वतः वाचले आहे अशा माणसाला, मुळीच अतिशयोक्ती वाटणार नाही. हा जसा तत्त्ववेत्ता होता तसाच कर्ताही होता, ध्येयवादी होता तसाच व्यवहाराच्या व ध्येयाच्या मर्यादा जाणण्यात चतुर होता, सत्यनिष्ठेचा तो जसा उपदेश करी तसाच कुटिल राजनीतीचाही करी, आणि तो संसारप्रिय होता तसाच संयमी योगेश्वरही होता. सारांश, प्राचीन भारती संस्कृती म्हणजेच श्रीकृष्ण आणि श्रीकृष्ण म्हणजेच प्राचीन भारती संस्कृती असे अनन्वयाने बोलणे सर्वथैव युक्त आहे.

भारतीय तत्त्वज्ञान म्हणून जे विवेचन आता पुढे यावयाचे आहे त्यात महाभारतातील धर्मकारण, समाजकारण, व्यवहारनीती व प्रवृत्तिधर्म या विषयांवरील अनेक पुरुषांचे विचार संकलित करून दिलेले आहेत. श्रीकृष्णाचे विचार तर यात आहेतच पण त्याशिवाय भीष्म, नारद, पराशर, मार्कंडेय, धर्म, अर्जुन, भीम, कुंती, द्रौपदी, विदुला, इत्यादी अनेक थोर व्यक्तींनी वरील विषयांवर सांगितलेले विचार दिलेले आहेत. आणि हे आग्रहाने प्रतिपादन करण्यामध्ये हेतू असा आहे की, समाजाच्या धारणेला व उत्कर्षाला अत्यंत पोषक असेच हे तत्त्वज्ञान आहे, हे सध्याचा हिंदुसमाजाच्या निदर्शनास आणावे. माझे तर स्पष्ट असे मत झाले आहे की, हे भारतीय तत्त्वज्ञान या भारती समाजाने दृष्टी-

आड केले नसते तर त्याचा अधःपात झालाच नसता. आणि आजही त्यातले प्रत्येक तत्त्व अनुकरणीय म्हणून मी सांगणार नसलो तरी त्यातील मूळ गाभा हा जशाच्या तसा समाजापुढे समाजधारणेचे शास्त्र म्हणून ठेवण्यास काहीच प्रत्यवाय नाही.

धर्मशास्त्र, समाजकारण, व्यवहारनीती व प्रवृत्तिधर्म या विषयांसंबंधी जे विचार ' भारतीय तत्त्वज्ञान ' म्हणून पुढे दिले आहेत त्याशिवाय अन्य विचार महाभारतात नाहीत असे नाही. पुष्कळ ठिकाणी येथे सांगितलेल्या विचारांच्या उलट असेही विचार महाभारतात सापडतात. असे असताना हेच तत्त्वज्ञान म्हणजे भारतीय तत्त्वज्ञान असा आग्रह का धरावा असा प्रश्न येईल. त्याचे समाधान असे की, एक तर मी जे तत्त्वज्ञान सांगणार आहे ते सर्व प्रपंचाविषयीचे विज्ञान आहे आणि ऐहिक वैभवाचा परमोत्कर्ष साधला तरच निःश्रेयसप्राप्ती होते असा महाभारताचा प्रमुख सिद्धांत आहे. तेव्हा या विचाराविरुद्ध असे विचार भारतात कोठे आले तर ते त्या त्या व्यक्तीचे म्हणून ठरतील. त्यांना भारतीय विचार म्हणता येणार नाही. दुसरे असे की, प्रपंचाचा अभिमान धरून, म्हणजे मुख्य सिद्धांत मान्य करून ज्यांनी ज्यांनी तत्त्वज्ञान सांगितले आहे त्यांच्या भाषणांत पुढे दिलेल्या विचारांना विरोधी अशी वचने फार थोडी सापडतील. अगदी एकांतिक मोक्षवादी माणसांची गोष्ट निराळी. ही दोन कारणे झाली. पुढील तत्त्वज्ञान हेच भारतीय तत्त्वज्ञान असे म्हणण्याचे तिसरे व प्रधान कारण हे की श्रीकृष्णाचे जें तत्त्वज्ञान ते हेच आहे. महाभारतात अनेक मतांचे प्रतिपादन जरी असले तरी त्या वेदाचा आद्य प्रणेता जो श्रीकृष्ण त्याची राजमुद्रा ज्या मतावर असेल तेच तत्त्वज्ञान ' भारतीय ' या पदवीस योग्य होय, असे म्हटल्यास त्यावर कोणी

आक्षेप घेईल असे वाटत नाही. पहिली दोन कारणे आहेतच. पण विशेषतः या तिसऱ्या कारणामुळे हे तत्त्वज्ञान म्हणजे 'भारतीय तत्त्वज्ञान' होय असे आग्रहाने म्हटले आहे.

हे श्रीकृष्णाचे तत्त्वज्ञान अत्यंत तर्कशुद्ध, अनुभवसिद्ध व राष्ट्रहिताला अत्यंत पोषक असे असल्यामुळे हिंदुमात्राने याचे अहोरात्र मनन व चिंतन करून त्यातील सारार्थ ध्यानात घ्यावा यातच या समाजाचे कल्याण आहे.

## धर्मकारण

पांडव वनवासास गेल्यावर त्यांची स्थिती मोठी विकल झाली. इंद्रासारखे हे पराक्रमी योद्धे सर्व राजैश्वर्य सोडून वल्कले, नेसून, कंदमुळे खाऊ लागले आणि झाडाखाली पालापाचोळ्यावर पडू लागले. ते पाहून द्रौपदीचे मन अगदी दुभंगून गेले आणि धर्माधर्मासंबंधी फारच मोठ्या शंका तिच्या मनात निर्माण होऊ लागल्या. सत्यनिष्ठ, पुण्यशील, सदाचरणी अशा धर्मराजाला अरण्यवास आणि कपटी, अधम अशा दुर्योधनाला राज्यलक्ष्मी या घटनेत काही तरी अधर्म असला पाहिजे असे तिला वाटू लागले. आणि दुर्योधनाने जर अन्यायाने राज्याचे अपहरण केले आहे तर आपली प्रतिज्ञा मोडूनही, सत्यनिष्ठा सोडूनही, आपण आपले राज्य परत घ्यावे, वनात राहू नये असे ती धर्मराजाला सांगू लागली. भीम, अर्जून यांनीही युधिष्ठिराच्या धर्मवेडाचा उपहास करून द्रौपदीच्या म्हणण्यास पाठिंबा दिला आणि अन्यायाने हिरावून नेलेली राज्यलक्ष्मी बाहुबलाने परत जिंकून घेणे हाच खरा क्षत्रियाचा धर्म आहे, वनात राहाणे हा भेकडपणा आहे असे त्यास सांगितले.

पण धर्मराजाला हे मुळीच मानवले नाही. त्याने आपली पत्नी व बंधू यांस स्पष्टपणे सांगितले, ' मी माझी प्रतिज्ञा कधीच मोडणार नाही हे पक्के समजा. मोक्षाचा अथवा प्रत्यक्ष जीविताचाही त्याग करावा लागला तरीही मी सत्यरूप धर्माचा स्वीकार करणार. कारण राज्य, पुत्र, कीर्ती, द्रव्य यांना सत्याच्या एका षोडशांशाची सुद्धा सर यावयाची नाही. ' ( वन. अ. ३४ )

धर्माच्या या भाषणावर त्या भावाभावांत खूप चर्चा, नव्हे खडाजंगी झाली. त्यांच्यापुढे खरोखरच मोठा बिकट व गहन प्रश्न येऊन पडला होता. धर्माची, सत्याची, प्रतिज्ञापालनाची किंमत तरी किती ? राज्य गेले, कीर्ती गेली, जीव गेला आणि मोक्षही गेला तरी सत्याचरण करावयाचे की काय ? आणि करावयाचे असेल तर ते कशासाठी ? सत्य हेच साध्य आहे, धर्म हेच साध्य आहे, का धर्म या साधनांनी आणखी काही साध्य प्राप्त करून घ्यावयाचे आहे ?

असले प्रश्न पांडवांना व द्रौपदीला फार त्रास देऊ लागले. या प्रश्नांनी त्यांनाच फक्त त्रास दिला असे नाही. अरण्यात पांडवांना बलराम भेटावयास आला तेव्हा त्यांची ती हीन स्थिती पाहून त्याचेही मन व्याकुळ झाले. तो श्रीकृष्णाला म्हणाला, " कृष्णा, धर्माचरण करणे हे प्राण्याच्या अभ्युदयाचे अथवा अधर्माचरण हे अपकर्षाचे कारण नाही असे म्हणावे लागते. कारण या धर्माचा आश्रय केला असताही महात्म्या युधिष्ठिरास जटाधारी बनून आणि वल्कले नेसून वनात राहून क्लेश भोगावे लागत आहेत आणि दुर्योधन हा पृथ्वीचे राज्य करीत आहे तरी तो अधर्माने वागत आहे म्हणून काही पृथ्वी दुभंगून जाऊन त्याला गडप करीत नाही यामुळे ज्या मनुष्याची बुद्धी मंद आहे त्याला धर्मापेक्षा

अधर्माचेच आचरण करणे अत्यंत श्रेष्ठ होय असे वाटू लागेल हे साहजिक आहे. दुर्योधन सुख भोगत आहे व धर्म दुःख भोगत आहे यामुळे लोकांनी धर्म व अधर्म यांपैकी कोणाचे आचरण करावे अशी मनुष्यांना शंका उत्पन्न झाली आहे." ( वन. अ. ११९ )

बलरामाच्या या भाषणावरून धर्माला काहीतरी ध्येय असले पाहिजे, त्याच्या आचरणाने अभ्युदय झाला पाहिजे, तरच त्या आचरणाला काही अर्थ आहे असे त्यास वाटत होते असे दिसते. एखाद्या वेळेस विपरीत दिसताच धर्म सोडून देणे हे मंदबुद्धीचे लक्षण आहे हे म्हणणे योग्य आहे. पण जर अभ्युदय नाही तर धर्माचरण कशाला करावे अशी शंका येणे साहजिक आहे असे तो ज्याअर्थी म्हणतो त्याअर्थी अभ्युदय हे धर्माचे प्राप्तव्य असले पाहिजे असा त्याचा अभिप्राय आहे असे दिसते.

महाभारतात धर्माधर्मनिर्णयाचे असे अनेक प्रसंग निर्माण झालेले आहेत आणि त्या प्रसंगी श्रीकृष्ण, भीष्म, पराशर, व्यास, धर्म, भीम, अर्जुन इत्यादी विचारवंतांनी आपले विचार प्रगट केले आहेत. त्यावरून धर्मासंबंधी, त्याच्या स्वरूपासंबंधी, शाश्वततेसंबंधी आपल्याला महाभारताचे मत काय आहे याचा निर्णय करणे सहज शक्य होते. तो प्रयत्न आता करावयाचा आहे.

## धर्म हे समाजोन्नतीचे साधन

भारती तत्त्ववेत्त्यांचा पहिला सिद्धांत असा आहे की धर्म हे साध्य नसून साधन आहे. आणि समाजाची उन्नती हे त्याचे साध्य आहे. आणि ज्यामुळे समाजाची उन्नती होईल तोच धर्म होय अशी त्यांनी धर्माची व्याख्या केली आहे. युधिष्ठिराच्या प्रश्नाला उत्तर देताना भीष्मांनी पुढीलप्रमाणे विवेचन केले आहे.

" युधिष्ठिरा, सत्य भाषण करणे हेच उत्तम होय. कारण सत्याहून श्रेष्ठ असे दुसरे काही नाही. तथापि, हे भारता, याविषयींचे जे ज्ञान होणे अवश्य आहे ते मी तुला सांगतो, ऐक. ज्या प्रसंगी सत्याचा असत्यासारखा उपयोग होत असेल व असत्याची योग्यता सत्यासारखी असेल त्याप्रसंगी, जरी सत्य असले तरी ते न बोलता असत्यच भाषण केले पाहिजे. ज्याला सत्य कोणते याविषयीचा निर्णय झालेला नाही, तो मनुष्य केवळ अज्ञानी होय. सत्य व असत्य या दोहोंविषयीचा सिद्धांत ठरविल्यानेच मनुष्य धर्मज्ञ होतो. सत्यभाषणरूप धर्म घडावा म्हणून कौशिक नावाच्या एका तापसाने चोरट्या लोकांना त्यांच्या भीतीने लोक कोणत्या दिशेने पळून गेले होते ते सांगितले. असला हा पुरुष खरा धर्मवेत्ता नव्हे. कारण त्याच्या सत्य भाषणामुळे अनेक लोकांचा घात झाला. हा प्रश्न असा आहे की, यात धर्म कोणता व अधर्म कोणता याची निवड करणे कठीण आहे; याविषयी निश्चय कसा करावा? अर्थात हे ठरविणे अशक्य आहे. तथापि, लोकांच्या अभ्युदयासाठीच धर्म सांगितलेला आहे. ह्यामुळे ज्याच्या योगाने लोकांचा अत्यंत उत्कर्ष होईल तोच धर्म होय, असा सिद्धांत आहे. धर्म शब्दाचा अर्थ धारण करणे असा आहे. सर्व लोकांना धर्माचेच अवलंबन असल्यामुळे धर्मानेच त्यांना धारण केले आहे. म्हणूनच ज्याच्या योगाने लोकांचे धारण होईल तो धर्म, असा सिद्धांत आहे." (शांति. १०९). धर्म हे साध्य नव्हे साधन आहे असे विचार भीमानेही सांगितले आहेत. अरण्यात असताना तो एकदा युधिष्ठिराला म्हणाला, " हे भरतवंशजा, आम्ही तुझे शास्त्र ऐकत बसलो आणि धृतराष्ट्राच्या पुत्रांना त्याच वेळी ठार केले नाही या दुष्कृत्यामुळे आम्हांला ताप भोगावा लागत आहे. हे राजा, तू

' धर्म धर्म ' म्हणत सदैव व्रते करीत बसला आहेस. तुला स्वतःला प्राप्त झालेल्या या वनवासरूपी पशुवृत्तीकडे तरी लक्ष दे. या वृत्तीचे अवलंबन समर्थ लोक करीत नाहीत, दुबळे लोक करतात. ऐश्वर्य संपादन करण्यास असमर्थ असणारे निंद्य लोकच स्वर्गाचा विघात करणाऱ्या या वैराग्यावर प्रेम करतात. राजा जो धर्म मित्रांच्या आणि आपल्याही अपकर्षास कारण होतो तो धर्म नसून प्रत्यक्ष दुःख अथवा अधर्माचे बीज होय. मनुष्य सदोदित इतर पुरुषार्थांचा त्याग करून धर्माचरण करू लागला म्हणजे तो, धर्म अर्थसाध्य असल्या-मुळे, धर्माचरणाविषयी असमर्थ बनतो आणि असे झाले म्हणजे धर्म व अर्थ हे दोन्ही पुरुषार्थ त्या पुरुषाचा त्याग करतात. ज्याचा धर्म केवळ धर्माकरताच आहे तो शहाणा नव्हे. त्याच्या कपाळी नेहमी दुःखच येणार. " ( वन. अ. ३३ ) यावर युधिष्ठिराने नेहमी-प्रमाणे, ' मला सत्यापेक्षा काही श्रेष्ठ वाटत नाही. ' असेच उत्तर दिले. दुसऱ्या एका प्रसंगी सात्यकीलाही त्याने, ' तू म्हणतोस त्याप्रमाणे खरे असले तरी मला सत्यव्रताचे अत्यंत पालन करावयाचे आहे, राज्याचे करावयाचे नाही ' असे उत्तर दिले व यादववीर दुर्योधनाला ठार मारण्यास उद्युक्त झाले असता, तुम्ही धर्मामध्ये केव्हाही प्रमाद होऊ देऊ नका. ' असे त्यांना विनविले. ( वन. अ. १२० ).

अशा तऱ्हेने तो निक्षून बोलत असला तरी त्याच्या मनातही पुष्कळ वेळा डळमळ चालत असे. आपली दीन स्थिती ध्यानात येऊन, आपल्या प्रिय पत्नीची वनवासात चाललेली विटंबना पाहून त्याचे मन चलित होई व आपल्या ' सत्याकरिता सत्य ' या व्रतात कितपत अर्थ आहे अशा शंकेने त्याचेही मन ग्रस्त होत असे व मग आपल्याला यात कोणी तरी पाठिंबा द्यावा असे त्याला

वांटू लागे. म्हणून एके प्रसंगी त्याने लोमश ऋषींना ते अरण्यात भेटावयास आले असता प्रश्न केला. तो म्हणाला, ‘ हे देवर्षिश्रेष्ठा, माझ्या अंगी मुळीच गुण नाहीत असे वाटत नाही. तथापि, दुसरा कोणीही राजा दुःखसंतप्त नसेल इतका मी दुःखाने गांजलो आहे. आणि आमचे शत्रू दुर्गुणी आहेत इतकेच नव्हे तर ते धर्माप्रमाणे वागतही नाहीत, असे मला वाटते; तरी पण हे लोमशा त्यांची या जगतामध्ये भरभराट होते, ह्याचे कारण काय? ’ ( वन. अ. ९४ ).

युधिष्ठिराच्या या प्रश्नावरून धर्माचरणामुळे अभ्युदय झाला पाहिजे आणि आपला तसा होत नाही हे विपरीत आहे, असे त्यास वाटत होते, हे निश्चित दिसते. अभ्युदय होतो असे दिसत नसले तर लगेच धर्म सोडावा असे त्याने केले नाही हे खरे; पण हे काही तरी चुकत आहे असे त्यासही वाटत होते असे दिसून येते. युधिष्ठिराच्या प्रश्नाला देवर्षी लोमश यांनी जे उत्तर दिले त्यावरून धर्म हे साधन आहे व समाजाच्या उत्कर्षासाठीच त्याची उत्पत्ती आहे हे त्यांनाही मान्य होते, असे दिसून येईल. थोडा वेळ फलप्राप्ती दिसेनाशी झाली तर लगेच धर्म सोडू नये एवढी सूचना त्यांनी केली आहे इतकेच. लोमश म्हणाले, ‘ हे कुंतीपुत्रा, अधर्माच्या योगाने प्रथम काही काळ मनुष्याचा अभ्युदय होतो. नंतर थोडा वेळ त्यास आपले कल्याणही झालेले पाहावयास सापडते. पुढे तो शत्रूसही जिंकतो. पण शेवटी मात्र समूळ नष्ट होऊन जातो. उलट धर्माचरणी मनुष्य प्रारंभी जरी कष्ट भोगत असला तरी अंती त्याला सुख प्राप्त होते.’

धर्माधर्मासंबंधी धर्मव्याधानेही असेच विचार एके ठिकाणी सांगितलेले आढळतात. आपल्याकडे आलेल्या ब्राह्मणाला धर्म-

व्याध म्हणाला, ' धर्माचे ज्ञान अत्यंत सूक्ष्म असून त्याच्या अपार अशा अनेक शाखा आहेत. प्राणांतिक प्रसंगी व विवाहाच्या ठिकाणी असत्य भाषण करणे भाग पडते. त्या वेळी असत्य भाषण केल्यानेंच सत्य भाषण केल्याचे व सत्य भाषण केल्याने असत्य भाषण केल्याचे फळ मिळते. कारण जे प्राण्यांना अत्यंत हितकारक असेल तेच सत्य होय असा निश्चय आहे. यद्भूतहितमत्यंतं तत् सत्यमितिधारणा ॥ ' ( वन. अ. २०९.४ )

धर्म हे साधन आहे, साध्य नव्हे आणि समाजाच्या उत्कर्षासाठी त्याची प्रवृत्ती झालेली आहे असा जो भारती सिद्धांत तो अनेकांच्या मुखाने वर सांगितलाच आहे. आता श्रीकृष्णाने हाच विचार कसा विशद करून दाखविला आहे ते सांगतो.

भारतीयुद्ध चालू असताना एकदा युधिष्ठिराला कर्णाने बाणांचा वर्षाव करून अगदी घायाळ करून टाकले व त्यामुळे त्याला रणातून पळून शिबिराकडे यावे लागले. ही बातमी ऐकून अर्जुनाला चिंता वाटू लागली व युधिष्ठिराचे कुशल विचारण्यासाठी तो रणांगण सोडून शिबिरात आला. धर्मराज कर्णावर अगदी चिडून गेला होता व त्याच्या सूडासाठी जळत होता. अर्जुन त्याला मारून शिबिरात आला असेल असे वाटून तो त्याचे अभिनंदन करू लागला. पण तसे झालेले नाही, कर्ण अजून जिवंतच आहे असे त्याला कळल्यावर निराशेने त्याचे मन भडकून गेले व त्याने अर्जुनाची अतिशय निर्भर्त्सना केली व ' तुझ्या हातून पराक्रम होत नाही तर तुझे धनुष्य ठेवलेस कशाला, ते दुसऱ्याला देऊन का टाकीत नाहीस ! ' असे तो म्हणाला. ' तुझे धनुष्य दुसऱ्याला देऊन टाक ' असे मला कोणी म्हटल्यास त्या पुरुषाचा मी तत्काल वध करीन ' अशी अर्जुनाने पूर्वी केव्हा तरी प्रतिज्ञा केली होती.

त्यामुळे युधिष्ठिराने तसे म्हणताच हा आपला ज्येष्ठ बंधू आहे, आपल्याला वंद्य आहे हा विचार मनात न आणता अर्जुनाने एकदम खड्ग काढले व तो त्याच्या वधास उद्युक्त झाला. हे त्याचे वर्तन पाहून श्रीकृष्ण विस्मित झाले व अर्जुनाने आपल्या प्रतिज्ञेचे कारण सांगितले तेव्हा तर त्यांना प्रतिज्ञापालनासंबंधीची त्याची ही विपरीत कल्पना व धर्माधर्मासंबंधीचे अज्ञान पाहून परम उद्वेग वाटला. ते त्याला म्हणाले, ‘अर्जुना, तू मूर्खासारखा धर्मलोपभयाने जे कृत्य करण्यास उद्युक्त झाला आहेस ते धर्माची सूक्ष्म तत्त्वे माहीत असलेला पुरुष कधीच करणार नाही. पार्था, कार्याकार्यनिर्णयासंबंधाने पंडितांचे जे सिद्धांत आहेत त्यांचे ज्ञान ज्याला नाही तो पुरुष असाच तुझ्याप्रमाणे भांबावून जाऊन वेड्यासारखी भलतीच गोष्ट करण्यास तयार होतो. तू धर्मज्ञ म्हणून जे कृत्य करण्यास तयार झाला आहेस ते केवळ तुझ्या अज्ञानाचेच द्योतक आहे. बाबारे, धर्माची तत्त्वे फार सूक्ष्म आहेत. ती तुला माहीत नाहीत. आता मी तुला धर्माचे गूढ तत्त्व निरूपण करून सांगतो. सत्यापेक्षा अधिक श्रेष्ठ काही नाही हे खरे, परंतु सत्यास अनुसरून वर्तन करीत असताना सत्याच्या तत्त्वावर अनुसंधान ठेवून त्याचा यथायोग्य निर्णय ठरविणे अवघड आहे. अज्ञ पुरुष सत्यासत्य विवेकातील मर्म न जाणता केवळ सत्यालाच धरून बसतात आणि तदनुसार वागतात. पण सत्यासत्याचे मर्म ज्याला कळेल तोच धर्मज्ञ होय. धर्माचे मूलतत्त्व प्राण्यांचा उत्कर्ष व्हावा हेच होय. आणि याच तत्त्वाच्या अनुरोधाने श्रुतीत धर्माची व्याख्या केली आहे. या अनुरोधाने पाहिले तर अर्जुना, आधी तू जी प्रतिज्ञा केलीस तीच चुकीची आहे. आणि म्हणून तू मूर्खपणाने अधर्ममूलक कर्म करीत आहेस, यात संदेह नाही. प्राणसंकटात,

विवाहकाली, किंवा सर्व जातीचा नाश होण्याचा प्रसंग आला असताना असत्य भाषण केले तरी पाप लागत नाही. धर्मतत्त्व यथार्थ जाणणाऱ्या लोकांना यात अधर्म वाटतच नाही.' (कर्णपर्व, अ. ६९).

धर्माचे स्वरूप काय, त्याची प्रवृत्ती कशासाठी झाली आहे या महत्त्वाच्या विषयासंबंधी वर अनेक थोर व विचारी पुरुषांची मते सांगितली आहेत. भीम, लोमश, धर्मव्याध यांची मते यात आहेतच, पण त्याशिवाय पितामह भीष्म आणि योगेश्वर श्रीकृष्ण यांचाहि अभिप्राय व्यक्त केला आहे. त्यावरून धर्माचे अंतिम ध्येय समाजाचा उत्कर्ष हे असून सत्यासत्य, न्याय्यअन्याय्य हे सर्व त्यावरून ठरविणे अवश्य आहे असा भारतीय तत्त्वज्ञानाचा पहिला सिद्धांत ठरतो असे स्पष्ट दिसून येईल.

## धर्म परिवर्तनीय

ज्यामुळे समाजाचा किंवा राष्ट्राचा उत्कर्ष होतो ते बंधन म्हणजे धर्म होय अशी व्याख्या पतकरिली म्हणजे ही बंधने सर्व काळी सर्व स्थळी एकाच प्रकारची असणे शक्य नाही हा विचार मान्य करणे प्राप्तच आहे. आणि महाभारतातील प्रज्ञावंतांनी हा विचार अनेक ठिकाणी विस्तरशः मांडलेला आढळून येतो. व्यासांनी एके ठिकाणी हे स्पष्ट शब्दात सांगितले आहे. 'कृतयुगातील धर्म निराळा, त्रेता, द्वापर, कली याही युगांतील धर्म निराळे;' असे ते म्हणतात. यात हाच अभिप्राय आहे. मोक्षधर्माचे सिद्धांत जरी शाश्वत असले तरी जे प्रपंचाचे, संसारधर्माचे तत्त्वज्ञान येथे सांगावयाचे आहे, त्याचे सिद्धांत त्रिकालाबाधित असणे शक्य नाही हे उघड आहे. काल हा नित्य पालटत असतो. परिस्थिती

पालटत असते. त्या त्या परिस्थितीप्रमाणे समाजावरची बंधने बदलणे अवश्य आहे हा विचार कोणाही सुज्ञ पुरुषाला पटण्याजोगा आहे. भारतकारांच्या मते तर राजा हाच कालाचे कारण आहे. राजा हाच आपल्या उत्तम किंवा अधम शासनाने कृत, त्रेता, द्वापर, कली इत्यादी युगे निर्माण करतो असे महाभारतात दोन तीन ठिकाणी म्हटले आहे. ( शां. ६९, ९१ ) सध्या प्रचलित असलेली सर्वस्वी कालावलंबी युगकल्पना भारतात आहे. पण ही वर सांगितलेली कल्पनाही आपणांस तेथे आढळते. यावरून ठरीव कृत युग किंवा कलियुग असे काही नसून राजा येईल तसे युग पालटते असा विचार स्पष्ट होतो; आणि तो जमेस धरून देशकालाप्रमाणे धर्म पालटतो असा निश्चय भारतकारांनी केला आहे.

स एव धर्मः सोऽधर्मो देशकाले प्रतिष्ठितः
आदानमनृतं हिंसा धर्मोह्यावस्थिकः स्मृतः ।

–शां. ३६ : ११

योग्य वेळी आणि योग्य स्थळी जो धर्म ठरतो तोच अयोग्य वेळी आणि अयोग्य स्थळी अधर्म होतो. चौर्यकर्म, असत्य भाषण, हिंसा या सर्वांची गोष्ट अशीच आहे. म्हणून 'धर्म हा परिस्थितीप्रमाणे ठरवावा लागतो' असे भीष्मांनी येथे सांगितले आहे. युद्धामध्ये आपण फार हिंसा केली, अनेक भूपतींचा वध केला या विचाराने युधिष्ठिराला फार खंत वाटू लागली. या पापाच्या निष्कृतीसाठी वनात जाऊन तपश्चर्या करणे अवश्य आहे असे वाटून तो राज्यत्यागाची भाषा बोलू लागला. तेव्हा भीष्मांनी त्याला उपदेश करून, तुझ्या हातून पाप घडलेलेच नाही, असे सांगितले. अहिंसा हा काही सर्व स्थळी धर्म होत

नाही, असे सांगताना ते म्हणाले, 'धर्माचा उच्छेद टळत असेल राष्ट्र सुखी होत असेल तर अशा प्रसंगी वध करणे हे सद्वर्तनाला बाधक होत नाही. कारण, हे प्रजाधिपते, एखादे अधर्माचे कृत्य हेच केव्हा धर्म होत असते व धर्माचे कृत्यही अधर्मरूपी होत असते. तेव्हा तू शोक करू नको. अंतःकरण स्थिर कर.' ( शांति. ३३ ) दुसऱ्या एका प्रसंगी भीष्मांनीच पुढीलप्रमाणे उद्गार काढले आहेत. 'आपत्ती आली असताना पूर्वीच्या लोकांनी आचरण केलेल्या गौण धर्माचेही आचरण करावे. कारण हे भारता, संपन्नतेच्या कालाचे धर्म निराळे आहेत व आपत्कालचे धर्म निराळे आहेत. द्रव्यसंग्रह केल्यावाचूनही धर्म संपादन करता येईल, पण चरितार्थाचे महत्त्व धर्माहूनही अधिक आहे. ज्या उपायाने धर्मनिष्ठ राहूनही बलाची प्राप्ती होईल असा खात्रीचा उपाय नाही. म्हणूनच आपत्काली अधर्मालाही धर्माचे स्वरूप येते व धर्मही अधर्म होतो असे ज्ञानी लोकांचे मत आहे.'

आपल्या इतर प्राचीन ग्रंथांप्रमाणे महाभारतातही आपद्धर्म म्हणून एक मोठेच प्रकरण आहे. समाजाला नेहमीच्या व्यवस्थेसाठी काही बंधने लावून दिलेली असतात. पण आपत्काल आला असता ती बंधने पाळणे हे अशक्य असते. अशा वेळी ती बंधने सोडून त्या त्या प्रसंगी आपले व समाजाचे ज्यायोगे हित होईल ते कोणतेही आचरण धर्म्यच होय असा भारतकारांनी अभिप्राय दिलेला आहे. वर्णधर्म ही प्राचीनकालची फार महत्त्वाची कल्पना होय. पण आपत्काली ती व्यवस्थाही बदलण्यास हरकत नाही, नव्हे अवश्य बदलावी असा भारतात उपदेश आहे. युधिष्ठिर म्हणतो की, " सरळ मार्ग म्हणजे श्रुतींनी लावून दिलेली कामे चारहि वर्णांनी करणे. उदाहरणार्थ, ब्राह्मणांचा धर्म अध्ययनादि,

क्षत्रियांचा शौर्यादि, वैश्यांचा कृष्यादि, आणि शूद्रांचा सेवादि. असे जरी खरे तरी जगातून कधीही नाहीसे न होणारे धर्म आणि अधर्म हे त्याच कर्माच्या ठायी संभवतात. उदा. ब्राह्मणाने क्रय-विक्रय करणे हा संकट नसता अधर्म होय, परंतु निर्वाहच होत नसेल तर आपत्काली तोच त्याला धर्म होय. या रीतीने परस्पर वर्णांच्या क्रियांचा विपर्यास होतो व स्थितीभेदाने तीच धर्म-रूपवती क्रिया अधर्मरूप मानिली जाते. संजया, उपजीविकेचे साधन असूनही आपद्धर्माप्रमाणे चालणारा, आणि आपत्तीत असूनही आपद्धर्माप्रमाणे न चालणारा हे दोघेही निंदेला पात्र आहेत, आम्ही पूर्वी एकचक्रा नगरीत भिक्षा मागितली. तेव्हा भिक्षा न मागणे हा अधर्म होता. पण आता युद्ध सोडून भिक्षा मागणे हा अधर्म होईल." ( उद्योग २८ )

साधारणतः शस्त्रग्रहण करून प्रजेचे पालन करणे हा क्षत्रि-यांचा धर्म आहे. पण राज्यावर संकट आले व राजाच्या हातून ते निवारण होईनासे झाले किंवा राजा नादान असल्यामुळे प्रजेच्या पालन होत नसले तर वर्णधर्माची कोणचीही कल्पना मनात न आणता सर्वांनी क्षात्रधर्माचे आचरण करावे असा उपदेश भीष्मांनी केला आहे. ते म्हणतात, 'अपार आणि नौकाशून्य अशा संकटरूप समुद्रामध्ये जो मूर्तिमंत परतीर अथवा नौकाच झालेला असतो तो जरी शूद्र असला, अथवा दुसरा कोणी असला तरी त्याचा सर्वथैव सन्मान करणेच योग्य होय. प्रजापालन न करणारा राजा अगदी निरर्थक होय. जो सदैव सज्जनांचे रक्षण करून दुष्टांना हांकून देतो तोच ( शूद्र असला तरी ) राजा केला पाहिजे. हा देश व काल यांचा प्रभावच असा आहे की, या कारणांच्या अनुरोधाने धर्मालाही अधर्माचे रूप येते व अधर्मही धर्मस्वरूप बनतो.' ( शांति. ७८ )

आपत्काली अमुक करावे व एरवी अमुक करावे या बोलण्याचा 'परिस्थिती पाहून वर्तावे' असाच अर्थ होतो. कारण आपत्काल म्हणजे अमका एक काल असे काहीच ठरलेले नाही. उपजीविका चालली नाही तरी आपत्कालच होय. परचक्र येणे, राजा नादान असणे, अवर्षण होणे, हे सर्व आपत्कालच होत. यावरून प्रत्येक व्यक्तीचा, कुटुंबाचा, गावाचा किंवा समाजाचा आपत्काल निराळा असू शकेल हेही दिसते. वर सांगितलेले आपत्काल हे नेहमी येथे ना तेथे असणारच आणि त्यामुळेच आपत्काली असे आचरण करावे याचा अर्थ देश, काल, परिस्थितीप्रमाणे आचरण करावे, उत्कर्ष कसा होईल इकडे लक्ष ठेवावे; सत्य, अहिंसा, दया, क्षमा, प्रतिज्ञापालन यासंबंधीच्या एकाच सिद्धांताला चिकटून बसू नये असाच अभिप्राय व्यक्त होतो.

भिन्न युगात धर्मनियम निराळे, समर्थ असताना निराळे, दुबळे असताना निराळे, सुस्थितीत असताना निराळे, आपत्तीत असताना निराळे. हे सर्व विचार एकत्र केले की धर्मनियम हे परिवर्तनीय आहेत, शाश्वत नाहीत असाच भारतकारांचा अभिप्राय आहे हे निश्चित दिसू लागते.

श्रीकृष्णाचे या विषयासंबंधी निश्चित व उत्तम मत सांगून हा विषय पुरा करू.

'तुझे धनुष्य दुसऱ्यास देऊन टाक' असे युधिष्ठिर म्हणाला तेव्हा अर्जुन त्याच्या वधास उद्युक्त झाला हा कथाभाग वर आलाच आहे. त्याप्रसंगी 'तू अगोदर प्रतिज्ञा केलीस तीच मूर्खासारखी होती' असे सांगून कृष्णाने ती अर्जुनास मोडणे भाग पाडले. आणि प्रतिज्ञा पाळलीस तर अधर्म होईल असे सांगितले. उलट भीमाने गदायुद्धात दुर्योधनाला बेंबीच्याखाली

मांडीवर प्रहार करून ठार मारले त्या वेळी बलराम त्याचा निषेध करू लागला. तेव्हा कृष्णाने भीमाने तशी प्रतिज्ञाच केली होती, ती पुरी करणे भाग होते. असे सांगितले. प्रतिज्ञा मोडणे हा एके ठिकाणी धर्म होता व ती पाळणे हा दुसऱ्या ठिकाणी धर्म होता. आणि याचे विवेचन करताना श्रीकृष्णानेही प्रसंगपरत्वे सत्य हे असत्य ठरते व असत्य हे सत्य ठरते असा आपला अभिप्राय दिला.

धर्म हा लोकांच्या उत्कर्षासाठी आहे आणि त्यामुळेच त्याचे नियम अगदी निश्चित, केव्हाही, कोठेही मार्गदर्शन स्पष्ट करतील असे नाहीत, असे महाभारतकारांचे मत आहे असे आपल्या निदर्शनास आले. हे ध्यानात येताच एक नवी अडचण आपल्या-पुढे येऊन उभी रहाते. भिन्न भिन्न प्रसंगी देश, काल, परिस्थिती यांप्रमाणे धर्माचे रूप बदलत असेल तर आपल्यावर आलेल्या विशिष्ट प्रसंगी आपण वर्तन कसे ठेवावे हे पुरुषाने कशाच्या आधाराने निश्चित करावयाचे? सत्य, अहिंसा, क्षमा यांबद्दल काही शाश्वत सिद्धांत असते तर काही झाले तरी त्याप्रमाणे वागावे असे धोरण ठेवता आले असते; पण तसे नाही. कधी सत्य हे असत्य ठरते. आणि भलत्याच वेळी, जेथे समाजाची हानी होत आहे अशा प्रसंगीही, सत्याचरण केले तर त्यामुळे प्राणी नरकास जातो असे भारतीय तत्त्ववेत्ते निक्षून सांगतात. (कर्ण. अ. ६९) त्यामुळे कोणत्या वेळी काय धर्म्य व काय अधर्म्य हे ठरवावयाचे कसे हा मोठा प्रश्न आहे.

## बुद्धिप्रामाण्य

या धर्माधर्म-निर्णयात मनुष्याच्या बुद्धीला मुळीच वाव नाही, त्याने सर्वस्वी शास्त्रावरच, श्रुतीवरच अवलंबून राहिले पाहिजे असा

आपल्या प्राचीन ऋषींचा निर्वाळा आहे असे एक मत प्रचलित आहे. पण ते भ्रामक आहे. महाभारतात सर्वस्वी ग्रंथप्रामाण्य न उपदेशिता अनेक ठिकाणी बुद्धिप्रामाण्याचीही प्रशंसा व उपदेश केलेला आढळतो. श्रुतीमध्ये सर्व गोष्टी सांगणे शक्य नाही. प्रत्येक प्रसंगाची, त्या वेळच्या परिस्थितीची व त्या वेळच्या सत्यासत्याची कल्पना श्रुतींच्या तत्त्ववेत्त्यांना येणे शक्य नाही हे भारतीय तत्त्ववेत्ते जाणून होते. त्याचप्रमाणे श्रुतीत परस्परविरोधी वचनेही सापडतात व त्यामुळे गोंधळ होतो, कार्याकार्य ठरत नाही हेही त्यांनी लक्षात घेतले होते. आणि म्हणूनच सर्व काही श्रुतिवचनाप्रमाणेच झाले पाहिजे. असा आग्रह त्यांनी अनेक ठिकाणी सोडून दिल्याचे आपणांस दिसून येते. श्रुतिवचनाबरोबरच कार्याकार्यनिर्णयात त्यांनी वृद्धांच्या वचनालाही प्रामाण्य दिलेले आढळून येते. आणि याही पुढे जाऊन ज्ञानसंपन्न पुरुषाने कठिण प्रसंगी स्वतःची बुद्धी चालवून तिला पटेल तो निर्णय करावा असेही त्यांनी सांगितले आहे.

सत्यासत्य-निर्णयाचा विचार चालू असताना भीष्म युधिष्ठिरास सांगतात, 'हे भारता, श्रुतीत जे जे सांगितले आहे तो तो धर्म होय असे कित्येकांचे मत आहे; व दुसऱ्या लोकांच्या मते तो सर्वच धर्म होय असे नाही. या दुसऱ्या प्रकारच्या मतांचा आम्ही द्वेष करीत नाही.' कारण श्रुतीमध्ये प्रत्येक गोष्ट सांगितलेली असणे शक्य नाही. ( शांति. अ. १०९ ) शिबिराजापुढे धर्माधर्म-निर्णयाचा एक बिकट प्रश्न येऊन पडला होता. एका कपोत पक्ष्यामागे एक ससाणा लागला होता. त्या वेळी कपोत या राजाच्या आश्रयास आला व राजाने त्यास अभय दिले. मागून ससाणा आला व आपले भक्ष्य राजाजवळ मागू लागला. राजा कपोताला त्या

ससाण्याच्या स्वाधीन करीना. तेव्हा ससाणा म्हणाला, 'याला तू माझ्या स्वाधीन केले नाहीस तर मी भुकेने मरेन. आणि माझी बायकामुले मरतील. त्यांची हत्या तुझ्या माथी येईल व तुला अधर्म घडेल.' हे ऐकून राजालाही प्रश्न पडला. कपोत द्यावा तर शरणागताचे रक्षण करण्याचे ब्रीद नष्ट होऊन अधर्म घडेल. न द्यावा तर अनेक प्राण्यांच्या हत्येची जबाबदारी येऊन त्यामुळे अधर्म घडेल. या वेळी ससाण्याचे रूप धारण करणारा इंद्र त्याला म्हणाला—

गुरुलाघवमादाय धर्माधर्मविनिर्णये
यतो भूयांस्ततो राजन् कुरुष्व धर्मनिश्चयम्।
—वन. १३१।१३

राजा, धर्म कोणता व अधर्म कोणता याचा निर्णय करिताना तारतम्य पाहून त्यातल्या त्यात जो जास्त महत्त्वाचा वाटेल, (जे कृत्य जास्त फलदायी वाटेल) तो धर्म होय, असे तू ठरव.

इंद्राने या ठिकाणी श्रुतिवचनांचा हवाला न देता तुझी तारतम्य बुद्धी तू वापर व तू स्वतःच धर्माधर्म ठरव असे राजाला सांगितले. आणि याचे कारणही उघड आहे. असा दर वेळी उद्भवणारा प्रसंग कल्पून त्या त्या वेळी धर्म कोणता व अधर्म कोणता हे सांगून टाकणे श्रुतीलाही शक्य नाही.

युधिष्ठिराने एके प्रसंगी भीष्मांना प्रश्न केला की, 'मोठमोठे लोक सुद्धा आम्हांला बाह्यतः जे असत्य व निंद्य वाटते असे आचरण करतात; तर हीन असे जे दस्यू त्यांचे आचरण वेगळे कसे दाखविता येईल? या प्रश्नामुळे मला कर्तव्याची दिशा कळेनाशी झाली आहे. तरी आपण मला मार्ग दाखवा.' त्यावर भीष्मांनी उत्तर देताना जे प्रास्ताविक चार शब्द सांगितले आहेत त्यातील मर्म वरीलप्रमाणेच आहे. भीष्म म्हणाले—'शास्त्रातील तत्त्वे

ऐकूनच मी तुला हा उपदेश करीत आहे असे नाही. हे जे मधुतुल्य ज्ञान साठविलेले आहे ती ज्ञानसंपन्न अशा लोकांच्या ज्ञानाचीच पराकाष्ठा आहे. अर्थात ज्ञानसंपन्न लोकांनी संकटप्रसंगी असे आचरण न करणे फार भयावह आहे असे दिसून आल्यामुळेच ते आचरण करावयाचे ठरविले आहे. राजाने अनेक प्रकारच्या लोकांकडून अनेक प्रकारचे ज्ञान संपादन केले पाहिजे. युधिष्ठिरा, राजाने आपल्या बुद्धीच्या योगाने धर्माचे त्या त्या बाजूने संशोधन केले पाहिजे. धर्माचा प्रकार एकच असला तर तो राजाचे हातून घडू शकणारच नाही. यास्तव बुद्धीने त्याचे अनेक प्रकार जाणले पाहिजेत. राजा, काही लोक खरे ज्ञानी असतात व काहींचे ज्ञान खरे नसते. यास्तव त्याची आधी बरोबर रीतीने माहिती मिळवून जे ज्ञान सज्जनांना मान्य असेल त्याचाच सुज्ञ लोक अंगीकार करीत असतात. पण राजा, सज्जनांनी देखील दांभिकपणे आचरण केलेला जो धर्म असेल त्याचा तुला स्पर्श होता कामा नये. केवळ शास्त्राच्या अनुरोधाने किंवा केवळ बुद्धीने धर्मनिर्णय करणे शक्य नाही, ( न धर्मवचनं वाचा नैव बुध्येति नः श्रुतम् ॥ शांति. १४२, १७ ) कारण त्याला या दोहोंचीही अपेक्षा असते असे बृहस्पतीचे मत प्रत्यक्ष इंद्राने सांगितले आहे. राजा, लोकांचा योग्य रीतीने चरितार्थ चालविणे हा धर्म आहे असे काही पंडितांचे मत आहे. म्हणून ज्ञानसंपन्न राजाने सज्जनांना मान्य असलेला धर्म कोणता याचा आपल्या बुद्धीनेच विचार करावा. राजा ज्ञानास कारणभूत असल्यामुळे काही लोक ( श्रुतीतील ) वचनाचीच प्रशंसा करितात. पण ते केवळ अज्ञान होय. दुसरे युक्तीपुढे शास्त्र टिकत नाही म्हणून शास्त्रच निरर्थक होय असे म्हणतात, पण तेही अज्ञानच होय.' ( शांति. १४२ )

धर्माधर्म-निर्णयासंबंधी श्रुतिवचने व सत्पुरुषांचे आचरण यांचे महत्त्व कितपत मानता येईल याविषयी युधिष्ठिराने एके ठिकाणी आपले विचार सांगितले आहेत ते मननीय आहेत. तो म्हणतो,

'धर्माचे स्वरूप निश्चित आहे असे वाटत नाही, कारण जो संपन्न स्थितीत असतो त्याचा धर्म निराळा आणि जो संकटात असतो त्याचा धर्म निराळा असतो. संकटे काही वेदाच्या योगाने जाणणे शक्य नाही. अर्थात त्याचे स्वरूप निश्चित नसल्यामुळे धर्माचेही स्वरूप निश्चित नाही. सत्पुरुषांचा आचार हा धर्माविषयी प्रमाण असेही म्हणता येत नाही. कारण सत्पुरुषांचा आचार हा धर्म असे मानिले आहे त्याचप्रमाणे आचारसंपन्न असतात तेच सत्पुरुष असेही मानलेले आहे. अर्थातच सत्पुरुषत्वाचा निर्णायक आचार व आचाराचा निर्णायक सत्पुरुष असा अन्योन्याश्रय होतो. धर्माचे दुसरे प्रमाण म्हणजे वेदवचने हे होय असे शास्त्रनिष्णात लोकांनी सांगितलेले आहे. परंतु प्रत्येक युगात त्या वेदवचनांचा ऱ्हास होत जातो असे आम्ही ऐकलेले आहे. म्हणूनच कृतयुगातील धर्म निराळे, त्रेतायुगातील निराळे, द्वापरयुगातील निराळे व कलियुगातील धर्म निराळे आहेत. हे सर्व युक्तीच्याच अनुरोधाने केले आहेत असे दिसते. वेदवचन तेवढे प्रमाण असे म्हणणे केवळ लोकांच्या समाधानासाठी आहे (आम्नायवचनं सत्यमित्ययं लोकसंग्रहः ॥ शांति. २६६,९) वेदामध्ये प्रमाणभूत व अप्रमाणभूत अशी दोन्ही प्रकारची वचने आहेत. अशा रीतीने परस्परविरुद्ध वचनांनी युक्त असलेल्या ग्रंथाला प्रमाणत्व कोठून येणार ? हा धर्म प्रथम गंधर्वनगराप्रमाणे मोठा अद्भुत असा दिसतो पण विद्वान् लोक याच्यासंबंधी विचार करू लागले म्हणजे त्याचे नावही राहात नाही. शेतात सोडलेले पाण्याचे पाट जसे

क्रमाक्रमाने क्षीण होऊन जातात तसाच शाश्वत म्हणून प्रतिपादिलेला धर्मही क्रमाने क्षीण होत जातो.'

मागे एकदा त्रेतायुगाच्या शेवटी फार मोठा दुष्काळ पडला होता. त्या वेळी राजर्षी विश्वामित्र यांची अन्नान्नदशा झाली. क्षुधेने व्याकुळ होऊन ते सगळीकडे भटकत असताना एका चांडाळाच्या घरात शिरले व तेथे टांगलेली कुत्र्याची मांडी त्यांनी हरण करून घेतली. 'प्रथम प्राण वाचविणे हाच धर्म होय' असे त्याप्रसंगी त्यांनी मत दिले. त्याचे समर्थन करून भीष्म म्हणतात, 'याप्रमाणे संकटात सापडलेल्या जीवितेच्छू व विद्वान मनुष्याने हवे ते उपाय करून आपले प्राण वाचविले पाहिजेत. कारण प्राण वाचले तरच मनुष्य पुण्य संपादन करू शकतो व त्याचे कल्याणही होते.' इतके सांगून या कथेचा निष्कर्ष म्हणून पितामहांनी सांगितला तो असा : 'यास्तव हे कुंतिपुत्रा, बुद्धिचातुर्यसंपन्न अशा विद्वान पुरुषाने धर्म कोणता याचा निर्णय करण्याच्या कामी बुद्धीचे अवलंबन करून या लोकात वागले पाहिजे.'

तस्मात् कौन्तेय विदुषा धर्माधर्मविनिश्चये
बुद्धिमास्थाय लोकेऽस्मिन् वर्तितव्यं कृतात्मना ॥

— शांति. १४१, १०४

अर्जुनाला उपदेश करताना श्रीकृष्णांनी एके समयी आपला हाच अभिप्राय व्यक्त केलेला आहे. श्रुतीत सर्व धर्मांचा ऊहापोह केलेला नसल्यामुळे मनुष्याने तर्काच्या साह्याने धर्माधर्म ठरवावा असे ते म्हणतात. कौशिक नावाच्या माणसाने अतिरिक्त सत्यप्रीती धरून काही निष्पाप लोकांच्या वधास अप्रत्यक्ष साह्य केले. त्यासंबंधी बोलताना श्रीकृष्ण म्हणाले, 'अर्जुना, या समयी कौशिकाने जे भाषण केले ते सत्य असले तरी दुरुक्तच होय.

या मोठ्या अधर्माचरणामुळे कौशिकाला नरकात पडावे लागले. धर्माचे सूक्ष्म तत्त्व माहीत नसल्यामुळे त्याची अशी अवस्था झाली.

ततो ऽ धर्मेण महता वाग्दुरुक्तेन कौशिकः
गतः सुकष्टं निरयं धर्मसूक्ष्मेष्वतत्त्ववित् ।।

—कर्ण. ७२, ५३

आता धर्माधर्म निर्णयाचे मर्म कोणते ते सांगतो. ऐक. कित्येक प्रसंगी धर्माचे तत्त्व मनात येणे मोठे कठीण पडते. यासाठी त्याचे बरोबर ज्ञान होण्यास तर्काची मदत घ्यावी लागते. पुष्कळ लोक असे म्हणतात की, धर्माचे तत्त्व श्रुतीतच आहे. यावर मी असे म्हणतो की, ' धर्माचे तत्त्व श्रुतीत आहे हे खरे, पण सर्वच गोष्टी श्रुतीत सांगून त्यांचा तेथे ऊहापोह केलेला नाही. प्राण्यांचा उत्कर्ष हेच धर्माचे मूलतत्त्व आहे हे ध्यानात घेऊन तर्काच्या आधाराने धर्माधर्म-निर्णय करावा. '

महाभारतातील धर्माचे स्वरूप असे अतिशय उज्ज्वल आहे. राष्ट्राच्या उत्कर्षासाठी केलेले नियम म्हणजेच धर्म हे भारतीय तत्त्वज्ञान आपण दृष्टिआड केले. धर्माधर्माचा, कार्याकार्याचा निर्णय मनुष्याने तर्काचा व स्वतःच्या बुद्धीचा आश्रय करून केला पाहिजे हे अमृतवचन आपण विसरलो. आणि देशकालपरिस्थिती-प्रमाणे धर्माचे रूप पालटावे लागते, म्हणजे समाजधारणेचे नियम बदलावे लागतात ह्या सिद्धांताकडे आपण दुर्लक्ष केले. आणि त्यामुळेच भारतवर्षाला दुर्गती प्राप्त झाली आहे व आजही होत आहे. धर्माधर्मासंबंधीचा हा व्यामोह आपण दूर सारून श्रीकृष्ण, व्यास, भीष्म या भारती पुरुषांनी उपदेशिलेल्या धर्माचे पुनरपि आचरण केले तर त्या काळी ज्या वैभवाच्या परमोच्च बिंदूला हे राष्ट्र गेले होते त्याच बिंदूला ते पुनरपि जाईल अशी आशा करण्यास मुळीच प्रत्यवाय नाही.

● ● ●

# २. महाभारतातील समाजकारण

## समाजकारण

भारतीय तत्त्ववेत्त्यांचे धर्मकारण किती उज्ज्वल होते, राष्ट्रघटनेस व राष्ट्राच्या उत्कर्षास ते कसे पोषक होते आणि आज समाजात जे प्रबल विचारप्रवाह वाहात आहेत तेच त्या वेळी कसे वाहात होते ते मागे दाखविले. आता महाभारतातील समाजकारणाच्या सिद्धांताचा विचार करावयाचा आहे. तो विचार आपण केला म्हणजे असे दिसून येईल की, भारतीयांनी समाजरचनेसंबंधी सांगितलेले सिद्धांतही राष्ट्रहिताच्या दृष्टीने पुष्कळ प्रगतिकर व पथ्यकर असेच होते. धर्मकारणातील त्यांचे सिद्धांत आज अगदी तंतोतंत आपण अनुसरण्यास हरकत नाही असे सांगितले. या समाजकारणातील विचार तितक्याच पूर्णतेने अनुसरावे असे म्हणता येईल असे वाटत नाही. पण असे मात्र निश्चित म्हणता येते की, ती रचना जशीच्या तशी राहिली असती तर आज आलेली दुर्गती मुळीच प्राप्त झाली नसती. किंबहुना त्यांतील विचारांचा प्रभाव कमी झाला नसता व त्याच धोरणाने समाज प्रगत झाला असता तर आज आपण इष्ट अशा स्थितीला कदाचित येऊन पोचलोही असतो.

महाभारतात समाजरचनाविषयक जे मुख्य तत्त्व आहे ते म्हणजे सुप्रसिद्ध चातुर्वर्ण्याचे तत्त्व होय. ते तत्त्व जसेच्या तसे ग्राह्य व अनुकरणीय आहे असा आग्रह धरणे युक्त नाही. पण खरे म्हटले तर आज जी जन्मसिद्ध चातुर्वर्ण्याची कल्पना प्रचलित आहे ती महाभारतात इतक्या तीव्रतेने प्रतिपादिलेली नाही. वर्ण हा जन्मसिद्ध आहे असा एक अतिशय आग्रही व प्रभावी विचार महाभारतात आढळतो हे खरे आहे. तो गृहीत धरूनच भारतात वर्णधर्म बहुतेक ठिकाणी सांगितलेले आहेत हेही खरे आहे. पण एकतर वर्ण हा जन्मसिद्ध नसून गुणकर्मसिद्ध आहे असा दुसराही एक विचार महाभारतात पाचसात ठिकाणी प्रतिपादिलेला आढळतो; आणि दुसरी व विशेष महत्त्वाची गोष्ट अशी की समाजव्यवस्था करताना जन्मसिद्ध चातुर्वर्ण्य जरी महाभारतात आग्रहाने सांगितलेले असले तरी ती व्यवस्था जितकी निर्विष करता येईल तितकी करण्याचा त्यात प्रयत्न केलेला आढळून येतो. आणि आनुवंशिक गुणांवर पूर्ण श्रद्धा ज्या काळात होती त्या काळी हे विष इतके नष्ट करून समाज समतेच्या तत्त्वावर शक्य तितका सुप्रतिष्ठित करण्याचे धोरण त्या तत्त्ववेत्त्यांनी अंगीकारले यांतच त्यांच्या विचारांची थोरवी व समाजहिताविषयीची दक्षता दिसून येते.

प्रथमतः चातुर्वर्ण्यव्यवस्था काय होती ती थोडक्यात सांगतो आणि नंतर तशा स्थितीतही उच्चनीचतेचे विष तिच्यातून काढून टाकून ती व्यवस्था समाजाच्या उत्कर्षाला शक्य तितकी जास्त पोषक करण्याचा किती प्रयत्न केला होता त्याचे निरूपण करतो.

महाभारतात वर सांगितल्याप्रमाणे गुणकर्मसिद्ध चातुर्वर्ण्याचा विचार जरी काही ठिकाणी सापडत असला तरी समाजव्यवस्था

३...

ठरविताना जन्मसिद्ध चातुर्वर्ण्याचाच विचार गृहीत धरलेला आहे असे दिसते. ते कसे ते प्रथम पाहू.

कौरवपांडवांच्या युद्धांत गांधारीचे सर्व पुत्र मारले गेले. शेवटी दुर्योधन मारला गेला हे कळताच ती अतिशय शोक करू लागली. त्या वेळी तिचे सांत्वन करताना श्रीकृष्ण म्हणाले, " तू क्षत्रिया आहेस व क्षत्रियांना रणांगणात मृत्यू हाच भाग्यदायक होय. तसा मृत्यू तुझ्या पुत्रांना प्राप्त झालेला आहे. तेव्हा तू शोक करू नकोस. " या वेळी श्रीकृष्णांनी पुढील उद्गार काढले.

तपोर्थीयं ब्राह्मणी धत्त गर्भं, गौर्वोढारं, धावितारं तुरंगी ।
शूद्रा दासं पशुपालं च वैश्या, वधार्थीयं क्षत्रिया राजपुत्री ॥
—( स्त्री. २६, ५ )

ब्राह्मणस्त्री गर्भ धारण करते तो त्याने जन्माला येऊन तप करावे म्हणून. गाईने ओझी वाहणारा व घोडीने धावणारा असा गर्भ धारण केलेला असतो. त्याचप्रमाणे वैश्यस्त्री ही गोरक्षण करणारा व शूद्रस्त्री दासकर्म करणारा गर्भ धारण करते आणि क्षत्रिय राजकन्या युद्धात शत्रूला मारणारा किंवा मरणारा गर्भ धारण करिते.

श्रीकृष्णांनी येथे दिलेले मत अगदी स्पष्ट आहे. गुण हे आनुवंशावर अवलंबून असतात असा त्यांचा सिद्धांत आहे. गाय किंवा घोडी हिला विशिष्टगुणान्वितच पुत्र होतो. त्याप्रमाणे ब्राह्मणी, क्षत्रिया, वैश्या व शूद्रा यांनाही विशिष्टगुणान्वितच पुत्र होतात. त्या त्या पुत्रांचे हे गुण व त्यांचे पुढील कर्म हे गर्भामध्येच ठरलेले असते. म्हणजे ब्राह्मणत्व, क्षत्रियत्व हे गर्भापासून, म्हणजे जन्मावरूनच ठरलेले असते आणि त्या त्या पुत्रांनी काय कर्म करावयाचे हेही जन्मावरून ठरलेले आहे.

वर्णसंकराविषयी बोलताना एकदा भीष्मांनी युधिष्ठिराला पुढील प्रमाणे आपले मत सांगितले– ब्राह्मणाने चारही वर्णांच्या स्त्रिया कराव्या व क्षत्रियाने तीन वर्णांच्या स्त्रिया कराव्या. पण ब्राह्मणाला ब्राह्मण व क्षत्रिय स्त्रीच्या ठायी जी संतती होईल तीच फक्त ब्राह्मणवर्णाची होय. त्याचप्रमाणे क्षत्रियाला क्षत्रिय व वैश्य स्त्रीपासून जी संतती होईल तीच फक्त क्षत्रियवर्णाची होईल. इतर संतती सर्व मातेच्या वर्णाची होईल. ( अनुशासन अ. ४८ )

ब्राह्मण किंवा क्षत्रिय वर्ण आणि अन्य वर्णही जन्मामुळे ठरतात व त्यांचे गुण अनुवंशावर अवलंबून असतात, असे हे मत आहे. ज्याच्या ठायी ज्ञान, तप असेल तो ब्राह्मण, ज्याच्या ठायी क्षात्रतेज असेल तो क्षत्रिय असा विचार येथे सांगितलेला नाही. ( असा विचारही महाभारतात आहे. त्याविषयीची वचने पुढे द्यावयाची आहेत. ) ब्राह्मणत्व, क्षत्रियत्व हे जन्मावरच आहे असे येथे सांगितले आहे.

कौरवपांडवांच्या युद्धानंतर युधिष्ठिर राज्य सोडून संन्यास घेण्याची इच्छा करू लागला. त्या वेळी त्याला अनेकांनी उपदेश केला. त्यांत जन्मतःच तुला सन्यास विहित नाही, तुझा क्षात्रधर्म हा जन्मतःच ठरलेला आहे असे अनेक वेळा सांगितलेले आहे. अर्जुन म्हणाला, " प्राण्यांचे कर्म दैवानेच निर्माण करून ठेवलेले आहे. हे राजेन्द्रा ईश्वराने तुला ज्या प्रकारचा जन्म दिला आहे त्याप्रमाणेच तू वागले पाहिजेस.

भीष्म युधिष्ठिराला राज्य करण्याचा उपदेश करताना हेच म्हणाले–

दानमध्ययनं यज्ञं प्रजानां परिपालनम्
धर्म्यमेतदधर्म्यं वा जन्मनैवाभ्यजायथाः ।

—शां. ७५. २६

दान, अध्ययन, यज्ञ व प्रजांचे पालन ही धर्म्य असोत वा अधर्म्य असोत; ही कामे जन्मतःच तुझ्यामागे लागलेली आहेत.

पण जन्मावरच वर्ण अवलंबून आहे, या मताला यापेक्षाही बलवत्तर पुरावा भारतीयांनी सांगितलेल्या वर्णकर्म व्यवस्थेच्या विवेचनात सापडतो. वर्ण जन्मावरून ठरवावा या विचाराला विरोधी वचने काही ठिकाणी महाभारतात सापडतात हे खरे, पण प्रत्यक्ष समाजव्यवस्था करताना मात्र ती विरोधी वचने कोठेही लक्षात घेतलेली नाहीत असे स्पष्ट दिसून येते. त्या वेळी ‘वर्ण हा जन्मावरचा ठरतो,’ हा सिद्धांत गृहीत धरूनच सर्व नियम सांगितलेले आहेत. चार वर्णांची कर्मे कोणती, त्यांनी कोणते व्यवसाय करावे हे सांगताना ब्राह्मणाने अमके कर्म करावे, क्षत्रियाने अमके करावे असे सांगितलेले असते. अमके करील तो ब्राह्मण असे मत जरी कोठे सांगितलेले असले तरी समाजव्यवस्थेत त्या मताला स्थान नाही. जो सत्य अहिंसा या धर्माचे आचरण करील तो माणूस शूद्र असला तरी ब्राह्मण होय असे मत सांगितलेले आहे. पण त्यामुळे शूद्राने अध्यापन करावे, याजन करावे असे मात्र कोठेही सांगितलेले नाही. ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र हे वर्ण जन्मसिद्ध धरूनच कर्मव्यवस्था सांगितलेली आहे.

युद्धापूर्वी संजय पांडवांना ‘तुम्ही युद्ध करू नका’ असा उपदेश करू लागला. तेव्हा श्रीकृष्ण त्याला म्हणाले, ‘चारही वर्णांचे विहित व्यवसाय काय आहेत ते लक्षात घेऊन मग तू उपदेश कर. चतुर्वर्णाचे विहितधर्म असे आहेत. ब्राह्मणाने वेदाध्ययन, अध्यापन, यजन, याजन, दान व प्रतिग्रह ही कर्मे करावी. क्षत्रियाने प्रजापालन करावे. यज्ञयाग, वेदाध्ययन ही कर्मे करावी. त्याने यज्ञ चालवू नयेत व अध्यापन करू नये. संसार

करून गृहस्थाश्रमातच असावे. वैश्याने वेदाध्ययन करून शेतकी, गोरक्षण, व्यापार ही कर्मे करावी. शूद्राने ब्राह्मणांची सेवा करावी. वेद पढू नयेत. यज्ञाचीही त्याला मोकळीक नाही.'

श्रीकृष्णांनी येथे वर्णधर्म सांगितले आहेत. त्यांत ब्राह्मण, क्षत्रिय, हे वर्ण जन्मसिद्ध धरूनच त्यांची कर्मे सांगितली आहेत. अध्ययन, अध्यापन करील तो ब्राह्मण, क्षात्रतेज दाखवील तो क्षत्रिय असे तर सांगितलेले नाहीच पण उलट क्षत्रियाने अध्यापन करू नये. शूद्राने वेदाध्ययन करू नये असे सांगितलेले आहे.

न याजयेत् न तु चाध्यापयीत । एवं स्मृतः क्षात्रधर्मः पुराणः ॥
नाधीयीत प्रतिषिद्धोऽस्य यज्ञः । एवं स्मृतः शूद्रधर्मः पुराणः ॥
— उद्योग. अ. २९, २४–२७

गुणकर्मावरून जर ब्राह्मणत्व, क्षत्रियत्व ठरावयाचे असते तर क्षत्रियाने अध्यापन करू नये, याजन करू नये असे सांगण्याचे कारण नव्हते. किंवा शूद्राने वेदाध्ययन किंवा यज्ञ करू नये, असेंही सांगण्याचे कारण नव्हते. गुणकर्मावर जेथे वर्ण ठरावयाचा तेथे कोणाही व्यक्तीला कोणताही व्यवसाय, कोणतेही कर्म करण्यास मोकळीक असली पाहिजे. आणि ज्या क्षेत्रात मनुष्य तेज दाखवील त्या वर्णाचा त्याला म्हणावे असा दण्डक असला पाहिजे. पण महाभारतात तसे सांगितलेले नाही हे श्रीकृष्णाच्या वरील उद्गारांवरून दिसून येते. असे विधिनिषेध महाभारतात अनेक ठिकाणी सांगितले आहेत. वर्णाश्रमधर्माचे विवेचन करताना पितामह भीष्मांनीही हेच सांगितले आहे. 'क्षत्रियाने यज्ञ करावा पण यज्ञाचे प्रयोग चालवू नयेत, स्वतः अध्ययन करावे पण अध्यापन करू नये. संग्राम हाच क्षत्रियाचा मुख्य धर्म होय.'–(शांति अ. ६०)

एके ठिकाणी शास्त्रविरुद्ध कर्मे करणाऱ्या लोकांची राजाने

कधीही उपेक्षा करू नये असे सांगून पितामह भीष्मांनी शास्त्रयुक्त कर्मे कोणती व विरुद्ध कोणती हे सांगण्यासाठी केकय देशाच्या राजाची गोष्ट सांगितली आहे. त्या राजाला एकदा अरण्यात एका राक्षसाने धरिले. त्या वेळी, 'तुला मला धरण्याचा अधिकार नाही, कारण माझ्या राज्यात प्रजा स्वकर्मनिष्ठ आहे,' असे राजाने सांगितले. तो म्हणाला, 'अध्ययनशून्य, व्रतशून्य ब्राह्मण नाहीत. म्हणजे ते स्वकर्मनिष्ठ आहेत. त्याचप्रमाणे क्षत्रिय हे अध्ययन करितात पण अध्यापन करीत नाहीत. यज्ञ करितात पण दुसऱ्याचे यज्ञ चालवीत नाहीत. सारांश, माझ्या राष्ट्रामध्ये क्षत्रिय हे स्वकर्मनिष्ठ आहेत.'–( शां. ७७ )

या सर्व वचनांवरून महाभारतकारांनी चातुर्वर्ण्य हे जन्मसिद्ध धरूनच समाजव्यवस्था सांगितली आहे हे स्पष्ट होते. पण या मताच्या विरुद्ध असेही जिवंत विचारप्रवाह भारतात दिसून येतात म्हणून वर सांगितले आहे, त्याचे आता दिग्दर्शन करतो.

व्यक्तीचे गुण हे रक्तावर, आनुवंशावर, आईबापांच्या गुणांवर अवलंबून असतात या म्हणण्यात फारसा अर्थ नाही हे भारत-काळच्या विचारी पुरुषांच्या पुन्हा पुन्हा ध्यानी येत होते असे त्यांच्या उद्गारांवरून दिसून येते. पांडवांचा अज्ञातवास संपला. नंतर राज्य परत मिळविण्यासाठी काय उद्योग करावा याविषयी तत्पक्षीयांची सभा भरून विचारविनिमय सुरू झाला. त्या वेळी दुर्योधनापुढे पांडवांनी नमून बोलले पाहिजे असे बलराम सांगू लागले. ते सात्यकीला सहन न होऊन तो म्हणाला,

> एकस्मिन्नेव जायेते कुले क्लीबमहाबलौ
> फलाफलवती शाखे यथैकस्मिन् वनस्पतौ ।
>
> —उद्योग. ३. ३

एकाच वृक्षावर ज्याप्रमाणें फळांनी भरलेली व फलरहित अशा दोनहि प्रकारच्या शाखा असतात त्याचप्रमाणे एकाच कुळात अतिबलाढ्य व अत्यंत दुबळे असे पुरुष जन्मास येतात. श्रीकृष्ण अत्यंत बलाढ्य व बलराम दुबळे असा सात्यकीचा अभिप्राय आहे.

एकाच आईबापांच्या पोटी असे अगदी दोन टोकाचे पुत्र होऊ लागले तर माणसाचे गुण जन्मतः ठरलेले आहेत व त्यावरच त्याचे कर्म ठरून जावे, आणि क्षत्रियाने अध्यापन करू नये व शूद्राने वेदाध्ययन करू नये या म्हणण्यातला जीव निघून जातो. आणि हे ध्यानात घेऊनच भारतातील अनेक पुरुषांनी गुणांवर ब्राह्मण्य, क्षत्रियत्व अवलंबून असते असा विचार मांडलेला आहे. तो प्रभावी होऊन त्याप्रमाणे समाजव्यवस्थेत बदल झाला नाही हा भाग निराळा. पण अनुभव जमेस धरून त्याप्रमाणे विचार करणारी माणसे तेव्हा होती हें यावरून स्पष्ट दिसते.

नहुष व धर्मराज यांच्या संवादात हा विचार अगदी निश्चित शब्दांत आढळतो. ‘ब्राह्मण कोणास म्हणावे?’ असे नहुषाने विचारले तेव्हा धर्मराज म्हणाला की, ‘ज्याच्या अंगी सत्य, दान, दया, अहिंसा हे गुण दिसून येतात त्यास ब्राह्मण म्हणावे.’ त्यावर नहुष म्हणाला, ‘तुझे म्हणणे युक्त नाही. कारण सत्य, दान, क्षमा, दया, अहिंसा हे गुण शूद्राच्याहि अंगी असतात.’ त्यावर युधिष्ठिर म्हणाला,

> शूद्रे तु यद् भवेत लक्ष्म द्विजे तच्च न विद्यते।
> न वै शूद्रो भवेत् शूद्रो ब्राह्मणो नच ब्राह्मणः ।।

— वन. १८०.२५

यत्रैतत् लक्ष्यते सर्प वृत्तं स ब्राह्मणः स्मृतः ।
यत्रैतत् न भवेत् सर्प तं शूद्रमिति निर्दिशेत् ॥ २६

शूद्राच्या अंगी हे लक्षण जर दिसून आले व ब्राह्मणाच्या अंगी दिसून आले नाही तर तो शूद्रही शूद्र नव्हे व ब्राह्मणही ब्राह्मण नव्हे. तर हे सर्पा, ज्याच्या ठिकाणी वरील सत्य, अहिंसा या गुणांनी युक्त असे आचरण दिसेल तोच ब्राह्मण व ज्याच्या ठिकाणी ते दिसून येणार नाही तो शूद्र होय.

ब्राह्मणत्व किंवा शूद्रत्व हे गुणांवर व वृत्तावर अवलंबून ठेवण्याचे अगदी साधे कारण युधिष्ठिराने सांगितले आहे. तो म्हणाला, ‘ सध्या सर्व वर्णांचा संकर चालू आहे. कोणताही पुरुष कोणत्याही स्त्रीशी विवाह करतो. त्यामुळे जाती ही निवडून सांगणे फार कठीण आहे. म्हणूनच हे भुजंगश्रेष्ठा, ज्याच्या ठायी संस्कार-जन्य असे उच्च शील दिसून येईल त्याला ब्राह्मण म्हणावे, असे मी म्हणतो. ’ –( वन. १८० )

वनपर्वातील ब्राह्मण व व्याध यांच्या संवादात ब्राह्मणानेही आपले असेच मत व्यक्त केले आहे. व्याध हा पूर्वजन्मी ब्राह्मण होता. पण या जन्मीसुद्धा त्याचे आचरण ब्राह्मणाप्रमाणेच सत्य, दान, दया, अद्रोह, यांनी अलंकृत असे होते. त्यावरून ब्राह्मण त्यास म्हणाला, ‘ या जन्मीदेखील मी आपणांला ब्राह्मण समजतो. कारण ब्राह्मण हा दांभिक होऊन जर दुष्कृत्ये करू लागला तर तो शूद्रतुल्य होय. व शूद्र सत्य, दम, धर्म यांनी युक्त असे आचरण करील तर तो ब्राह्मण होय, असे माझे मत आहे. ”–( वन. २१६ )

जनकपराशरसंवादात पराशराने शूद्रासंबंधी पुढील अभिप्राय दिला आहे. ‘ हे जे मी भूतदयादि तेरा धर्म सांगितले, त्यांचे जो शूद्र यथावत पालन करितो त्याला विद्वान लोक ब्रह्मदेवाशी सजातीय

( ब्राह्मण ) मानतात. मी मात्र त्याला जगताचे प्रधानकारण जो विष्णू त्याच्याशी ( क्षत्रिय ) सजातीय मानतो.'–( शांति. २९६ )

धर्मराजाला संन्यासनिवृत्तीचा उपदेश करताना अर्जुन म्हणाला, 'राजा इन्द्र हा ब्रह्मदेवाचा पुत्र असून तो आपल्या कर्माने क्षत्रिय झाला आहे.' ( शां. २२ )

भृगु–भारद्वाज संवादात, भिन्नभिन्न वर्ण कर्मामुळे झाले असे भृगूने आपले मत दिले आहे. भृगू म्हणतो, 'जग ब्रह्मदेवाने निर्माण केले असल्यामुळे प्रथम वर्णभेद नव्हता. प्रथम सर्व ब्राह्मणच होते व मग कर्मामुळे त्यांचे भिन्नवर्ण झाले. यांपैकी जे रजोगुणी, कोपिष्ट, साहसी होते व ज्यांनी ब्राह्मणधर्म टाकिला ते क्षत्रिय झाले. ज्यांच्यात रज व तम या गुणांचे मिश्रण होते व ज्यांनी ब्राह्मणधर्म टाकून पशुपालन व कृषी हे व्यवसाय पत्करिले, ते वैश्य झाले. जे तमोगुणी असून हिंसा व असत्य यांवर आसक्त झाले आणि हव्या त्या कर्मावर उपजीविका करू लागले ते शूद्र झाले. सारांश, इत्येतैः कर्मभिर्व्यस्ता द्विजा वर्णान्तरं गताः। ( शांति. १८८. १४. ) 'आपापल्या भिन्न कर्मांमुळे मूळच्या ब्राह्मणांपासून भिन्न भिन्न वर्ण निर्माण झाले.' याच संवादात पुढे भारद्वाजाने, ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र हा भेद कशाच्या योगाने होतो ते मला सांगा' असे विनविल्यावरून भृगू म्हणाला, 'जो पुरुष जातकर्मादी संस्कारांनी शुचिर्भूत होऊन वेदाचे अध्ययन-अध्यापन करतो, जो सदाचारसंपन्न व सत्यनिष्ठ आहे तो ब्राह्मण होय. जो हिंसाजनक कृत्ये करतो, वेदाध्ययन करतो, प्रजापालन करतो तो क्षत्रिय होय. जो व्यापार, पशुपालन, करतो व जो वेदाध्ययनसंपन्न आहे तो वैश्य होय व ज्याने वेदाचा त्याग केला आहे व अनाचार पतकरिला आहे, जो अशुद्ध व अमंगळ आहे

तो शूद्र होय. शूद्राच्या ठायी वरील सत्य अहिंसादी गुण दिसतील तर तो शूद्र नव्हे व ब्राह्मणाच्या ठायी ते दिसणार नाहीत तर तो ब्राह्मण नव्हे.'– ( शांति १८९ )

पराशर–जनकसंवादात पराशराने जनकास असेच मत सांगितले आहे. जनकाने विचारले, 'हे महामुने, मला एक संशय उत्पन्न झाला आहे, तो आपण उलगडून सांगा. संशय असा की, मनुष्याला जो हा वर्णात कमीपणा येतो तो त्याच्या कर्मांच्या हीनत्वामुळे की जातीमुळे?'

यावर पराशर म्हणतो–'हे महाराजा, या कामी कर्म आणि जाती ही उभय हीनत्वास कारण होतात. मात्र त्यात थोडा फरक आहे. तो असा की, हीन जाती व हीन कर्म ही दोन्ही एकाचे वाट्यास आली असली तरी त्याने जातीची पर्वा न करता हीन कर्मांचा त्याग करावा म्हणजे झाले. कारण, जातीने हीन असूनही जर तो दुष्ट कर्म न करील तर त्यास उत्तम पुरुषांत गणण्यास काहीच हरकत नाही. बरे, याचे उलट जातीने उत्तम असूनही पुरुष जर निंद्य कर्म करील तर ते कर्म त्याला हीनत्व आणील. यावरून पाहता जातीपेक्षा कर्मांचे हीनत्व अधिक बाधक होते.'–( शांति. २९६ )

याप्रमाणे वर्ण हे जन्मसिद्ध की कर्मसिद्ध यासंबंधी महाभारतकारांचे विचार काय आहेत ते आपण पाहिले. यात असे दिसले की, भारतीय तत्त्ववेत्त्यांच्या मते प्रधानतः वर्ण हे जन्मसिद्ध आहेत आणि ते तसे गृहीत धरूनच त्यांनी समाजव्यवस्था सांगितली आहे. आता वर्ण हे कर्मसिद्ध आहेत हा विचारही मधून मधून अनेकांनी व्यक्त केला आहे आणि काही मोठ्या तत्त्ववेत्त्यांनी तो मान्यही केला आहे. पण ते एक मत म्हणून त्यांनी फक्त मान्य

केलेले आहे. समाजव्यवस्था करताना हे मत त्यांनी विचारात घेतलेले नाही. शूद्र हा सत्य, अहिंसा इत्यादी गुणांनी युक्त असे आचरण करील तर तो ब्राह्मण होय, असे म्हटले आहे. पण त्याने याजन करावे किंवा अध्यापन करावे असे मात्र कोठेही सांगितलेले नाही. त्यांचप्रमाणे कर्माने तो क्षत्रिय झाल्यास क्षत्रिय स्त्रीशी विवाह करण्यास त्याला हरकत नाही असेही कोठे सांगितलेले नाही. उलट याचा तीव्र निषेधच केलेला आहे.

आनुवंशावरील दृढ विश्वास हे या व्यवस्थेचे मुख्य कारण आहे असे दिसते. मातापित्यांचे गुण वंशपरंपरेने अपत्यांत संक्रान्त होतात असे त्यांना वाटत होते. माणसाचे गुण रक्तावर अवलंबून आहेत आणि रक्तात भेसळ झाली तर ते गुण नष्ट होतील असे त्यांचे मत होते. लोभी पुरुषाचा पुत्र लोभी होतो व रागद्वेषहीन पुरुषाचा पुत्र रागद्वेषहीन होतो, ( शां. २६३. ९ ) असे मानण्या-पर्यंत कोठे कोठे हा आनुवंशावरील विश्वास गेलेला आहे आणि विशिष्ट जातीतच विशिष्ट गुण असतात हा सिद्धांत धरून व्यवस्था केलेली आहे. वर्णसंकर झाल्यास हे गुण नष्ट होतील अशी भीती या तत्त्ववेत्त्यांच्या मनांत असल्यामुळे त्यांनी वर्णसंकराचा अतिशय तीव्र शब्दात निषेध केला आहे. वर्णसंकराची भीती महाभारत-कारांना काही कल्पनातीत वाटत होती असे दिसते. कारण सर्व जगात वर्णसंकर हे एकच महत संकट आहे असे मानूनच काही ठिकाणी त्यांनी विवेचन केले आहे. युद्धामुळे होणारा मोठा अनर्थ म्हणजे वर्णसंकर होय; वर्णसंकर होऊ न देणारा राजा तो उत्तम राजा; अव्यवस्था होऊन वर्णसंकर होऊ लागल्यास वाटेल त्याने हातात शस्त्र घ्यावे व हे भयंकर अरिष्ट टाळावे. इत्यादी उद्गारांवरून वर्णसंकराचे भय त्यांना किती वाटे ते दिसून येते.

मात्र वर्णसंकराची आपल्या मनात जी कल्पना रूढ आहे ती त्यांच्या मनांत नव्हती. त्यांना फक्त प्रतिलोम संकराची भीती वाटत होती. म्हणजे ब्राह्मणाने क्षत्रिय, वैश्य व शूद्र स्त्रीशी, क्षत्रियाने वैश्य व शूद्र स्त्रीशी, वैश्याने शूद्र स्त्रीशी विवाह करण्यास त्यांची हरकत नव्हती. पण क्षत्रिय पुरुष व ब्राह्मण स्त्री, वैश्य पुरुष व ब्राह्मण किंवा क्षत्रिय स्त्री व शूद्र पुरुष व ब्राह्मण, क्षत्रिय आणि वैश्य स्त्री असे विवाह त्यांना मान्य नव्हते. फक्त जातीतच लग्ने झाली पाहिजेत असा आजचा दंडक तेव्हा नव्हता.

आता गुण हे जर रक्तावरच अवलंबून आहेत असे असेल तर क्षत्रियाचे अंगी ब्राह्मणाचे गुण का दिसावे, शूद्राचे अंगी केव्हा केव्हा ब्राह्मणाचे सत्य, अहिंसादी गुण किंवा क्षत्रियाचे शौर्य, साहस हे गुण दिसतात त्याचे काय, असा प्रश्न त्यांच्यापुढे वारंवार येत असला पाहिजे. आणि असे गुण दिसले तर त्यांना ब्राह्मण किंवा क्षत्रिय म्हणावे असे त्यांनी उत्तर दिले. पण त्यामुळे समाजव्यवस्था बदलावी असे वाटण्याइतपत त्या मताला दृढता आहे असे त्यांना वाटले नाही.

भारतीय तत्त्ववेत्त्यांनी जन्मसिद्ध चातुर्वर्ण्य जमेस धरून समाजव्यवस्था केली हे जरी खरे असले तरी अशा व्यवस्थेमुळे उत्पन्न होणारे जे दोष ते समाजव्यवस्थेत शिरू न देण्याचे त्यांनी आटोकाट प्रयत्न केले होते. आणि यातच त्यांचे वैशिष्ट्य दिसून येते. त्यांनी वर्ण जन्मसिद्ध मानला तरी योग्यता मात्र जन्मावर कधीही अवलंबून ठेवावयाची नाही असे त्यांचे निश्चित मत होते. क्षत्रियकुळात पुरुष जन्माला आला म्हणून तो क्षत्रिय असे धरून त्याने युद्ध, प्रजापालन ही कार्ये करावी असे त्यांनी सांगितले आहे. पण ही कार्ये त्याने न केली तरी केवळ जन्मामुळे त्याला

मान द्यावा असे भारतीयांनी कधीही सांगितले नाही. तेच ब्राह्मणां-संबंधी आहे. ब्राह्मणवर्ण हा जन्मावरून गृहीत धरून ब्राह्मणाने यजन–याजन इ. कार्ये करावी असा दंडक घातलेला आहे. पण ब्राह्मणाने आपली कार्ये केली नाहीत तरी केवळ जन्मामुळेच त्याला श्रेष्ठ मानावे ही मनुस्मृतीतली समाजहिताला अत्यंत घातक अशी कल्पना त्यांना स्वप्नातसुद्धा शिवलेली दिसत नाही.

गुण हे जन्मसिद्ध धरून त्या अन्वये कार्ये ठरवून देणे हे तत्त्व समाजाला बाधक आहेच, पण त्यापेक्षाही केवळ जन्मामुळे, गुण प्रकट झाले नसताही, उच्चनीचताही ठरविली तर ते धोरण मात्र समाजाचा घात केल्यावाचून राहात नाही आणि भारतीय तत्त्व-वेत्त्यांनी या घातक धोरणाचा कधीही पुरस्कार केलेला नाही. जन्मावर वर्ण ठरवून त्या अन्वये पदाधिकार ठरविले तर दोन प्रकारचे दोष निर्माण होतात. एक म्हणजे ज्यांच्या अंगी गुण नाहीत ते पदाधिकारी होऊन बसतात व त्यामुळे घात होतो व दुसरा म्हणजे ज्यांच्या अंगी गुण आहेत त्यांना पदाधिकार मिळत नाही व त्यांच्या गुणांचा विकास होत नाही. क्षत्रिय कुळात जन्मलेले सर्वच पुरुष धैर्य-शौर्य गुणांनी युक्त असतात, ज्ञानाची लालसा, धनार्जनाची बुद्धी हे गुण त्यांच्या ठायी नसतातच असे नाही. आणि वैश्य कुळात जन्मलेल्या पुरुषांच्या अंगी धनोत्पादनाचे सर्व गुण असतात आणि क्षत्रियाचे किंवा ब्राह्मणाचे गुण नसतात असेही नाही. त्यामुळे शौर्य धैर्य नसलेल्या क्षत्रियाला राजपद किंवा सेनाध्यक्षाचे पद देणे म्हणजे नालायक माणसाला पदाधिकार देणे होय व ते गुण अंगी असणाऱ्या वैश्याला तो न देणे म्हणजे त्याच्या गुणविकासाला संधी न देणे होय. या दोन्ही गोष्टी समाजाला घातक आहेत. यांपैकी नालायक माणसाला पदाधिकार

देणे हा जो दोष तो भारतीय तत्त्ववेत्त्यांनी समूळ नष्ट केला आहे आणि गुणी माणसाच्या गुणविकासाला संधी न मिळणे हा दोष शक्य तितका नष्ट व्हावा अशी योजना केली आहे. हे त्यांनी कसे घडविले ते आता पाहावयाचे आहे.

भीष्म सांगतात, ' हे राजा, ब्राह्मणांना इन्द्रियदमन, शुचिर्भूतपणा व सरलत्व हे धर्मविहित आहेत. जो ब्राह्मण इंद्रियदमन करतो, जो सदाचारसंपन्न, दयाशील, सहिष्णू, निरिच्छ, असा असतो, तोच खरा ब्राह्मण होय. हे गुण नसलेला ब्राह्मण ब्राह्मण नव्हेच. दुराचारी, शास्त्रविरुद्ध कर्मे करणारा, दुष्ट असा ब्राह्मण शूद्र होतो. राजा त्याने वेदजप केला असला किंवा नसला तरी तो शूद्रतुल्य असल्यामुळे त्याला दासाच्या योग्यतेचे भोजन द्यावे व त्याला देवकृत्यात वर्ज्य मानावे ( जपन् वेदानजपंश्चापि राजन्। समः शूद्रैर्दासवच्चापिभोज्यः। एते सर्वे शूद्रसमा भवन्ति। राजन्नेतान्वर्जयेत् देवकृत्ये ॥ शां. ६२, ५ )' पितामह भीष्मांनीच ब्राह्मणभेदकथन करताना असे सांगितले आहे की,

जन्मकर्मविहीना ये कदर्या ब्रह्मबन्धवः।
एते शूद्रसमा राजन् ब्राह्मणानां भवन्त्युत ॥
अश्रोत्रियाः सर्व एते सर्वे चानाहिताग्नयः।
तान् सर्वान् धार्मिको राजा बलिं विष्टिंच कारयेत् ॥

—शां. ७६, ७ व ८

ब्राह्मणजन्मास योग्य अशा कर्मांचा त्याग करणारे जे कृपण ब्राह्मण ते शूद्रसम होत, तसेच वेदाध्ययन न करणारे व अग्न्याधान न करणारे जे ब्राह्मण तेही सर्व शूद्रतुल्यच असल्यामुळे धर्मनिष्ठ राजाने त्यांच्याकडून कर घ्यावा व त्यांना वेठीच्या कामालाही लावावे.

व्यासांनीही ब्राह्मणजन्माच्या सार्थकाविषयी बोलताना हाच अभिप्राय व्यक्त केला आहे.

ब्राह्मणस्य तु देहोऽयं न कामार्थाय जायते
इह क्लेशाय तपसे, प्रेत्य त्वनुपमं सुखम् ।
—( शां. ३२१,२३ )

ब्राह्मणाचा देह सुखोपभोगासाठी निर्माण झालेला नाही. इहलोकी क्लेश भोगून तपाचरण करण्यासाठी ब्राह्मण जन्मला आहे. असे केल्यानेच त्यास परलोकी निरुपम सुख मिळेल.

ब्राह्मणाला शिक्षा करण्यासंबंधी व त्याच्या वध्यत्वासंबंधीही महाभारतकारांनी असाच अगदी निःपक्षपाताने निर्णय दिला आहे. एके ठिकाणी ब्राह्मणाने मोठा अपराध केला असला तरी त्याला शरीरदंड करू नये, त्याला फक्त हद्दपार करावा असे भीष्मांनी सांगितले आहे. ( शां. ५६ ) पण व्यासांनी याहीपुढे जाऊन अशा ब्राह्मणाचा वध करावा असे सांगितले आहे. व्यास म्हणतात ' युधिष्ठिरा, वेदपारंगत असणारा ब्राह्मणही शस्त्र घेऊन वध करण्याच्या इच्छेने आला तर त्याचा युद्धामध्ये वध करावा. त्यामुळे ब्रह्महत्येचे पातक लागत नाही. हे कुंतीपुत्रा, अशा प्रकारचा मंत्रच वेदामध्ये आहे. वेदप्रमाणमूलकच धर्म मी तुला सांगत आहे. ' ( शां. ३४ ) अश्वमेध करण्याचा उपदेश युधिष्ठिराला करीत असताना व्यासांनी ब्राह्मणाच्या वध्यत्वासंबंधी सोदाहरण विवेचन केले आहे. ते म्हणाले, ' पूर्वी देव-दैत्यांचे युद्ध चालू असता देवांनी दैत्यांना ठार करून स्वर्ग मिळविला आणि त्याच वेळी दर्पामुळे विचारशून्य झालेले, शालावृक नावाने त्रैलोक्यात प्रसिद्ध असलेले वेदपारंगत असे ब्राह्मण दानवांना साह्य करण्यासाठी त्यांच्या आश्रयाला जाऊन राहिले होते. तेव्हा हे भरतकुलोत्पन्ना, देवांनी

त्या अठ्याऐशीं हजार ब्राह्मणांचाही वध केला. त्याप्रमाणे धर्माचा उच्छेद व्हावा अशी इच्छा करणारे, अधर्मप्रवर्तक लोक असतील तर त्या दुरात्म्यांचाही वध केला पाहिजे. '–(शां. ३३)

ब्राह्मणाविषयी हे जें धोरण सांगितले आहे त्यावरून उच्च-नीचता ही जन्मावर ठेवावयाची नाही फक्त गुणांवर ठेवावयाची हे भारतीयांचे धोरण अगदी स्पष्टपणे दिसून येते.

ब्राह्मणाप्रमाणेच क्षत्रियांसंबंधीही धोरण आहे. प्रजेचे पालन करणे, शत्रूपासून तिचे रक्षण करणे, व उत्कृष्ट दंडनीती प्रस्थापून धर्माचा उत्कर्ष करणे हे राजाचे व क्षत्रियांचे कर्तव्य होय. हे कर्तव्य जे बजावणार नाहीत ते क्षत्रियच नव्हेत असे महाभारतात अनेक ठिकाणी सांगितले आहे.

योहि तेजो यथाशक्ति न दर्शयति विक्रमात्
क्षत्रियो जीविताकांक्षी स्तेन इत्येव तं विदुः ॥

— उद्योग. १३४.२

जीवाच्या आशेने जो क्षत्रिय पराक्रम करण्याचे टाळतो, व यथाशक्ती आपले तेज प्रगट करीत नाही, तो क्षत्रिय नसून चोर आहे असे म्हटले पाहिजे, असे विदुलाराणीने आपल्या पुत्रास सांगितले आहे. त्याचप्रमाणे—

रक्षणं सर्व भूतानामिति क्षात्रं परं मतम् ।

— शां. १२०.३

सर्व प्राण्यांचे संरक्षण करणे हा क्षत्रियाचा मुख्य धर्म होय, असे शास्त्रांचे मत आहे. असे पितामह भीष्मांनी सांगितले आहे. क्षत्रियाच्या धर्मासंबंधी महाभारतात अशी शेकडो वचने आहेत. आणि शांतिपर्वातील राजधर्मपर्व हे तर त्यासाठीच आहे. प्रवृत्तीधर्माच्या विवेचनात त्याचे साकल्याने विवेचन येणार असल्यामुळे येथे विस्तार

करीत नाही. मथितार्थ येवढाच आहे की क्षत्रियाचीही योग्यता केवळ जन्मावर अवलंबून ठेवलेली नव्हती.

ब्राह्मण किंवा क्षत्रिय हे प्रथमतः जन्मामुळे ब्राह्मण किंवा क्षत्रिय ठरत असले तरी त्यांचे खरे ब्राह्मणत्व किंवा क्षत्रियत्व हे त्यांच्या कर्मावरच अवलंबून आहे असे महाभारतकारांचे मत होते हे यावरून निःसंशय दिसते. पण याहीपेक्षा त्यांचे विशेष अभिनंदनीय धोरण, त्यांनी क्षत्रिय ब्राह्मणांमध्ये काडीचीही उच्चनीचता नाही, दोन्ही वर्ण पूर्णसम आहेत, हे तत्त्व प्रस्थापित करण्याचा जो अट्टाहास केला आहे, त्यात दिसून येते.

'ब्राह्मण व क्षत्रिय हे राष्ट्राचे सारखेच पालक आहेत', 'ब्राह्मणाचे भाग्य क्षत्रियावर व क्षत्रियाचे ब्राह्मणावर अवलंबून आहे', 'समाजाला दोघांचीही अत्यंत जरूर आहे' असे विचार महाभारतात अनेक ठिकाणी आहेत. राजा म्हणजे प्रत्यक्ष देवच असेही सांगितलेले आहे, त्याचप्रमाणे ब्राह्मण हेही देव आहेत असेही म्हटलेले आहे. ब्राह्मणांची उत्पत्ती क्षत्रियापासून झाली असे म्हणून लगेच क्षत्रियांची उत्पत्ती ब्राह्मणापासून झाली असेही मत व्यक्त केले आहे. धर्मविवेचन करताना मात्र क्षात्रधर्म सर्वांत श्रेष्ठ असे अनेकवार सांगितले आहे आणि ते युक्त कसे आहे याचे विवेचन अन्यत्र केले आहे.

मुचकुंदाने कुबेराचा पराभव केल्यावर त्यास सांगितले की, "ब्राह्मण व क्षत्रिय हे ब्रह्मदेवाने सख्खे बंधूच निर्माण केले आहेत. त्यांचे सामर्थ्य व उद्योग ही अलग अलग झाली तर प्रजेचे पालन होणार नाही. तप व मंत्र यांचे बल सदैव ब्राह्मणांच्या ठायी निश्चलपणे वास्तव्य करीत असते आणि अस्त्रबल व बाहुबल ही क्षत्रियांच्या ठायी सदैव स्थिरपणे राहात असतात. ब्राह्मण व

क्षत्रिय या उभयतांनी प्रजेचे पालन केले पाहिजे." हे मुचकुंदाचे उद्गार युधिष्ठिराला सांगून भीष्म म्हणतात, 'ब्राह्मणांच्या हातीं सदैव सुखदुःख देण्यास समर्थ असे उदक असते व क्षत्रियांच्या हाती शस्त्र असते. जगतामध्ये जे काही आहे ते सर्व या उभयतांच्या म्हणजे ब्राह्मणांच्या व क्षत्रियांच्या अधीन आहे.–( शांति अ. ७४)

ऐलकश्यप संवादात कश्यपमुनी ऐलाला म्हणाले—

एतौ हि नित्यं संयुक्तौ इतरेतरधारणे ।
क्षत्रं वै ब्रह्मणो योनिर्योनिःक्षत्रस्य वै द्विजाः ॥

—शा. ७३. ४९.

ब्राह्मण व क्षत्रिय हे परस्परांशी मिळून असले म्हणजे त्यांचे पोषण होते. क्षत्रिय हे ब्राह्मणांचे उत्पत्तिस्थान असून ब्राह्मण हे क्षत्रियांचे उत्पत्तिस्थान आहे.

पितामह भीष्मांचेही असेच मत आहे. ते म्हणतात, 'युधिष्ठिरा, ईश्वराने ब्राह्मण व क्षत्रिय हे उभयता समान अंतःकरण असलेले परस्परांचे मित्र म्हणून निर्माण केले आहेत. ब्राह्मण व क्षत्रिय या उभयतांचा सन्मान केल्यास प्रजेला सुखप्राप्ति होते व त्या उभयतांचा अपमान केल्यास प्रजेचा निःसंशय नाश होतो. ब्राह्मण व क्षत्रिय हेच सर्व प्रजेला मूलभूत आहेत. ( ब्रह्मक्षत्रं हि सर्वासां प्रजानां मूलमुच्यते. –शां. ७३. ४३ )

जुन्या ग्रंथांत ब्राह्मणाला देव पदवी दिलेली आढळते. पण त्याचप्रमाणे क्षत्रियालाहि दिलेली आढळते हे विसरून चालणार नाही. मांधात्याला उपदेश करताना इंद्र म्हणाला, "सर्व लोकांचा गुरूच अशा राजाचा जो अपमान करतो त्याने दिलेले दान व त्याने केलेले यज्ञ व श्राद्ध यांचे फल मिळत नाही. मनुष्यांचा अधिपति,

इतकेच नव्हे तर मूर्तिमंत आणि सनातन देवच असा जो धर्मा-भिलाषी राजा त्याचा अपमान देव देखील करीत नाहीत. भगवान ब्रह्मदेवाने सर्व जग निर्माण केले, तथापि त्याची सत्कर्माकडे प्रवृत्ती व दुष्कर्मापासून निवृत्ती झाली पाहिजे, एतदर्थ त्याला क्षत्रियांची अपेक्षा वाटली. धर्माची प्रवृत्ती झाली म्हणजे त्याचे फल काय मिळते, याचे ज्याच्या बुद्धीला ज्ञान असते तोच राजा मान्य व पूज्य होय, आणि तोच क्षत्रिय धर्माचा खरा आधार होय.—(शांति, अ. ६५)

युधिष्ठिराने एकदा पितामह भीष्मांना विनविले की, हे भरत-कुलश्रेष्ठा, मनुष्यांचा अधिपति जो राजा त्याला ब्राह्मण लोक देवता का मानतात, ते मला सांगा. तेव्हां भीष्मांनी त्याला बृहस्पतीने वसुमना राजास सांगितलेले विचार सांगितले.

बृहस्पती म्हणाला, ' हे नरश्रेष्ठा, राजा हाच लोकांच्या धर्माचे मूळ आहे असे दिसून येते. राजाने पालन केले नाही तर वेदत्रयांचे अस्तित्व नष्ट होईल. ब्राह्मण वेदाध्ययन करणार नाहीत, लोक अनीतीने वागू लागतील, सर्वत्र वर्णसंकर होईल व राष्ट्रात दुर्भिक्ष येईल. म्हणून हा एक मनुष्यच आहे असे समजून राजाचा केव्हाही अवमान करू नये. कारण ती एक मनुष्याचे रूप धारण करणारी देवता आहे. जो मनुष्य राजाचे वाईट व्हावे अशी इच्छा करीत तो इहलोकात क्लेश पावून मरणोत्तर नरकास जाईल. ' —( शां. ६८ )

क्षत्रिय व ब्राह्मण हे अशा रीतीने सर्व राष्ट्राचे आधारस्तंभ आहेत. ते एक असतील तर शत्रूचा निःपात करतील व त्यांच्यात जर फूट झाली तर राष्ट्राचा नाश होईल, असे भारतीय तत्त्व-वेत्त्यांचे मत आहे.

ब्रह्म क्षत्रेण सहितं क्षत्रं च ब्रह्मणा सह
संयुक्तौ दहतः शत्रून् वनानीवाग्निमारुतौ ।
—वन. १८५, २५

ब्राह्मणास क्षत्रियाचे व क्षत्रियास ब्राह्मणाचे साहाय्य असले म्हणजे ते उभयता मिळून, ज्याप्रमाणे अग्नी आणि वायू हे परस्परांचे साह्य करून वन जाळून टाकतात, त्याप्रमाणे शत्रूंचा नाश करतात.

महाभारतातील महान धर्मवेत्ता सनत्कुमार याचे हे उद्गार आहेत. क्षत्रिय व ब्राह्मण हे दोन्ही वर्ण असे सम असले आणि ब्राह्मणधर्म व क्षात्रधर्म या दोहोंची राष्ट्राला सारखी गरज असली तरी राष्ट्राचे रक्षण हे अत्यंत महत्त्वाचे असल्यामुळे भारती तत्त्ववेत्त्यांना क्षात्रधर्माची महती जास्त वाटते हे निःसंदिग्ध शब्दात त्यांनी सांगितले आहे.

भीष्म म्हणतात, 'हे पांडुपुत्रा, लोक व वेद या दोहोंमध्ये ज्यांना श्रेष्ठ मानले आहे असे चारही आश्रमांचे धर्म व यतिधर्म या सर्वांना क्षत्रिय धर्म हाच आधार आहे. हे भरतकुलश्रेष्ठा, ही सर्व कर्मे क्षत्रिय धर्मावरच अवलंबून आहेत. क्षत्रियधर्म सुव्यवस्थितपणे चालत असेल तर मनुष्यांच्या सर्व कामना पूर्ण होतात. या एका क्षात्रधर्मामध्ये सर्व धर्म प्रविष्ट झालेले आहेत म्हणून हाच धर्म श्रेष्ठ होय.'

राजा मांधाता यास उपदेश करताना सुरेश्वर इंद्राने पुढील विवेचन केले आहे.

पूर्वी श्रीविष्णूने क्षात्रधर्माचेच अवलंबन करून शत्रूंचा निःपात करून, बलसंपन्न अशा देवांचे व ऋषींचे रक्षण केले.

यदि ह्यसौ भगवान् नाहनिष्यत्
रिपून् सर्वान् असुरान् अप्रमेयः।
नच ब्रह्मा नैव लोकादिकर्ता
सन्तो धर्माश्चादिधर्माश्च न स्युः।

—शां. ६४. २३

जर त्या अप्रमेय अशा विष्णूने शत्रूंचा वध केला नसता तर, ब्राह्मण जिवंत राहिले नसते, लोक राहिले नसते, आदिकर्ता भगवान ब्रह्मदेवही शिल्लक राहिला नसता, हा धर्म राहिला नसता व सनातन आर्यधर्मही राहिला नसता.

नष्टा धर्माः शतधा शाश्वतास्ते
क्षात्रेण धर्मेण पुनः प्रवृद्धाः
युगे युगे ह्यादिधर्माः प्रवृत्ता
लोकज्येष्ठं क्षात्रधर्मं वदन्ति।

—शां. ६४. २४

शाश्वत अशा धर्मांचा शेकडो वेळा लोप झालेला आहे. पण क्षात्रधर्माच्या योगाने पुनरपि त्याची अभिवृद्धी झाली. हे आदिधर्म प्रत्येक युगात प्रवृत्त होतात. पण क्षात्रधर्म हाच सर्व लोकांत श्रेष्ठ धर्म होय.

ब्राह्मण, वैश्य व शूद्र हे आपापल्या धर्मापासून च्युत झाले तर त्यांना स्वधर्माचे ठायी आणून ठेवणे हे क्षत्रियांचे कर्तव्य आहे. म्हणूनच राजधर्म हाच सर्वांत श्रेष्ठ होय. इतर कोणताही नाही.—( शां. ६५.१२ )

अत्री व गौतम यांच्या वादाचा निर्णय देताना सनत्कुमाराने पुढीलप्रमाणे विवेचन केले आहे :

' राजा हाच सुप्रसिद्ध असा धर्म असून तोच प्रजापती, इंद्र, शुक्र, जगताचे पोषण करणारा धाता आणि बृहस्पती आहे. राजा धर्माचा प्रवर्तक असल्यामुळे सर्वांस मुख्यत्वेकरून कारणीभूत आहे, म्हणूनच त्याला पुरायोनी म्हणजे प्राथमिक कारण असे म्हणतात. ज्याप्रमाणे आकाशदेवतांमध्ये वास्तव्य करणारा सूर्य अंधकाराचा नाश करतो, त्याप्रमाणे भूमीवर वास्तव्य करणारा नरपती हा अधर्माचा अत्यंत नाश करतो. यामुळे व शास्त्र प्रामाण्यावरूनही राजाला प्राधान्य आहे, असे सिद्ध होते.–(वन १८५)

अशा या क्षात्रधर्माची लक्षणे कोणती ?

इंद्र म्हणतो ––

**आत्मत्यागः सर्वभूतानुकम्पा**
**लोकज्ञानं पालनं मोक्षणंच**
**विषण्णानां मोक्षणं पीडितानां**
**क्षात्रे धर्मे विद्यते पार्थिवानाम् ।**

––शां. ६४. २६

सर्व प्राणिमात्राविषयी अनुकम्पा, स्वार्थत्याग, राष्ट्राविषयी पूर्ण ज्ञान, लोकांचे पालन, संकटग्रस्तांना मुक्त करणे, गांजलेल्यांची पीडा दूर करणे ही क्षात्रधर्मनिष्ठ राजाची कर्तव्ये होत.

क्षात्रधर्म हा असा थोर पण तितकाच कठीण असल्यामुळे ' तुझा देह कष्टासाठी आहे ' हे जसे ब्राह्मणाला वेदव्यासांनी बजाविले आहे ( शां. ३२१. २३ ), त्याचप्रमाणे ब्रह्मवेत्ता उतथ्य याने क्षत्रियांनाही

**धर्माय राजा भवति न कामकरणाय तु ।** शांति ९०.३

राजाची–क्षत्रियांची–उत्पत्ती धर्मरक्षणासाठी आहे, विलासासाठी नाही – असे बजाविले आहे.

ब्राह्मण व क्षत्रिय यांच्याप्रमाणेच वैश्यांचे महत्त्वही भारतीय तत्त्ववेत्ते पूर्णपणे जाणून आहेत. पुढील प्रवृत्तिधर्मप्रकरणी धनाचे भारतीयांना किती महत्त्व वाटत होते, धनावरच सर्व धर्म अवलंबून आहे असे त्यांना का वाटत होते, याचे सविस्तर विवेचन केलेले आहे. त्यावरून वैश्यांचे त्यांच्या मते किती महत्त्व आहे हे कळून येईल. कृषी, वाणिज्य हा सर्व राष्ट्राचा प्राण आहे हे महाभारतात अनेक ठिकाणी सांगितलेले आहे.

भीष्म म्हणतात,

' वार्तामूलो ह्ययं लोकस्तया वै धार्यते सदा
तत्सर्वं वर्तते सम्यग् यदा रक्षति भूमिपः।।
—शां. ६८.३५

सर्व जग हे शेती व व्यापार यावरच अवलंबून आहे. त्यामुळेच जगाचे पालनपोषण होत असते. राजा जेव्हा राष्ट्राचे पालन करीत असतो तेव्हाच यांची व्यवस्था ठीक असते.

कोशसंचयाचे महत्त्व युधिष्ठिराला सांगताना पितामह भीष्मांनीच पुन्हा एकदा कृषि-वाणिज्याचे महत्त्व सांगितले आहे. ते म्हणाले, हे राजा, कृषी-गोरक्षण, व्यापार आणि अशाच प्रकारचे जे दुसरे कर्म असेल ते अनेक लोकांकडून करवावे. नाही तर ती कर्मे नष्ट होऊन जातील. कृषी-पशुपालन व व्यापार करू लागलेल्या मनुष्याला चोर अथवा अधिकारी यांच्यामुळे त्रास होत असेल तर त्यामुळे राजाच निंदेस पात्र होतो. राजाने अन्नपान आणि वस्त्रे यांच्या योगाने सदैव द्रव्यसंपन्न लोकांचा बहुमान करावा. हे भरत-कुलोत्पन्ना, द्रव्यसंपन्न पुरुष हे राज्याचे मोठे अंग आहे. म्हणून तो सर्व प्राण्यांचे केवळ मूर्धस्थान आहे यात शंका नाही. ( ककुदं सर्व भूतानां धनस्थो नात्र संशयः । -शां. ८८·३०) सारांश—

कृषिगोरक्ष्यवाणिज्यं लोकानामिह जीवनम् । —शां. ८९.७
शेती, गोरक्षण, व व्यापार यावरच जगाची प्राणयात्रा अवलंबून आहे हे सत्य महाभारतकार कधीहि न विसरल्यामुळे वैश्यांचीही महती त्यांनी कमी लेखलेली नाही. राजाने कृषिवाणिज्याची काळजी घेणे किती महत्त्वाचे आहे हे नारदाने युधिष्ठिराला केलेल्या बोधावरून स्पष्ट होईल. नारद म्हणाले, "युधिष्ठिरा, राष्ट्रातील कृषी निवळ पर्जन्याच्या पाण्यावर अवलंबून असू नये. शेतकीसाठी मोठमोठे तलाव विशिष्ट अंतरावर नित्य उदकाने परिपूर्ण राहतील अशी व्यवस्था करावी. अशी व्यवस्था तू केली आहेस ना? हे नरश्रेष्ठ कृषीचा उत्कर्ष व्हावा यासाठी कृषीवलांची सुस्थिती राखण्याकडे राजाने लक्ष पुरविले पाहिजे. त्याजपाशी पोटगी व बीभरणा भरपूर आहे की नाही याची राजाने चवकशी करावी व एकोत्रा व्याजापेक्षा अधिक व्याज न घेता त्यास कर्ज द्यावे. बा धर्मा, तू हीच पद्धती ठेविली आहेस ना?"

वैश्यांचे महत्त्व भारतीय तत्त्ववेत्त्यांना किती वाटत होते हे दुसऱ्या एका प्रकाराने कळून येईल. राजाने अमात्य कोणचे व कसे नेमावे हे सांगताना भीष्मांनी सांगितले आहे की विद्यानिष्ठ प्रौढ, शुचिर्भूत असे चार ब्राह्मण अमात्य असावे. शस्त्रधारी, बलिष्ठ असे अठरा क्षत्रिय अमात्य असावे आणि

वैश्यान् वित्तेनसंपन्नानेकविंशति संख्यया
त्रींश्च शूद्रान् विनीतांश्च शुचीन् कर्माणि पूर्वके ।
—शां. ८५.८

धनसंपन्न असे एकवीस वैश्य तुझे अमात्य असावे. त्याचप्रमाणे नित्यकर्माचरण करून शुचिर्भूत झालेले तीन शूद्र अमात्य असावे

अमात्यपदी बहुसंख्य वैश्य असावे असे सांगितले आहे. त्यावरून त्यांचे राष्ट्रात कोणते स्थान होतें ते कळून येईल.

शूद्रासंबंधी मात्र भारतीयांच्या मनांत समतेची भावना नाही. ब्राह्मण, क्षत्रिय व वैश्य यांच्याबरोबरीला त्याला त्यांनी आणलेला नाही. तो त्रैवर्णिकांचा दास आहे असेच मत आहे. पण यासंबंधी एक गोष्ट लक्षांत वागविली पाहिजे. आज हिंदुस्थानात शेतकऱ्यांचा वर्ग फार मोठा आहे. त्यांना कोणतेही कारण नसताना शूद्र लेखण्यात येते हे अगदी अशास्त्रीय व धर्मविरुद्ध आहे. कृषिगोरक्ष्य करणारे ते सर्व लोक वैश्य आहेत व वेदाध्ययन, यज्ञ, वेदोक्तकर्म यांचा त्यांना आजच्या ब्राह्मणांइतकाच अधिकार आहे. तेव्हा शूद्र म्हणताच त्यांचा विचार डोळ्यांपुढे आणणे हे अयुक्त होय. त्याहून जे इतर राहिले ते शूद्र होत. त्यांच्याबद्दल भारतीयांना समतेची भावना नव्हती हे वर सांगितलेले आहेच. पण आज समाजात त्यांच्याबद्दल जी हीन भावना आहे तीही त्या काळीं नव्हती असे म्हणण्यास वाटेल तितकी प्रमाणे आहेत. महाभारत वाचताना असे निश्चित वाटू लागते की शूद्रांनाही हळूहळू या समाजात सामील करून घेऊन कालांतराने त्यांना एकजीव करून घ्यावे असेच धोरण भारतीयांचे होते.

शूद्राने सत्य, अहिंसा, दान इत्यादी धर्मांचे प्रतिपालन केले तर तो शूद्र ब्राह्मणाच्या बरोबरीचा होतो असे धर्म, पराशर, भृगू इ. थोर तत्त्ववेत्त्यांचे मत होते हे वर सांगितलेच आहे. त्याचप्रमाणे प्रधान निवडताना तीन शूद्र प्रधान राजाने निवडावे असे भीष्मांनी सांगितल्याचेही वर आलेच आहे. पण शूद्राना संन्यास यज्ञयाग व तप ही निषिद्ध नाहीत, विहित आहेत असेही भारती तत्त्ववेत्त्यांनी अनेक ठिकाणी सांगितलेले आढळते.

गृहस्थाच्या तपोविधींचे विवेचन करतांना पराशर म्हणतात,

तपः सर्वगतं तात हीनस्यापि विधीयते
जितेन्द्रियस्य दान्तस्य स्वर्गमार्गप्रवर्तकम् ।

—शां. २९५. १४

'जनका, हे तप सर्वांस विहित आहे. ते शूद्रांनाही विहित आहे. जो जितेंद्रिय व संयमी आहे तो कोणीही असला तरी त्याला तप हे स्वर्गप्राप्तिकारक ठरेल.'

शूद्राला काही अटीवर यज्ञाधिकार आहे असे पितामह भीष्मांनीच सांगितले आहे. वर्णाश्रमधर्मकथन करतांना युधिष्ठिरास ते म्हणाले, 'हे भरतकुलोत्पन्ना, ब्राह्मणादी तीन वर्णांना व शूद्रालाही यज्ञाचा अधिकार आहे. स्वाहाकार, वषट्कार व वैदिकमंत्र हे तीन मात्र शूद्राला वर्ज्य आहेत. यास्तव शूद्राने अमंत्रक पाकयज्ञ करावे. या पाकयज्ञाची दक्षिणा दोनशेछपन्न मुठी धान्य होय असे सांगितले आहे. पैजवन नामक शूद्राने अमंत्रक यज्ञ करून एक लक्ष पूर्णपात्रे दक्षणा दिली असे आम्ही ऐकिले आहे.

यज्ञाप्रमाणेच संन्यासाचाही अधिकार शूद्राला आहे असे भीष्मांचे मत आहे. वास्तविक भारतीयांच्या मते ब्राह्मणाखेरीज इतर कोणीही हा संन्यासधर्म स्वीकारू नये असे आहे. त्याचे विवेचन प्रवृत्तिधर्मांत केले आहे. पण क्वचित् इतरांनाही संन्यास जेथे विहित म्हणून सांगितला आहे तेथे तो शूद्रालाही आहे.

भीष्म म्हणतात, "हे पृथ्वीपते, वेदांतश्रवणाची ज्याला इच्छा आहे, जो स्वकर्मनिष्ठ आहे व ज्याला राजाने अनुज्ञा दिली आहे अशा शूद्राला सर्व आश्रम विहित आहेत. म्हणूनच पूर्वी सांगितलेल्या स्वधर्माचे आचरण ज्याने केले आहे अशा शूद्राला, वैश्याला व क्षत्रियालाही संन्यासाश्रम विहित आहे."

वर्ण जन्मसिद्ध मानून भारतीयांनी जरी समाजव्यवस्था केली होती तरी ही व्यवस्था शक्य तितकी निर्विष करून टाकण्यासाठी त्यांनी किती दक्षता घेतली होती हे यावरून कळून येईल. गुण रक्तनिष्ठ असतात हा आनुवंशातील विचार (जो अजूनहि युरोपात लोकांना झपाटून राहिला आहे ) आणि वैदिक मंत्रांचे काही दैवी अनाकलनीय पावित्र्य यांवरील श्रद्धा, यांमुळे त्यांनी काही विषम वाटणारी बंधने घातली होती. पण तरी ही बंधने समाजोत्कर्षाच्या आड येऊ नयेत अशी शक्यतो खबरदारी त्यांनी घेतली होती असे दिसते.

या भारतीय तत्त्ववेत्त्यांची दृष्टी राष्ट्रीय कशी होती, अगदी कडक व शाश्वत मानलेले धर्मनियमही राष्ट्रकल्याणासाठी झुगारून देण्यास ते मागेपुढे कसे पाहत नसत हे पुढील उताऱ्यावरून दिसून येईल.

युधिष्ठिराने एके प्रसंगी भीष्मांस विचारले, 'पितामहा, दस्यू अनार्य इत्यादी शत्रूंचे सैन्य चालून आले असता व सर्वत्र गोंधळ माजून राहिला असता ब्राह्मण, वैश्य किंवा शूद्र यांपैकी कोणी शस्त्रधारण करून प्रजेचे रक्षण केले तर त्याने पुढे राजकार्य करावे की नाही ? तो प्रजांचा अधिपती होऊ शकतो की नाही ? यावर भीष्मांनी पुढीलप्रमाणे उत्तर दिले आहे. समाजव्यवस्थेच्या बुडाशी अंतिम धोरण काय असावे हे त्यावरून स्पष्ट होते. भीष्म म्हणाले, ' राजा, अपार व नौकाशून्य अशा संकटरूपी समुद्रामध्ये जो मूर्तिमंत नौकाच झालेला असतो तो जरी शूद्र असला किंवा अन्य कोणी असला तरी त्याचा सर्वथैव सन्मान करणेच योग्य आहे.

अपारे यो भवेत् पारमप्लवे यः प्लवो भवेत्
शूद्रो वा यदि वाप्यन्यः सर्वथा मानमर्हति ।

—शां. ७८.३८

शत्रूंनी पीडित केल्यामुळे अनाथ होऊन लोक ज्याची मार्गप्रतीक्षा करतात व ज्याच्या आश्रयामुळे सुखाने नांदतात त्याचाच त्यांनी प्रेमाने आपल्या बांधवाप्रमाणे सन्मान करावा. हे कुरुकुलोत्पन्ना, संकटाचा नाश करणाऱ्या पुरुषाचा पुनः पुनः सन्मान करणे अवश्य आहे. लाकडाचा हत्ती, कातड्याचा हरिण, पीक न देणारे शेत, व तेजोहीन पुरुष ज्याप्रमाणे निरुपयोगी असतात त्याचप्रमाणे अध्ययन न करणारा ब्राह्मण, प्रजापालन न करणारा राजा आणि वृष्टी न करणारा मेघ हे व्यर्थ होत. म्हणून

नित्यं यस्तु सतो रक्षेदसतश्च निवर्तयेत्
स एव राजा कर्तव्यः तेन सर्वमिदं धृतम् ।

—शां. ७८.४४

जो नेहमी सज्जनांचे रक्षण करील व दुष्टांचे पारिपत्य करील त्यालाच–तो कोणत्याहि वर्णाचा असला तरी–राजपद दिले पाहिजे. त्याच्याच बलामुळे सर्व राष्ट्राचे धारण होत असते.

वर्णधर्म कितीही कडक असले तरी राष्ट्रोत्कर्षाच्या आड ते येत असतील तर त्यांची मुळीच प्रतिष्ठा नाही हेच धोरण या वचनातून दिसून येते. आणि ‘ प्रभवार्थाय भूतानां धर्मप्रवचनं कृतम् । यः स्यात् प्रभवसंयुक्तः स धर्म इति निश्चयः ॥ धर्मनियम हे राष्ट्राच्या उत्कर्षासाठी केलेले असून ज्यामुळे राष्ट्रोत्कर्ष होईल तोच धर्म होय हे तत्त्व ध्यानी वागवूनच भारतीयांनी समाजव्यवस्था केली होती. पारलौकिक कल्पनेला प्राधान्य देऊन धर्म म्हणजे काही अनाकलनीय, अदृष्ट असा पुण्यसाठा मिळविण्याचा मार्ग असे ते समजत नव्हते, हे यावरून निर्विवाद सिद्ध होते.

# ३. महाभारतातील व्यवहारनीती अथवा राजनीतिशास्त्र

## व्यवहारनीती अथवा राजनीतिशास्त्र

भारताच्या राष्ट्रीय प्रपंचात सध्या अनेक बिकट समस्या निर्माण झाल्या आहेत. पाकिस्तानावर व भारतातील पाकिस्तानी वृत्तीवर आपण किती गाढ प्रेम करावे, पाण्याच्या प्रश्नात, कर्जाच्या प्रश्नात, आपल्या देशातून पाकिस्तानला लोहमार्ग करून देण्याच्या प्रश्नात स्वराष्ट्राचे अहित करूनही प्रत्येक वेळी पाकिस्तानला झुकते माप किती द्यावे, एकपक्षी करार किती पाळावे, केवळ शब्द दिला होता म्हणून बेरुबारीचा टापू पाकिस्तानला देणे योग्य आहे काय, रशिया, चीन यांच्या राज्यकर्त्यांवर किती विश्वास ठेवावा, आपल्या व्यापाऱ्यांना चीनने उधळून लावले असतानाही भारतातील चिनी व्यापाऱ्यांवर आपण किती प्रेम करावे, चीनने आक्रमण केले असताना चीनशी सहानुभूती दाखविणाऱ्या लोकांना अत्यंत महत्त्वाची सरकारी अधिकारपदे द्यावी की नाही; नेपाळ, भूतान येथील कटकटी दूरदृष्टीने जाणून त्यांना भारतात सामील करून टाकणे इहलोकी व परलोकी

कितपत पुण्यप्रद होईल; रशिया, इजिप्त यांच्या मैत्रीवर किती प्रमाणात विश्वास ठेवावा, आपल्या देशात येऊन गोड भाषणे करून जाणाऱ्या परदेशी पाहुण्यांची आश्वासने आपण कितपत मानावी, स्वराष्ट्रापेक्षाही सर्व जगाच्या कल्याणाची चिंता भारताला जास्त आहे, असा गौरव ते करतात त्याने आपण कितपत भुलून जावे; सत्य न्याय, अहिंसा यांचाच अखेरीस जय होतो असा दृढ विश्वास धरून आपण किती निश्चिंत राहावे, असे व या प्रकारचे अत्यंत जटिल व गहन प्रश्न आपल्यापुढे उभे आहेत अत्यंत आश्चर्याची गोष्ट अशी की असल्या राजनैतिक समस्यांची महाभारतात जी चर्चा आहे व तिच्या आधारे तेथे जे सिद्धांत सांगितले आहेत ते वाचीत असताना ती चर्चा आजचे प्रश्न प्रत्यक्ष डोळ्यासमोर ठेवूनच केलेली आहे असे वाटते. शेकडो वर्षे झाली तरी मानवी स्वभाव अणुमात्र बदललेला नाही असे हा भाग वाचताना आपल्या प्रत्ययास येत असते. आणखी एक गोष्ट ध्यानात येते. अमेरिका, रशिया, चीन, ब्रिटन, फ्रान्स, जर्मनी ही सर्व राष्ट्रे महाभारत डोळ्यासमोर ठेवूनच पदोपदी वागत आहेत; श्रीकृष्ण, भीष्म, नारद यांचेच सिद्धांत त्यांनी शिरोधार्य मानले आहेत याची पदोपदी खात्री पटत असते. मन व्याकुळ करणारी आणखी एक गोष्ट आहे. महाभारतातील राजनीतीच्या या सिद्धांताना हेटाळणारा, त्या थोर व्यवहार-विशारदांच्या मतांना तुच्छ मानणारा, आणि त्या इतिहास-पुनीत तत्त्वांची दरक्षणी पायमल्ली करणारा जगात एकच देश आहे. तो कोणता? महाभारत जेथे जन्माला आले तो आपला भारत!

आजच्या या सत्य-अहिंसा-पंचशीलांच्या काळात महाभारताचा अभ्यास करण्यास सांगणे हे सुद्धा भारतीयांना अपमानास्पद

वाटण्याचा संभव आहे. तरी पण या प्राचीन ग्रंथात राजनीती-सारख्या अत्यंत गहन शास्त्राचा विचार तरी कसा केला आहे हे कुतूहल म्हणून तरी भारतीयांनी पाहावे असा माझा आग्रह आहे. आणि त्या हेतूनेच पुढील विवेचन केले आहे.

## समस्या

महाभारतात पुढीलप्रमाणे अगदी विरुद्ध अर्थाची वचने अनेक ठिकाणी सापडतात.

१. सर्वभूतहितः साधुः असाधुः निर्दयः स्मृतः । वन.२१३।९२

सर्व भूतांच्या हितासाठी झटतो तो साधू व निर्दयतेने वागतो तो असाधू ( दुष्ट ) होय.

२. वेदाऽहं तव या बुद्धिः अनृशंस्या अगुणैव सा । शां. ७५

तुझ्या बुद्धीला, क्रूरत्वाचा स्पर्शही नाही हे मी जाणून आहे. पण अशा प्रकारची बुद्धी व्यर्थ होय.

एका ठिकाणी दयेची महती सांगितली आहे तर दुसऱ्या ठिकाणी क्रूरत्वावाचून सर्व व्यर्थ होय असे म्हटले आहे.

त्याचप्रमाणे पुढील वचने पाहा—

१. ना(सौ) धर्मो यत्र न सत्यमस्ति ।

न तत् सत्यं यत् छलेनाभ्युपेतम् । –उद्योग ३५।५८

ज्यात सत्य नाही तो धर्म नव्हे व जे कपटाने दूषित असेल ते सत्य नव्हे.

२. कृतं मम अप्रिय तेन येनायं निहतो मृधे

इति वाचा वदन् हंतॄन् पूजयेत रहोगतः ।–शां. १०२।३७

या शत्रुवीराचा लढाईत ज्याने वध केला त्याने माझे अत्यंत अप्रिय केले आहे, मला दुखविले आहे असे बाह्यतः म्हणावे, पण अंतस्थ रीतीने त्या शत्रूला मारणाऱ्याचा गौरव करावा.

सत्य नसेल, कपट असेल तर तो धर्मच नव्हे, असे एकदा सांगितले आहे, पण अन्यत्र कपटाचरणाचा, असत्याचा जाणून-बुजून उपदेश केला आहे.

ही परस्परविरुद्ध, अत्यंत विसंगत अशी वचने पाहिली म्हणजे महाभारतात कशाचा नेमका उपदेश करावयाचा आहे हे ध्यानात येणे कठीण होऊन बसते. अशी वचने एक दोन ठिकाणी असतीं तर ती उपेक्षणीय म्हणून सोडून देता आली असती. पण तसे नाही. अशी विरोधी वचने महाभारतात शेकड्यांनी सापडतील. बरे ही वचने काही सामान्य माणसांच्या तोंडीच आहेत असे नाही. तर श्रीकृष्ण, भीष्म, व्यास यांसारख्या थोर प्रज्ञावंत पुरुषांनी केलेला हा उपदेश आहे. अर्जुन हा धर्मराजाला मारण्यास सिद्ध झाला त्या वेळी, 'अहिंसा हा माझ्या मते सर्वांत श्रेष्ठ धर्म होय,' असे कृष्णाने त्याला सांगितले.–( कर्ण ६९ ); उलट कर्णवधप्रसंगी त्याने काय उपदेश केला ? अर्जुनाच्या एका बाणाने कर्ण घायाळ होऊन मूर्च्छित झाला. तेव्हा अशा स्थितीत त्याच्यावर दुसरा बाण टाकून त्याला ठार मारणे अर्जुनाला प्रशस्त वाटेना. तेव्हा श्रीकृष्ण त्याला म्हणाला, 'अर्जुना, तू वेडा तर नाहीस ना ? अरे, शत्रू दुर्बल झाले म्हणजे केव्हाही ज्ञानी लोक त्यांचा नाश करण्यास विलंब लावीत नाहीत. बाबा रे शत्रूचा वध करणे तो विशेषेकरून तो संकटात असतानाच केला पाहिजे. शहाण्याने अशा स्थितीत शत्रूचा नाश केल्यास त्याजकडून धर्माचरण घडून शिवाय त्यास कीर्तीही मिळते, यास्तव, हे अर्जुना, तुझा बलाढ्य शत्रू जो कर्ण त्याला वधण्याची त्वरा कर.' –( कर्ण ९० ).

पितामह भीष्मांनी तर एके ठिकाणी असे स्पष्ट सांगितले आहे की " विजयाची इच्छा करणारे राजे धर्म व अधर्म या दोहोंचेंही

अवलंबन करून वागत असतात. केवळ धर्माचे अवलंबन केल्यास त्यांची कार्यसिद्धी होत नाही. "–( शांति ८० ).

अशी अनेक विसंगत, विरोधी वचने पाहिली म्हणजे ही नकळत, किंवा दुर्लक्षामुळे झालेली गोष्ट नसून त्या परस्पर-विरोधात काही तरी मोठा अर्थ आहे, असा उपदेश करण्यामध्ये या थोर पुरुषांचा काही तरी हेतु आहे असे निश्चित वाटू लागते. तो हेतु काय आहे व या विसंगतीचा अर्थ कसा लावायचा ते आता आपण पाहणार आहोत.

सत्य, अहिंसा, दया, क्षमा, शरणागताला अभय, ही अत्यंत श्रेष्ठ धर्मतत्त्वे होत यात शंकाच नाही. आणि मानवजातीला या तत्त्वांच्या उपदेशाचीच जास्त जरूर आहे हेही खरे आहे. पण जगात मानवी व्यवहाराकडे पाहिले म्हणजे अनेक वेळा असे ध्यानात येते की, प्रसंगी काही लोकांशी व्यवहार करताना या तत्त्वांच्या आचरणाला मुरड घातली नाही तर त्या तत्त्वांचा जो मूल-हेतू तोच विफल होतो. अहिंसेचे तत्त्व आपण निरपवाद रीतीने पाळू म्हटले तर त्यायोगे अहिंसा तर नाहीच पण उलट सर्व आप्तस्वकीयांची व शेवटी आपलीही हिंसा होण्याची वेळ येते. म्हणूनच आत्यंतिक अहिंसा हे शुद्ध पापकर्म असून हिंसा हा धर्म आहे असे श्रीकृष्णासारख्यांना सांगणे भाग पडते.

भारती युद्धानंतर धर्मराजा हा त्या युद्धातील हिंसेच्या कल्पने-मुळे फार विव्हल झाला. तो म्हणाला, 'पितामहा, मी युद्धामध्ये असंख्य वीरांचा वध केला आहे आणि त्यांच्याविषयीचा विचार पुनः पुन्हा अंतःकरणात येऊन मला ताप होत आहे. या संहारामुळे ज्यांना आज पुत्र, पति आणि बंधू यांचा कायमचा वियोग झाला आहे त्या श्रेष्ठ स्त्रियांची काय बरे अवस्था होईल!

खरोखर आपल्या पुरुषांचा वध करणाऱ्या आम्हा पांडवांना शिव्याशाप देत त्या कृश व दीन स्त्रिया भूतलावर व्याकुळ होऊन पडतील; अथवा हे द्विजश्रेष्ठा, आपले पती, बंधू आणि पुत्र हे नाहीसे झालेले पाहून सर्वही स्त्रिया वात्सल्यामुळे प्राणत्याग करून यमनगरीस जातील आणि असे झाले म्हणजे धर्म हा सूक्ष्म असल्यामुळे आम्हांला स्त्रीवधाचे पातक लागेल.

धर्मराजाचा हा विचार खरोखर मोठा उदात्त आहे व तो पाहून मानवी मन असेच असावे, शत्रूंच्या स्त्रियांबद्दलही त्याला असेच कारुण्य असावे, यातच भूषण आहे, असे वाटू लागते. पण त्याबरोबरच हा विचार युधिष्ठिराने खरोखरच अमलात आणला असता तर काय झाले असते याचा जर आपण विचार करू लागलो तर ती उदात्तता टिकत नाही. शत्रूंना मारले तर त्यांच्या स्त्रिया विधवा होतील या भीतीने जर कोणी शत्रुवध करण्याचे नाकारील तर तो शत्रू त्या अहिंसापालकांच्या पक्षाच्या स्त्रियांना विधवा केल्यावाचून राहणार नाही. शत्रूच्या पोरांबाळांची दया केली, तर आपली पोरेबाळे अनाथ होण्याचा प्रसंग येतो. जगाचा न्याय असा कठोर असल्यामुळेच भारतीय थोर तत्त्ववेत्त्यांनी या धर्माच्या थोर तत्त्वांचा मोठा खोल विचार करून त्याच्या अगदी योग्य अशा मर्यादा कोणत्या त्या दाखवून दिल्या आहेत.

अहिंसा, सत्य, दया यांचा एकांतिक उपदेश करणाऱ्याला जगात मोठी कीर्ती मिळते, सर्वत्र त्याची प्रशंसा होते, शत्रूही त्याचे गुणगान करितात हे खरे; पण प्रत्यक्ष व्यवहारात पाहिले तर असे दिसते की या प्रतिपादनामुळे तो स्वकीयांचा शत्रू ठरतो व त्यांच्या नाशाला कारण होतो. म्हणूनच या तत्त्वांच्या मर्यादेचे उल्लंघन करू नये असे महाभारतात सांगितले आहे.

## द्विविधनीती : गृहनीती व परनीती

या मर्यादेमुळेच नीतीला द्विविध रूप येते. एक गृहनीती व एक परनीती. आपला देश, राष्ट्र किंवा राज्य यातील जे लोक किंवा कोणत्याही अन्य कारणाने ज्यांना आपण स्वकीय समजतो, ज्यांचे आपले सुखदुःख एक आहे असे आपण समजतो, त्यांच्याशी वागण्याचे जे नियम, जे धोरण, ती गृहनीती व ज्यांना आपण परकीय समजून शत्रुसम लेखतो—मग ते कोठलेही असोत—त्यांच्याशी वागण्याचे जे नियम ती परनीती होय. त्यांतील पहिल्या प्रकारच्या म्हणजे गृहनीतीमध्ये सत्य, न्याय, अहिंसा, दया, क्षमा या तत्त्वांचा जितका उत्कर्ष होईल तितका भूषणावहच होय असे भारतीय तत्त्ववेत्त्यांचे मत आहे. ज्यांना आपण स्वकीय म्हटले त्यांच्यासाठी कोणताही त्याग हा कमीच ठरेल. असा त्याग करणे हा आपला धर्मच आहे. त्याला जो सिद्ध होणार नाही तो मानव अधम होय असे महाभारतात ठायी ठायी सांगितलेले आढळते. उलट जो शत्रू आहे, जो आज ना उद्या आपला, आपल्या प्रजेचा, राष्ट्राचा घात करील अशी आपली खात्री आहे त्याच्याशी वागताना कोणत्याही प्रकारच्या सत्यासत्याचा, धर्माधर्माचा विचार करू नये, जितके कठोर, क्रूर, कपटी होता येईल तितके होऊन शत्रूचा नायनाट करावा आणि असे करण्यातच धर्माचरण आहे असा भारती तत्त्ववेत्यांनी मोठ्या निर्भयपणे उपदेश केला आहे.

## पृथक् क्षेत्रे

महाभारतप्रणीत गृहनीतीचा प्रथम विचार करून नंतर आपण परनीतीचा परामर्श घेऊ. येथे जी गृहनीती किंवा परनीती सांगितली आहे ती मुख्यतः राजाला म्हणजे राष्ट्राच्या पालनकर्त्याला उद्देशून

सांगितलेली आहे. व्यक्तीने ते सिद्धांत जसेच्या तसे अनुसरावे असे म्हटल्यास अर्थाचा अनर्थ होईल. " जी कृत्ये आम्ही राष्ट्रासाठी करतो ती आम्ही स्वतःच्या वैयक्तिक संसारासाठी केली तर आम्ही बदमाष ठरू. " असे काव्हूरने म्हटले आहे. महाभारतातील हे नीतिप्रकरण वाचताना हेच धोरण ठेविले पाहिजे. प्रजेचे पालन करणे, राष्ट्रात उत्तम व्यवस्था ठेवणे, शासन व्यवस्थित चालू ठेवून बळी तो कानपिळी हा जो मात्सन्याय तो नष्ट करून टाकणे, प्रजा उत्सन्न न होऊ देणे, हे राजाचे आद्यकर्तव्य होय. ते त्याने न केले तर असे पातकच नाही की जे लोक करणार नाहीत. त्यामुळे जगावर कल्पान्त ओढवेल, सर्वच धर्म उत्सन्न होऊन जाईल, माणसे पशू होतील. म्हणून काय वाटेल ते करून शासन हे टिकविलेच पाहिजे, असा भारतकारांचा कटाक्ष आहे. ते टिकविल्यानंतर त्याच्या कक्षेच्या आत मानवाने आपल्या मनाची उदारता, त्यागवृत्ती जितकी व्यापक करणे शक्य आहे तितकी करावी, तोच खरा धर्म होय असे महाभारताचे प्रतिपादन आहे. इतकेच नव्हे तर शत्रुभाव धारण करणारे लोक वगळून बाकीच्या विश्वातील सर्व मानवांच्यापर्यंत आपल्या औदार्याची कक्षा विस्तृत करावी असाही उपदेश त्यांनी केला आहे.

महाभारतात हे प्रकरण राजाला उद्देशून आहे म्हणून वर सांगितले. सध्याच्या युगात राष्ट्रकार्याची जबाबदारी प्रत्येकावर आहे. मागल्या काळी ती फक्त राजावर होती. तेव्हा राजाला जी तत्त्वे सांगितली आहेत ती राष्ट्रकार्यार्थ सांगितली आहेत हे ध्यानात घेऊन राष्ट्रकार्य करणाऱ्या प्रत्येक व्यक्तीने ही गृहनीती व परनीती अनुसरिली पाहिजे. ती व्यक्तीसाठी नाही याचा अर्थ ती व्यक्तीच्या खासगी संसारासाठी नाही. राष्ट्रीय संसारात पडणाऱ्या प्रत्येक

व्यक्तीला तिचा अवलंब करणे अवश्यच आहे. त्यातूनही व्यक्तीला खासगी संसारात सर्वथा निषिद्ध अशी फक्त परनीतीच होय. गृहनीतीचे रूप इतके उदात्त आहे की प्रत्येक व्यक्ती ती आपल्या खासगी संसारात आचरणात आणील तर पृथ्वीवर स्वर्ग अवतरण्यास मुळीच वेळ लागणार नाही.

त्याचप्रमाणे आणखी एक गोष्ट ध्यानात ठेविली पाहिजे. स्वकीय कोण व परकीय कोण याचे काही निश्चित असे नियम ठरले आहेत असे समजणे चूक होईल. साधारणतः आपल्या समाजाचे रक्षण, त्याचा उत्कर्ष यांच्या आड जो येईल तो ' पर ' व यासाठी जो साह्य करील तो ' स्व ' असा दंडक मानता येईल. श्रीशिवछत्रपतींना राष्ट्रकार्य करावयाचे असल्यामुळे चंद्रराव मोरे, बाजी घोरपडे यांनाही पर मानून त्यांचा वध करावा लागला. आपला सावत्र भाऊ व्यंकोजी यावर चाल करावी लागली. इतकेच नव्हे तर दिलीरखानाला मिळून संभाजीने भूपाळगडला वेढा घातला त्या वेळी त्याच्यावर गोळा टाकला नाही म्हणून फिरंगोजी नरसाळ्याची निर्भर्त्सना राजश्रींना करावी लागली. यावरून 'स्व' आणि 'पर' चा उलगडा होईल. पांडव व कौरव हे भाऊ भाऊ होते. असे असून श्रीकृष्णाने कौरवांना परनीती कशी लागू केली अशी शंका येईल म्हणून हे विवेचन केले आहे. पण या विवेचनात खोल जाण्याचे हे स्थळ नव्हे. ज्यांना आपण ' स्व ' मानतो त्यांच्याशी कोणत्या नीतीने वागावे व ' पर ' मानतो त्यांच्याशी कसे वागावे याचे विवेचन येथे आहे. ' स्व ' कोण व 'पर' कोण हे ठरविणे हे स्वतंत्र शास्त्र आहे.

## गृहनीती

गृहनीतीमध्ये पितामह भीष्मांनी राजाला व पर्यायाने सर्व

राष्ट्रहितचिंतकांना पुढीलप्रमाणे उपदेश केला आहे. ‘ राजाने सदैव गर्भिणी जसे आपल्या गर्भाचे पालन करते त्याप्रमाणे प्रजेचे पालन केले पाहिजे. ज्याप्रमाणे गर्भिणी आपल्याला स्वतःला प्रिय असलेल्या गोष्टींचा त्याग करून आपल्या गर्भाला हितकारक तेच करिते त्याप्रमाणे, कुरुश्रेष्ठा, धर्माच्या अनुरोधाने वागणाऱ्या राजानेही निःसंशय तसेच वागले पाहिजे. म्हणजे आपल्याला इष्ट असतील त्या गोष्टींचा त्याग करून जी जी गोष्ट लोकहिताची असेल ती ती त्याने केली पाहिजे. ज्ञानसंपन्न अशा राजाने चारही वर्णांवर सदैव दया केली पाहिजे. राजा धर्मात्मा व सत्यवक्ता असेल तरच प्रजेचे रंजन होते.—’ ( शांति ५६ ). ‘ कोप न करणारा, व्यसनशून्य, सौम्य शिक्षा करणारा आणि जितेन्द्रिय असा राजा असला म्हणजे हिमालयपर्वताप्रमाणे तो लोकांच्या विश्वासास पात्र होतो. ज्याच्या राज्यात प्रजा आपल्या पित्याच्या घरात असल्याप्रमाणे निर्भयपणे संचार करीत असतात तोच राजा सर्वांत श्रेष्ठ होय. ज्याच्या राज्यामध्ये वास करणारे लोक आपल्या कर्मामध्ये आसक्त, केवळ आपल्या शरीरावरच प्रेम न करणारे, वश्य, शिक्षा मान्य करणारे, आज्ञेत राहणारे, दुसऱ्याला पीडा देण्याची इच्छा न करणारे आणि सत्पात्री दान करण्याची आवड असलेले असे असतात तोच खरा पृथ्वीपती होय.—’ ( शांति ५७ ) ‘ राजाची उत्पत्ती धर्मासाठीच आहे; आपल्या इच्छा तृप्त करण्यासाठी नाही. जो लोकांचे संरक्षण करतो तोच राजा होय हे तू लक्षात ठेव. धर्म हा सर्व प्राण्यांना आधारभूत असून राजा हा धर्माला आधार आहे. ’ असा आंगिरस कुलोत्पन्न उतथ्यमुनीने उपदेश केला आहे. ( शांती ९० ) त्याच-प्रमाणे वामदेवाने असे सांगितले आहे की, ‘ राजाने ( कोणाही राष्ट्रहितचिंतकाने ) लोकांनी प्रार्थना केल्यावाचून त्यांचे प्रिय

करावे.'–( शांती ९३ ). 'जो राजा उत्कृष्टपणे वागणाऱ्या लोकांशी असत्याचरण करतो त्याचा आत्मा परशूच्या योगाने छिन्न झालेल्या वनाप्रमाणे त्या कर्माच्या योगाने क्षीण होतो.'

गृहनीतीत राजापुढे हे जसे विशाल व उदात्त ध्येय ठेविलेले आहे त्याचप्रमाणे व्यक्तीपुढेही ठेविलेले आहे.

भुञ्जते ते त्वघं पापा ये पचन्त्यात्मकारणात् । ६,२७,१३

'जे केवळ आपल्यासाठीच अन्न शिजवितात ते पातकी लोक त्या अन्नाच्या रूपाने पापच भक्षण करितात.'

ही शिकवण फारच उदात्त अशी आहे. आपण अन्न खात असताना आपल्या अनाथ, दरिद्री बांधवांची आठवण ठेविली पाहिजे, न ठेवणे हा मोठा अधर्म होय असे येथे सांगितले आहे. मानवधर्माचे हे खरोखर सारच आहे. परनीतीत अहिंसा, सत्य या तत्त्वांना मर्यादा पडतात असे सांगितले असले तरी गृहनीतीत तसा प्रकार मुळीच नाही. 'अहिंसा, सत्य भाषण, सर्वांशी सरळपणाची वागणूक, क्षमा व सावधानता हे गुण ज्याच्यापाशी असतील तो सुखी होईल' असा येथे उपदेश आहे.–(शां. २१५). 'आपल्याला अनिष्ट अशी गोष्ट असेल ती दुसऱ्याच्या संबंधाने करू नये. धर्माचे संक्षिप्त स्वरूप हे असे आहे. याला सोडून असलेला तो निव्वळ स्वेच्छाचार होय.' (१३–११३–८) 'मृत्युलोकी प्राणांपेक्षा प्रियतर असे काही नाही. यास्तव मनुष्याने स्वतःप्रमाणेच दुसऱ्यावरही दया करावी' ( १३, ११६ ) 'सत्याइतका श्रेष्ठ धर्म नाही. सत्याइतके श्रेष्ठ काही नाही, आणि असत्यापेक्षा अधिक भयंकर असे काही नाही. आपणावर दुसऱ्याने केलेला उपकार जो स्मरत नाही त्याला ब्रह्महत्येचे पातक लागते'–(७, १८३, २८). 'पृथ्वीवर हिंडणारे क्षुधित लोक ज्या शूर

दानपतींपाशी आले असता संतुष्ट होऊन पुढे जातात त्याच्या धर्मापेक्षा कोणता धर्म अधिक आहे?' अशा तऱ्हेची अनेक अमृतवचने महाभारतात पदोपदी सापडतात.

भारतात ज्या अनेक कथा आहेत त्यांत जाती पंथ, प्रांत, यांच्या अतीत असलेल्या मानवधर्माची उदात्त शिकवण देणाऱ्याही पुष्कळ कथा सापडतात. शिबी अथवा उशीनर नावाच्या धर्मनिष्ठ राजाची कथा अशीच आहे. ससाण्याच्या भीतीने कपोत पक्षी त्याच्या आश्रयास आला. त्या वेळी शिबिराजाने कपोताला अभय दिले. मागून ससाणा आला व 'माझे भक्ष्य परत दिले नाहीस तर तुला अधर्म घडेल,' असे राजाला म्हणू लागला. राजापुढे मोठा पेच येऊन पडला. तरी त्याने शरणागताला अभय देण्याचे आपले थोर व्रत सोडले नाही. त्याने कपोताऐवजी आपल्या शरीरातील मांस घेण्याविषयी श्येनपक्षाला विनविले. त्याने ते मान्य करताच राजाने आपल्या शरीराचे मांस काढून तागडीत टाकण्यास सुरुवात केली आणि ते कपोताच्या वजनाइतके भरत नाही असे दिसताच त्याने आपला सर्व देह तागडीत ठेवून श्येनपक्ष्याला संतुष्ट केले.

शरणागताला दिलेले वचन पुरे करण्यासाठी आपला देह अर्पण करणाऱ्या शिबिराजाची ही कथा अतिशय उदात्त तर आहेच, पण व्याधाच्या क्षुधाशमनार्थ आपला देह अर्पण करणाऱ्या कपोत पक्ष्याची कथा त्याहीपेक्षा उदात्त आहे.

## उदात्त मानवधर्म

एकदा एका अरण्यात भयंकर वादळ झाले व प्रचंड वृष्टी झाली. पंचमहाभूतांनी इतके कराल रूप धारण केले की, सर्व जीवसृष्टी भयविव्हल होऊन गेली. अशा वेळी अनेक पक्षी घरट्यातून खाली पडले. त्यांतच एक कपोत पक्षिणीही पडली. त्या अरण्यात एक

पक्षिघातक व्याध त्याच वेळी हिंडत होता. तो थंडीने, पावसाने अगदी मृतवत झाला होता तरी तेवढ्यात त्याने त्या कपोतीला धरून पिंजऱ्यात घातले. पण पुढे त्राण न राहून तो तेथेच गारठून जाऊन भूमीवर पडला. कपोतीच्या शोधार्थ कपोत तेथे आल्यावा त्या व्याधाचा सूड घेण्यास सांगण्याऐवजी त्या कपोतीने 'हा अतिथी आहे याचा सत्कार करा' असे पतीला सांगितले. कपोताला पत्नीचे हे उदारवचन ऐकून आनंद झाला व त्याने शेकोटी करून त्या व्याधाला शेकण्याची सोय करून दिली व तो शुद्धीवर येताच 'आपणांस आणखी काय पाहिजे?' असे त्यास मोठ्या आदराने विचारले. त्यावर 'मला क्षुधा फार लागली आहे, तेव्हा मला काही खावयास दे,' असे व्याधाने सांगितले. हे ऐकून कपोत फार खिन्न झाला. कारण व्याधाला खावयास देण्यास त्याच्यापाशी काहीच नव्हते. अतिथीची इच्छा आपणास तृप्त करता येत नाही हे पाहून त्याला मनस्वी दुःख झाले. इतक्यात त्याला एक युक्ती सुचली, व तुझी क्षुधा मला माझ्या देहदानाने शांत करता येईल असे म्हणून त्याने अग्नीत उडी घातली.

ते पाहून तो व्याध पराकाष्ठेचा दुःखी झाला. आयुष्यभर केलेल्या हत्येचा त्यास पश्चात्ताप झाला. त्याचे मन शुद्ध झाले, त्याच्या साऱ्या हिंस्रवृत्ती नष्ट झाल्या व एका क्षणात त्याच्या मनात फार मोठे परिवर्तन घडून आले. हीन, अधम, हत्यारी असा तो व्याध नष्ट होऊन थोर, शुद्धचित्त व उदार असा एक नवीनच पुरुष कपोताच्या त्या आत्मार्पणातून निर्माण झाला.

कपोताची ही कथा म्हणजे परमथोर, परमउदात्त अशा मानव-धर्माचे अगदी सार आहे. मानवाच्या विशालतेची कक्षा याहून मोठी असूच शकणार नाही. अहिंसा, त्याग, सत्याने असत्य

जिंकणे, आत्मार्पणाने शत्रूला जिंकणे, पापावर पुण्याचा विजय, इत्यादी उदात्त तत्त्वांचे इतके उत्कृष्ट उदाहरण दुसरे सापडणे जवळ जवळ अशक्य आहे. आणि अशी ही कथा महाभारतात सांगून तिचा नित्य पाठ करण्याचा उपदेश केला आहे यावरून भारतीय तत्त्ववेत्त्यांची सत्यावरील भक्ती व धर्मावरील निष्ठा अत्यंत उज्ज्वल अशी होती याविषयी कोणाला शंका येण्याचे कारण रहणार नाही.

## ध्येय व व्यवहार

पण हा उदात्त उपदेश करीत असताना भारतकार हेही विसरत नाहीत की, मानवप्राणी हा इतक्या वरच्या पातळीत जवळ जवळ कधीच नसतो. कपोताने आपल्यासाठी आत्मार्पण केलेले पाहून एकदम धक्का बसून, हीनत्व सांडून आपल्या मनाचे परिवर्तन करून टाकणारे व्याध जगात बहुसंख्य नमून, कपोताने अग्नीत उडी टाकली आहे त्यामुळे त्याची बायकापोरे आयतीच आपल्या हाती सापडतील, तेव्हा याच्याबरोबर त्यांचीही होळी करून चांगले भोजन करण्यास काही हरकत नाही, असे म्हणणारे लोकच जगात जास्त असतात. आणि म्हणूनच वरीलसारखे शत्रूसाठीही आत्मार्पण करण्याचे प्रसंग अपवादभूत असतात हे विसरून त्याचा राष्ट्रीय प्रपंचात आपण उपदेश करू लागलो तर सर्व राष्ट्राची होळी झाल्याखेरीज राहणार नाही, हे भारतीय तत्त्ववेत्त्यांनी अनेकवार बजाविले आहे.

स्वकीयांसाठी असला त्याग हा दरघडी केला तरी तो अभिनंदनीयच आहे. क्वचितप्रसंगी शत्रूही अशा त्यागाने मोहित होऊन मित्र बनतो. पण ते फार क्वचित. म्हणूनच त्याच्याशी वागण्याचे नीतिनियम अगदी वेगळे होत. त्या नियमावलीलाच परनीती असे

म्हटले आहे. महाभारतातील या परनीतीचे रूप आता आपणांस पाहावयाचे आहे.

## परनीती

> न हि पश्यामि जीवन्तं लोके कंचिदहिंसया
> सत्त्वैः सत्त्वा हि जीवन्ति दुर्बलैर्बलवत्तराः ।
> —शांति. १५।२०

' युधिष्ठिरा, अहिंसा वृत्तीने जगात कोणी जिवंत राहिल्याचे दिसून येत नाही. खरोखर बलवान प्राणी आपल्याहून दुर्बल असलेल्या प्राण्यांवर उपजीविका करीत असतात. ' ध्येयवादी सत्याची एकांतिक भक्ति करणाऱ्या युधिष्ठिराला अर्जुनाने जगातील व्यवहारासंबंधीचे हे कठोर सत्य सांगितले आहे आणि हे ध्यानात घेऊनच भारतीय तत्त्ववेत्त्यांनी व्यवहारवादाचा उपदेश केला आहे.

' याप्रमाणे मी तुला हे नीतिशास्त्र सांगितले आहे. याचा पातकांशी संबंध आहे. म्हणून मनुष्याने अशा प्रकारचे आचरण सदैव करू नये. पण शत्रूने अशा आचरणाचा प्रयोग केला तर मी सांगितलेल्या नीतीचा अवलंब केल्यावाचून कसे चालेल ! तात्पर्य, हे मी तुझ्या हिताकरिता सांगत आहे. अशा प्रसंगी याच धर्माचे आचरण केले पाहिजे. ते दोषावह नाही.—' (शांति.अ. १३९) या वाक्यांत महाभारतकारांनी परनीतीची आवश्यकता व तिच्यां मर्यादा स्पष्ट करून सांगितल्या आहेत. या नीतीचा अवलंब नेहमी करावयाचा नाही, स्वकीयांशी करावयाचा नाही, ते पातक होईल. ही नीती शत्रूशी वागताना आचरावयाची आहे. त्या वेळी ती धर्मविघातक ठरत नाही.

## शत्रुसंहार अटळ

नाघ्नतः कीर्तिरस्तीह न वित्तं न पुनः प्रजाः
इन्द्रो वृत्रवधेनैव महेन्द्रः समपद्यत। –शांति. १५।१५
नाच्छित्वा परमर्माणि नाकृत्वा कर्म दारुणम्
नाहत्वा मत्स्यघातीव प्राप्नोति महतीं श्रेयम् ।
–शांति. १४० ।५०.

शत्रूचा वध न करणाऱ्या राजाला या लोकी कीर्ती लाभणार नाही, धन मिळणार नाही, आणि त्याची प्रजाही सुरक्षित राहणार नाही. इंद्रसुद्धा वृत्रासुराचा वध करूनच महेन्द्र पदवीला पोचला. शत्रूच्या मर्मस्थानावर घाव घातल्याशिवाय, भयंकर पराक्रम गाजविल्याशिवाय आणि मासे मारणाऱ्या कोळ्याप्रमाणे हत्या केल्याशिवाय राज्यलक्ष्मीचा लाभ होत नाही; असा महाभारतकारांचा राजनीतीचा पहिला सिद्धांत आहे. आणि म्हणूनच पितामह भीष्मांनी अहिंसावादी युधिष्ठिराला पुढीलप्रमाणे उपदेश केला आहे :

' राजा, – व्यवहारदृष्टीचा लोप झाला तर राजाला स्वर्गाची व कीर्तीची प्राप्ति कशी होणार? राजाने शत्रूच्या नाशाकरिता त्याच्या द्रव्यादिकांचा अपहार करावा व त्याच्या देशात प्रवेश करून तो प्रदेश दग्ध करून टाकावा. शेतांतील धान्ये जाळून टाकावी, शत्रूच्या लोकांत फाटाफूट करून त्यांच्याचकडून अथवा आपल्या सैन्याकडून त्या सर्वांचा नाश करवावा. नदीवरून गमन करण्याचे जे पूल वगैरे मार्ग असतील ते मोडून टाकावे. तलावादिकांतील सर्व जल फोडून देऊन नाहीसे करावे व ते फोडून देता येत नसेल तर विषादिकांच्या योगाने दूषित करावे. –( शां. ६९ ). हे राजा, स्वकार्य करण्याविषयी प्रवृत्त झालेल्या राजाने शत्रूंना वश करून नंतर त्यांचा वध करावा.

शत्रूंना पीडा देणाऱ्या राजाने सदैव स्वस्थ झोप घेत राहू नये. कारण ठिणग्यांचा जसा अग्नि होतो तसा पीडित केलेला शत्रूही प्रबल होऊ शकतो. विजय मिळणे अनिश्चित असल्यास शत्रूवर चालून जाऊ नये. तर, हे प्रभो, कारस्थानी अशा अमात्यांच्या साह्याने काय करावयाचे ते ठरवून, काही द्रव्य देऊन, विश्वास दाखवून शत्रूला वश करून घ्यावे व तो पराजित केलेला नाही हे मनात ठेवून त्याची आपण उपेक्षा करीत आहो असे बाहेर दाखवावे. पुढे त्याचे पाय किंचित डळमळू लागले की संधी साधून त्याजवर प्रहार करावा. विश्वासाने काम करणाऱ्या हेरांकडून त्याच्या सैन्यात फंदफितूर करावा. भेद, दान, औषधी यांची त्याजवर योजना करावी. शत्रूविषयीचा द्वेष मनांत गुप्त ठेवावा आणि संधी साधण्याची वाट पाहात राहावे. आणि संधी येताच शत्रूस ठार करावे. संधी येण्याची वाट पाहात असताना शत्रूचा आपल्यावर विश्वास बसेल अशा तऱ्हेच्या आचरणात कालक्षेप करावा. शत्रूवर एकदम शस्त्रप्रहार करू नये. विजय मिळणे अनिश्चित आहे हे लक्षात ठेवावे. शत्रूस होणारी पीडा कमी होऊ देऊ नये व कठोर शब्दांनी त्याच्या अंतःकरणास छिद्रेही पाडू नयेत. पण संधी आली की त्याजवर शस्त्रपात केल्याखेरीज राहू नये. '–( शांति. १०३ )

## कपटनीतीचा अवलंब

शत्रूचा कोणत्या ना कोणत्या उपायाने संहार केलाच पाहिजे हे महाभारतात अगदी निक्षून सांगितले आहे. तो संहार करण्यासाठी वाटेल त्या नीतीचा अवलंब करावा, वाटेल ते कपट करावे, असा त्यांचा अभिप्राय आहे. इंद्राला देवगुरु बृहस्पतीने पुढीलप्रमाणे उपदेश केला आहे.

'शत्रूवर नानाप्रकारचे मायावी प्रयोग करावे. त्याचा जो शत्रू असेल त्याला त्याचेवर उठवावा व कपटाचेही आचरण करावे. मात्र त्या कपटामुळे आपल्या कीर्तीस बाध येईल असे होऊ देऊ नये. विश्वासू मनुष्याकडून शत्रूच्या लोकांना वश करून घ्यावे. हे वृत्रनाशका इंद्रा, पूर्वीदेखील आपल्या नगरामध्ये योग्य अशा नीतीचा अवलंब करून राजे लोकांनी शत्रूला जिंकले आहे. हे राजा, आपल्या अमात्यादिकांना गुप्तपणे द्रव्य देऊन व त्यांचे वेतन बंद करून, ते आपल्या अपराधामुळे मर्जीतून उतरलेले आहेत,' असे प्रसिद्ध करावे व त्यांची योजना शत्रूची नगरे व राज्ये यांजवर करावी. पूर्वीच्या राजांनी असे आचरण केलेले आहे.' (शांति. १०३)

निकृत्या निकृतिप्रज्ञा हन्तव्या इति निश्चयः
नहि नैकृतिकं हत्वा निकृत्या पापमुच्यते ।

—वन. ५२।२२

'कपटबुद्धी शत्रूंचा कपटानेच वध केला पाहिजे, असा सिद्धांत आहे. कपटी शत्रूचा कपटाने वध केला असता त्याला पाप म्हणत नाहीत.' असे भारतीय पुरुषांचे मत आहे. म्हणूनच या राजनीतीचा त्यांनी पुनः पुन्हा उपदेश केला आहे. कालकवृक्षीय मुनी क्षेमदर्शी राजाला सांगतात, 'हे राजा, प्रथम अत्यंत उत्कृष्ट प्रकारे शुचिर्भूत राहून व चांगली कर्मे करून तू शत्रूची मर्जी संपादन कर. व तुला मित्रांचे पाठबळ मिळाले म्हणजे उत्कृष्ट प्रकारची मसलत करणाऱ्या मंत्र्यांच्या साहाय्याने गुप्त विचार करून आपल्या विश्वासू लोकांकडून शत्रूंमध्ये फाटाफूट कर. आणि ज्याप्रमाणे बेलफळाने बेलफळ तोडतात त्याप्रमाणे तू शत्रूंकडून शत्रूंचा नाश कर. राजा, सुंदर आणि दुर्लभ असे पदार्थ, स्त्रिया,

वस्त्रे, शय्या, आसने, गृहे, रस, सुगंधी पदार्थ आणि फळे यांवर तू शत्रूची आसक्ती निर्माण कर. त्यायोगे त्यांचा नाश होईल. हे राजा, मोठमोठी मूल्यवान उपवने, मंदिरे, शय्या यांवर शत्रूची आसक्ती निर्माण करून त्या उपभोगसुखांच्या योगाने तू त्याचा खजिना रिकामा कर. '–( शां. १०५.).

शत्रूला दयाबुद्धी दाखविणे, त्याशी वागताना न्यायनीतीचा विचार करणे किती घातुक आहे हे भीम व दुर्योधन यांच्या अखेरच्या गदायुद्धाच्या प्रसंगी श्रीकृष्णाने पांडवांना जो उपदेश केला व त्यांच्या कृत्याचे जे समर्थन केले त्यावरून चांगले समजून येईल.

## श्रीकृष्णप्रणीत युद्धनीतीचे स्वरूप

प्राणाचे भय घेऊन दुर्योधन शेवटी एका डोहात लपून बसला होता. काठावरून युधिष्ठिर त्याच्याशी बोलत होता. त्या वेळी युधिष्ठिराने दुर्योधनाला सांगितले की, ' मी तुला सवलत देतो. पाच पांडवांपैकी ज्याच्याशी युद्ध करावे अशी तुझी इच्छा असेल, त्याच्याशी तू गदायुद्ध कर. आणि त्या एकाला जरी तू मारलेस तरी सर्व राज्य तुझे आहे.' ही सवलत ऐकून दुर्योधन बाहेर आला. पण इकडे श्रीकृष्ण मात्र धर्माच्या या आत्मघातकी उदारतेने अगदी संतापून गेले. ते म्हणाले, ' युधिष्ठिरा, हे तू काय करून ठेवलेस ? अरे युद्धात तू, अर्जुन, नकुल किंवा सहदेव यांपैकी कोणाला त्याने निवडले तर कसे होईल ? त्याच्याशी सामना करण्यास तुम्ही मुळीच समर्थ नाही. रणात दुर्योधनाला प्रतियोद्धा पृथापुत्र वृकोदरावाचून तर मला कोणीच दिसत नाही. असे असताना तू हे काय कबूल करून बसलास ? हे राजा, तू केवळ दयाबुद्धीने हे साहस

केले आहेस आणि येथे साफ घसरला आहेस. 'आमच्यापैकी एकाला मारून राजा हो' असे तू सांगितलेस तरी कसे? मागे शकुनीशी तू जसे द्यूत केलेस तसलेच द्यूत तू पुन्हा मांडले आहेस. राजा, तू आपल्या शत्रूला फायदेशीर अट देऊन त्याला चांगल्या जागेवर आणून ठेवलेस आणि स्वतः मात्र खाड्यात पडला आहेस. एकंदरीत आपण पुन्हा विपत्तीत सापडलो खरे! अरेरे, अजूनही तुला ही बुद्धी सुचते, त्याअर्थी ही पंडूची व कुंतीची संतती राज्य भोगीच नाही, निरंतर वनवास व दारिद्र्य भोगण्यासाठीच तिचा जन्म आहे!–' (शल्य. अ. ३३).

पुढे भीम व दुर्योधन यांचे महायुद्ध सुरू झाले. दुर्योधन मुळीच हटेना तेव्हा अर्जुनाला चिंता वाटू लागली. तेव्हा श्रीकृष्ण त्याला म्हणाले, 'अर्जुना, भीम व दुर्योधन या दोघांचे शिक्षण सारखेच आहे. भीम अधिक बलवान आहे पण दुर्योधन हा त्याच्यापेक्षा अधिक घटलेला व प्रयत्नशील आहे. तेव्हा भीमसेन जर धर्मयुद्धाचे नियम पाळून लढेल तर त्याला जय मिळणार नाही. त्याने अन्यायाने युद्ध केले तर तो खात्रीने सुयोधनास ठार मारील. देवांनीसुद्धा कपटानेच दैत्यांस जिंकले असे आम्ही ऐकिले आहे. म्हणून म्हणतो भीमाने कपटप्रचुर असा पराक्रम करावा. शिवाय, 'युद्धात मी सुयोधनाची मांडी फोडीन,' अशी भीमाने प्रतिज्ञाही केली आहे. ती आपली प्रतिज्ञा त्याने पूर्ण करावी म्हणजे झाले. अर्जुना, दुर्योधन तरी मायावीच आहे. तेव्हा उलट भीमानेही त्याचे मायेनेच तुकडे उडविले पाहिजेत. भीम जर आपल्या बळावर भिस्त ठेवून न्यायाने लढू म्हणेल, तर युधिष्ठिर संकटात पडेल, यात संशय नाही. अर्जुना, मी तुला पुन्हा सांगतो, ऐक. धर्मराजाच्या त्या अपराधामुळेच आपणांस भय उत्पन्न झाले आहे.

एवढा थोर उद्योग केला, भीष्मप्रभृती कौरवांचा निःपात उडविला, जय मिळविला, उज्ज्वल कीर्ती पसरली, आणि वैराचे उसने पुरेपूर निघाले. एवढे सर्व होऊन विजय अगदी हातात आल्यासारखा झाला असता धर्मराजाने तो धोक्यात घातला. खरोखर, अर्जुना, धर्माला ही मोठीच दुर्बुद्धी आठवली. अशाप्रकारचे हे घोर युद्ध करून जे मिळविले ते, ' केवळ एकाला जिंकले असता हारवीन, ' असे म्हणून त्याने हे युद्ध पणास लावले, तेव्हा त्याला काय म्हणावे ? दुर्योधन हा मोठा घटलेला वीर आहे. शिवाय त्याचे काय, तो जिवावर उदार झालेला आहे. जिवावर उदार झालेले साहसी पुरुष थोडे असले तरी ते बहुतांस भारी असतात. एक मारीन किंवा मरेन, अशा निश्चयाने जे धाडशी लोक युद्धात उडी घेतात. त्यांच्यापुढे उभा राहण्यास इंद्रही समर्थ नाही. अर्जुना, सांप्रत सुयोधनाची तशी स्थिती आहे. तो जिवावर उदार झालेला आहे. अशा स्थितीत कोणता शहाणा माणूस त्याला द्वंद्वयुद्धाचे आव्हान करील ? आज तेरा वर्षे सुयोधन सारखा गदायुद्धाचा सराव करीत आहे आणि तो पहा भीमसेनास ठार मारण्याच्या हेतूने ऊर्ध्व, तिर्यक असा सारखा फिरत आहे. छे छे ! पार्था जर महाबाहू भीमसेन याला अन्यायाने ठार न करील तर आज दुर्योधनच विजयी होईल.' –( शल्य. ५७ ).

यानंतर गदायुद्धात भीमाने दुर्योधनाच्या मांड्या प्रतिज्ञेप्रमाणे फोडून त्याला ठार मारले. त्या वेळी बलराम फार क्रुद्ध झाले. अधर्माने युद्ध केले म्हणून त्यांनी भीमाची व पांडवांची फार निंदा केली. दुर्योधन खाली पडल्यावर भीमाने त्याच्या मस्तकावर लाथ मारली. तेव्हा युधिष्ठिरालाही न्यायनीतीची लहर येऊन तोही भीमाची निर्भर्त्सना करू लागला. या योगाने विजयी होऊनही

पांडव हे अगदी लज्जित झाले. त्यांची वदने खिन्न झालेली पाहून मेघ व दुंदुभी यांच्यासारख्या गंभीर वाणीने श्रीकृष्ण त्यांना म्हणाले, ' पांडवहो, तुम्हांस खिन्न होण्याचे कारण नाही. वेळोवेळी मीच युक्तिप्रयुक्तीने तुमच्या हितार्थ रणामध्ये या कौरवांचा असा निःपात करण्यास सांगितले होते. या शत्रूंना असे मारले ही गोष्ट तुमच्या मनाला लागून राहण्याचे काहीच कारण नाही. तुम्ही हे मुळीच मनात आणू नका. शत्रू पुष्कळ व अधिक बलवान असले म्हणजे ते अशाच उपायांनी मारावे लागतात. असुरास मारणाऱ्या देवांपासून हा असाच मार्ग चालत आला आहे. आणि याच संतसंमत मार्गाने सर्व चालतात.

' पूर्वैरनुगतो मार्गो देवैरसुरघातिभिः
सद्भिश्चानुगतः पन्थाः सर्वैरनुगमिष्यते '–( शल्य ६१ )

आज आपण कृतकृत्य झालो आहोत. तेव्हा आता शिबिरास जाऊ व विश्रांती घेऊ. '

वासुदेवाचे हे भाषण ऐकून पांचालासह पांडव अत्यंत हर्ष पावले व सिंहासारख्या गर्जना करू लागले. दुर्योधन मेलेला पाहून आनंदित झालेल्या त्या लोकांनी मग शंख फुंकले. व माधवानेही आपला पांचजन्य शंख फुंकला !

श्रीकृष्णाच्या वरील भाषणावरून परनीतीसंबंधी त्यांचा काय अभिप्राय होता हे स्पष्ट होईल.

## परनीतीच्या अभावी—

पांडवांवर ओढवलेले प्रसंग पाहिले, आणि दर वेळेस योग्य परनीतीचा धर्म सांगून त्यांना श्रीकृष्णांनी कसे वाचविले ते ध्यानात

घेतले म्हणजे मनात निःसंशय असे येऊ लागते की, श्रीकृष्णासारखा नीतिविशारद धर्मवेत्ता पुरुष त्यांचा पाठीराखा नसता तर धर्मराजाने आपल्या सत्यअहिंसेने पांडवांचा कायमचा घात करून त्यांच्या हाती कायमची नरोटी दिली असती. सुदैव असे की श्रीकृष्णासारखा व्यवहारज्ञ सखा त्यांना मिळाला. आणि त्याहीपेक्षा सुदैव असे की त्याचे ऐकण्याची मधून मधून तरी धर्मराजाला बुद्धी होत असे.

## सामोपचार-मर्यादा

शत्रूंचा संहार करावा, त्याशी कपटाचे वर्तन करावे असा उपदेश केला असला तरी या लोकांना युद्धाची भलतीच हौस होती असे मात्र समजू नये. युद्ध शक्य तो करून टाळावे असाच त्यांनी उपदेश केला आहे. युधिष्ठिराला नारद म्हणतात, "हे शत्रुतापना, युद्ध करून रक्तपात करणे हे होता होईल तो टाळले पाहिजे. यास्तव हे शत्रुनाशना, शत्रूच्या नाशास उद्युक्त झाल्यावर प्रथम साम, दाम, भेद हे उपाय योजावे. या उपायांची उत्तम प्रकारे योजना केल्याने प्राणहानी न होता आपला उद्देश सिद्धीस जातो. हे प्रजापालका, तू असेच धोरण ठेवतोस ना?" –(सभा. अ. ५) पितामह भीष्मांनीही युद्ध शक्यतो टाळावे असाच उपदेश केला आहे. 'युधिष्ठिरा, तू प्रचंड चतुरंग सेनेचे पोषण करून प्रथम सामोपचाराचेच वर्तन ठेव. आणि त्याचा उपयोग न होईल तर युद्धाविषयीचा प्रयत्न कर. कारण हे भारता, युद्धातील जय हा निकृष्ट प्रतीचा आहे. तो साहजिक रीतीने किंवा दैवयोगाने मिळतो असे तज्ज्ञ लोकांचे मत आहे. हे राजा, अत्यंत बलसंपन्न असणारी सेनाही हरिणसमूहासारखी असते; अर्थात हरिणांपैकी एक पळू लागला की ज्याप्रमाणे दुसराही त्याच्यामागून पळू लागतो त्याप्रमाणेच

सैन्यातील एक माणूस सैन्य सोडून पळून गेला की दुसरा त्याच्यामागून जाऊ लागतो. राजा, परस्परांचे बल ओळखणारे, उत्साही, प्राणाची पर्वा न करणारे आणि दृढनिश्चयी असे केवळ पन्नास शूर पुरुष असले तरी ते शत्रूच्या सैन्यास ठार करून सोडतात. इतकेच नव्हे तर परस्परांशी मिळून वागणारे, दृढनिश्चयी, कुलीन व सन्माननीय असे सात, सहा किंवा पाचच योद्धे असले तरी ते शत्रूला भारी होतात.

राजा, इतर उपायांनी कार्य होणे शक्य नसेल तर युद्ध करावे. कारण साम, भेद आणि दाम यांच्यानंतरचा उपाय युद्ध हा आहे. म्हणून परपक्षाच्या योद्धयांवर क्रौर्यमिश्रित सामोपचाराचा पुनः पुनः प्रयोग करावा. अशी चोहोंबाजूने पीडा लागली म्हणजे शत्रू संधीला तयार होतो. शत्रूचे जे अगदी खाजगी लोक असतील त्यांच्यामध्ये फाटाफूट करण्यासाठी गुप्त हेरांचा प्रवेश करवावा. जो राजा शत्रूहून अत्यंत श्रेष्ठ असेल त्याच्याशी संधी करणे प्रशस्त होय. कारण तसे केल्याशिवाय, शत्रूला व त्याच्या इतर योद्धयांना प्रतिबंध होईल अशा रीतीने पीडा देणे शक्य नाही.

आता शत्रूला अपराधाबद्दल क्षमाच का करू नये असे तू म्हणशील. पण क्षमा ही सज्जनांवर करावयाची असते. ती असज्जनाकडे केव्हाही जात नसते. हे कुंतीपुत्रा, क्षमेचे रहस्य तुला सांगतो. जो राजा शत्रूवर विजय मिळविल्यानंतर त्याला क्षमा करतो त्याची कीर्ती वाढते व तो मोठा अपराधी असला तरी त्याचे शत्रूही त्याजवर विश्वास ठेवतात. म्हणून शत्रूला जर्जर करून टाकल्यानंतर त्याला क्षमा केलेली चांगली. कारण तापविल्यावाचून वाकविलेले काष्ठ पुनरपि पूर्वस्थितीस येते.

## गोड वाणी

राजा प्रसंग पाहून, राजाने मृदुता व तीव्रता या दोहोंचेही अवलंबन करावे. युधिष्ठिरा, शस्त्रपात करण्यापूर्वी व चालू असतानाही प्रिय भाषण करावे आणि प्रहार केल्यानंतरही शोक केल्यासारखे अथवा रोदन केल्यासारखे दाखवून कारुण्य प्रकट करावे. " माझ्या लोकांकडून संग्रामात आपल्यावर शस्त्रप्रहार झाला हे मला इष्ट नाही; पण काय करावे ! मी पुनः पुनः सांगितले तरी ते माझे ऐकत नाहीत. ज्याने हा अन्याय केला आहे त्याने मला फार दुःख दिले आहे " असे बाहेर उद्गार काढावे आणि अंतस्थ रीतीने ज्याने त्या शत्रूला ठार केले असेल त्याचा गौरव करावा. बाह्यतः प्रहार करणाऱ्या लोकांशी अपराधी मनुष्यासारखे वर्तन ठेवावे आणि लोकप्रीती संपादन करण्यासाठी, ज्याचा वध केला असेल, त्यांच्यासाठी विलापही करावा. सारांश अशा, रीतीने कोणत्याही स्थितीत सामोपचाराने वागणारा धर्मवेत्ता राजा सर्व प्राण्यांना प्रिय होतो. त्याला कोणतीही भीती राहात नाही.'

जित शत्रूला क्षमा करू नये असे कोठे सांगितले आहे तर कोठे त्याला मोठ्या सन्मानाने वागवावे असेही सांगितले आहे. नारदांनी युधिष्ठिराला राजनीतीचा उपदेश केला तेव्हा ते म्हणाले, ' हे वीरपुंगवा, शत्रूला जिंकणे व जिंकल्यावर योग्य प्रकारे त्याचे रक्षण करणे यात वीरांचे खरे शौर्य आहे. तेव्हा तू शत्रूस हस्तगत केल्यावर त्याचे नीटपणे रक्षण करतोस ना ?' –( सभा. अ. ५ ) शांतिपर्वातील वामदेवगीतेतही असाच उपदेश आहे. ' जो राजा कल्याणकारक आचरण करणाऱ्या शत्रूभूत राजाला संग्रामामध्ये धरल्यानंतर द्वेषामुळे त्याचा बहुमान करीत नाही, तो क्षात्र–धर्मभ्रष्ट होय. ' ( शांति. अ. ९३ )

पण क्षमा किंवा शिक्षा हे सर्व प्रसंगावर व तारतम्यावर अवलंबून राहील. शत्रू हा पुन्हा उचल करणार नाही ही निश्चिती करून घेतली पाहिजे हा त्यातला भावार्थ. म्हणून भारतकार म्हणतात ऋण, अग्नी आणि शत्रू यांचा जर अवशेष ठेवला तर ती पुनः पुनः वृद्धिंगत होतात. यास्तव त्यांचा शेष ठेवू नये. शत्रू अवशिष्ट ठेवले तर त्यांचा अपमान झाला असल्यामुळे ते पुढे अत्यंत भीती उत्पन्न करितात. म्हणून शत्रूने हृदयाला पाझर फोडण्यासारखे उद्गार काढले तरीही त्याला सोडू नये व त्याच्याविषयी दुःख बाळगू नये. पूर्वी त्याने आपणास पीडा दिली असेल तर त्याचा वधच करावा. मात्र परकीयांना वश करण्याचा व त्यांजवर अनुग्रह करण्याचा प्रयत्न राजाने सदैव करावा, पण प्रसंगानुसार त्यांचा निग्रहही करावा.

प्रहरिष्यन् प्रियं ब्रूयात् प्रहरन्नपि भारत।
प्रहृत्यच कृपायीत शोचेत च रुदेत च।

–( आदि. १४०।५६ )

शत्रूवर प्रहार करण्याचे मनात असता वरकरणी त्याच्याशी गोड बोलावे. प्रहार करीत असतानाही गोडच बोलावे. आणि प्रहार केल्यावर त्याच्याविषयी सहानुभूती दाखवावी, खेद प्रदर्शित करावा व रडावेही.

राजा अशा सौम्य वर्तनाने शत्रूचा उच्छेद करता येतो. सौम्य उपायांनी भयंकर अशा शत्रूचाहि वध करता येतो. वरीलसारख्या सौम्य उपायाला असाध्य असे काहीच नाही. कारण जो सौम्य असतो, तोच अतिशय तीक्ष्ण असा उपाय आहे.–( शांति. १४० )

शत्रूशी कपट करून त्याला फसविणे, संकटात गाठून त्याचा संहार करणे व करतानाही त्याच्याबद्दल बाह्यतः सहानुभूती

दाखविणे हे राजनीतीतले पाठ आहेत; त्याचप्रमाणे आपण दुर्बल असताना शत्रूपुढे नमून वागणे व वेळ येताच उलटणे हाही पाठ या राजनीतीत सांगितला आहे.

## प्रसंगी हेही अवश्य

बृहस्पतीने इंद्राला पुढीलप्रमाणे उपदेश केला आहे : 'शत्रू जर अवेळीच आपल्यावर चालून आला, तर त्या वेळी आपले सामर्थ्य बाजूला ठेवावे, आणि सुज्ञ पुरुषांना संमत असलेल्या मार्गाचे अवलंबन करून त्याच्याशी स्नेह करावा. पीडा कोणत्याही प्रकारे देऊ नये आणि क्रोध व अहंकार यांचा त्याग करून त्याच्या छिद्रांचा शोध करीत राहावे. अशा रीतीने प्रसंग आला असता बलाढ्य शत्रूशी नम्रतेने वागणेच योग्य होय. नंतर शत्रू अनवधानतेने वागत असता अवधानपूर्वक त्याचा वध करण्याची संधी पाहात राहावे. प्रणाम, अन्नपान, व मधुर भाषण या मार्गांनी शत्रूशी स्नेहसंबंध ठेवावा. त्याच्या अंतःकरणात आपल्याविषयी केव्हाही शंका येऊ देऊ नये. संशय येण्याजोगी जी कृत्ये असतील त्यांचा त्याग करावा. त्या शत्रूवर मात्र राजाने कोणत्याही प्रकारे विश्वास ठेवू नये. अवमान झालेले राजे या गोष्टीविषयी जागरूक असतात. अर्थात शत्रूचा आपणांवर विश्वास बसवून घेण्यासाठी दक्ष असतात पण आपण मात्र त्यांजवर विश्वास ठेवीत नाहीत. हे सुरश्रेष्ठ इंद्रा, राजांचे ऐश्वर्य टिकविणे, यासारखे दुसरे दुष्कर कर्मच नाही. यासाठी राजाने नेहमी सावध असले पाहिजे. अनवधानाने वागणाऱ्या राजाचे राज्य तत्काल नष्ट होते.

इंद्रा, पुष्कळ शत्रू असले तर त्यांच्याशी एकट्यानेच लढू नये. त्या वेळी साम, दाम, भेद व दंड या उपायांचे अवलंबन करून

क्रमाक्रमाने एकेकाचा विध्वंस करावा. आणि त्यांतूनही अवशिष्ट राहिले तर त्यांच्याशी लक्ष्यपूर्वक वागावे. सामर्थ्य असले तरीही बुद्धिमान् पुरुषाने सर्वांशी युद्ध करण्याचा प्रसंग आणू नये. ज्या वेळी अश्व, गज, रथ, यांनी परिपूर्ण, पायदळ व यंत्रे विपुल असलेली, व आपल्यावर भक्ती असलेली अशी प्रचंड सेना जवळ असेल व शत्रूपेक्षा आपला अनेक प्रकारे उत्कर्ष आहे अशी खात्री होईल तेव्हा आपला अभिप्राय प्रकट करून शत्रूवर निःशंकपणे प्रहार करावा व त्याचा निःपात करावा. '–( शां. १०३ )

## धर्मापेक्षा बल श्रेष्ठ

जय धर्मामुळे मिळत नाही; बलामुळे मिळतो. शत्रूशी सामना देताना न्यायनीतीचा विचार करणे हे आत्मघातकी का ठरते त्याची मीमांसाही भारतीय तत्त्ववेत्त्यांनी केली आहे. सत्यमेव जयते, नहि सत्यात् परो धर्मः । असा उपदेश त्यांनी अनेक वेळा केला असला तरी तो गृहनीतीचा भाग आहे हे आपण विसरू नये अशी त्यांची इच्छा आहे. कारण गृहनीती व परनीती या अगदी निराळ्या आहेत. जगाच्या व्यवहारात सत्य, धर्म, न्याय यांनी जय कधीही मिळत नाही ही भारती तत्त्ववेत्त्यांची बालंबाल खात्री होती. पितामह भीष्म सांगतात, 'युधिष्ठिरा, आपत्प्रसंगी धर्म व अधर्म यांचा विचार करीत बसणे म्हणजे अरण्यात एखाद्या पशूचे पाऊल उठले असता ते लांडग्याचे आहे, चित्त्याचे आहे का वाघाचे आहे असा विचार करीत बसण्यासारखेच व्यर्थ आहे. या लोकांत धर्माचे अथवा अधर्माचेही फल कोणी प्रत्यक्ष पाहिलेले नाही, यास्तव तिकडे लक्ष न देता सामर्थ्यप्राप्तीची इच्छा करणे योग्य होय. कारण हे सर्व जग बलाढ्य पुरुषांच्याच आधीन असते. सामर्थ्य-

संपन्न पुरुष इहलोकामध्ये संपत्ती, सैन्य व आमात्य संपादन करू शकतो. जो मनुष्य द्रव्यसंपन्न नसेल तो खरोखर महापातकी होय. अल्पसे द्रव्य हे केवळ उच्छिष्ट होय. (श्रियोबलममात्यांश्च बलवानिह विन्दति । यो ह्यनाढ्यः स पतितः तदुच्छिष्टं यदल्पकम् ) बलाढ्य पुरुषाला त्याच्या भीतीमुळे कोणाकडून फारसा अपकार होत नाही. बल आणि धर्म ही उभयता जर खऱ्या अधिकाऱ्यामध्ये वास्तव्य करीत असली तर मोठ्या भीतीपासूनही रक्षण करू शकतात. तथापि, धर्माहून बलाचीच योग्यता अधिक आहे. कारण बलाच्या योगाने धर्माची प्रवृत्ती होते ( अतिधर्मात् बलं मन्यें बलात् धर्मः प्रवर्तितः । ) इतकेच नव्हे तर ज्याप्रमाणे जंगम पदार्थ पृथ्वीवरच अवलंबून असतात त्याप्रमाणे धर्म हा बलावरच अवलंबून असतो. ज्याप्रमाणे धूम वायूच्या अधीन असतो त्याप्रमाणे धर्मही बलाच्याच अनुरोधाने वागतो. वृक्षाचा आश्रय करून राहणाऱ्या वेलींची जशी वृक्षावर सत्ता चालत नाही तशीच बलावर धर्माची सत्ता चालत नाही. सुख जसे विलासी पुरुषाच्या अधीन असते तसा धर्मही बलाढ्य पुरुषांच्या अधीन असतो. तेव्हा राजा, हे लक्षात ठेव की, बलाढ्य लोकांना असाध्य असे काही नाही.' ( शांति १३४ )

ऐहिक बल व पारमार्थिक बल यांचा योग्य विवेक करून सर्व पारमार्थिक बल ( म्हणजेच धर्म ) हे ऐहिक बलावर अवलंबून आहे असे भारतीय तत्त्ववेत्त्यांनी स्पष्ट मत दिले आहे. म्हणूनच धर्म हे जरी एखाद्यास अंतिम साध्य वाटले तरी तो धर्म ज्या ऐहिक बलावर अवलंबून आहे त्याची उपासना प्रथम त्याने केली पाहिजे, आणि त्यासाठी ज्या उपायांचा अवलंब करावा लागेल त्या उपायांचा अवलंब केला पाहिजे. सत्य, धर्म, अहिंसा या उदात्त तत्त्वांना जी

मुरड यासाठी घालावी लागेल ती घातली पाहिजे, कारण असे न करावे तर सत्य, धर्म यांचाच सर्वस्वी उच्छेद होतो. कारण बलहीनाचे सत्य कोण ऐकणार, आणि त्याचे धर्माचरण तरी कोण चालू देणार !

आणि जगाची अशी स्थिती असल्यामुळे, म्हणजे सत्य, धर्म यावर विजय अवलंबून नसल्यामुळे, तो सर्वथा बलाच्या, मनगटाच्या बलाच्या अधीन असल्यामुळे, नीतिशास्त्रात आपल्याला एरवी अप्रिय वाटणाऱ्या तत्त्वांचा समावेश करावा लागतो.

## अविश्वास

संक्षेपो नीतिशास्त्राणामविश्वासः परो मतः ।–(शां. १३८।१९७) हे तत्त्व अशापैकीच आहे. सर्व नीतिशास्त्राचे—परनीतीचे—थोडक्यात सार हेच की, कोणाचा विश्वास म्हणून धरू नये.

एरवीच्या जीवनात आपल्याला नेहमी सद्गुणांची वाढ करावयाची असते. त्यामुळे दुसऱ्यावर विश्वास टाकून, त्याला मोठेपणा देऊन, त्याचे मन वळवावे असा उपदेश केला जातो, आणि तो अगदी योग्यच आहे. पण राजकारणात शत्रूशी वागताना हे धोरण घातकी ठरल्यावाचून राहणार नाही. महाभारतात याविषयी पुढीलप्रमाणे उपदेश केलेला आढळतो.

'आपले व आपल्या शत्रूचे कार्य एकच असले तर बलाढ्य शत्रूशी संधी करून सावधपणे व युक्तीने ते कार्य साधावे. पण कार्य झाले म्हणजे मात्र त्या शत्रूवर विश्वास ठेवू नये. आपल्यावर ज्याचा विश्वास नसेल त्याच्यावर विश्वास ठेवू नयेच पण आपल्यावर विश्वास आहे त्याच्यावरही विश्वास ठेवू नये.

नित्यं विश्वासयेत् अन्यान। परेषां तु न विश्वसेत्।
—( शां. १३८ )

आपल्याविषयी दुसऱ्यांच्या मनांत नेहमी विश्वास उत्पन्न करावा, आपण मात्र दुसऱ्यावर कधीही विश्वास ठेवू नये. सारांश, कोणताही प्रसंग आला तरी आपल्या जीविताचे रक्षण केले पाहिजे. त्यामुळे अविश्वास हेच राजनीतिशास्त्राचे संक्षिप्त व मुख्य स्वरूप होऊन बसते. मनुष्यावर अविश्वास ठेवून राहणे हेच आपल्या विपुल हिताचे साधन आहे. विश्वास न ठेवून वागणारे लोक दुबळे जरी असले तरी ते शत्रूकडून बद्ध होत नाहीत व विश्वास ठेवून वागणारे लोक बलाढ्य असले तरी दुर्बल असे शत्रू त्यांना बद्ध करू शकतात.

कोणाही दोन पुरुषांचे प्रथम परस्परांशी वैर असले, व नंतर काही कारणामुळे ते परस्परांवर उत्कृष्ट प्रीती करू लागले, व कार्य झाल्यावर त्यांच्या मनांत परस्परांना फसविण्याचा विचार आला तर सुज्ञ मनुष्य उत्कृष्ट प्रकारच्या बुद्धीचा आश्रय करून दुसऱ्याला फसवितो. मनुष्य जरी ज्ञानसंपन्न असला तरी तो जर बेसावध राहिला तर अज्ञ लोकही त्याला फसवू शकतात. म्हणूनच प्रमाद न होऊ देता, अंतःकरणात भीती वाटत असली तरी, ती वाटत नसल्याप्रमाणे, व विश्वास नसला तरी तो असल्यासारखा दाखवून मनुष्याने वागावे. हे प्रजाधिपते, प्रसंगानुसार शत्रूशीही संधि करावा व मित्राशीही संग्राम करावा असेच संधिवेत्ते लोक सदैव सांगत असतात. हे जाणून व शास्त्रांची तत्त्वे लक्षात घेऊन कार्यामध्ये आसक्त व प्रसन्न राहून संकट येण्यापूर्वीच त्याची भीती उत्पन्न झाल्याप्रमाणे वागावे व भीतिग्रस्त मनुष्याप्रमाणे दुसऱ्याचा आश्रय करावा व संधीही करावा. अंतःकरणात भीती

बाळगून सावधानपणे कार्यामध्ये आसक्त होऊन राहिले म्हणजे विचारहि सुचतात. कारण, हे राजा, संकट उत्पन्न होण्यापूर्वी जरी भीति बाळगून वागत असलो तरी ती खरी नसते. पण जो भीति न बाळगता विश्वासाने राहतो व सदैव निर्भयपणे वागतो त्याजवर पुढे मोठे संकट ओढवते. '–( शांति अ. १३८ )

ब्रह्मदत्त व पूजनी यांच्या संवादात ( शां. अ. १३९ ) असेच विचार प्रगट झाले आहेत.

**निश्चयः स्वार्थशास्त्रेषु विश्वासश्चासुखोदयः । –शां.१३९।७०**

स्वार्थशास्त्राचा म्हणजे राजनीतीशास्त्राचा असा सिद्धांत आहे की दुसऱ्यावर विश्वास ठेवणे हे सर्व दुःखांचे उत्पत्तिस्थान आहे. याविषयी शुक्राने प्रल्हादाला दोन गाथा सांगितल्या होत्या. जे लोक शत्रूंच्या सत्य अथवा असत्य भाषणावर विश्वास ठेवतात ते, मधाच्या आशेने जाणाऱ्या व मध्येच शुष्क तृणांनी आच्छादिलेल्या कड्यावरून पडणाऱ्या लोकांप्रमाणे नाश पावतात. राजाने कोणाचेही वाईट केल्यानंतर त्यावर विश्वास ठेविला तर दुःख भोगावे लागते.–( शां. १३९ ).

गृहनीती व परनीती यांची पृथक् क्षेत्रे आरंभीच सांगितली आहेत. पुष्कळ वेळा इकडचे तत्त्व तिकडे व तिकडचे धोरण इकडे असा माणसांच्या मनांत घोटाळा निर्माण होतो व पुष्कळ वेळा याविषयी निश्चय न झाल्यामुळे बुद्धीला व्यामोह पडून माणसांचा नाशही होतो. माणसे पराक्रमी असतात, त्यागी असतात, स्वाभिमानी असतात, दयाशील असतात. पण पराक्रम, त्याग, स्वाभिमान, दया कोठे दाखवावयाची याविषयी निश्चित कल्पना नसल्यामुळे हे गुण मातीमोल होतात व कित्येक प्रसंगी घातकही होतात. अधम, हीन, राष्ट्रद्रोही माणसांमुळे राष्ट्राचा घात

तर होतोच पण पुष्कळ वेळा उदार, क्षमाशील, सत्यवचनी अशा माणसांकडूनही, व्यवहारनीतीच्या अज्ञानामुळे, श्रेष्ठ निष्ठा कोणती, कनिष्ठ कोणती, शक्य काय अशक्य काय, यांचा हिशेब त्यांच्या ठायी नसल्यामुळे, अंतराळातच ते वावरत असल्यामुळे, स्वकीयांचा घात होतो. मराठ्यांच्या, राजपुतांच्या इतिहासात, सध्याच्या हिंदुस्थानच्या इतिहासात या प्रकारची अनेक उदाहरणे आहेतच. येथे महाभारतातलेच एक उदाहरण देतो.

## गृहनीती व परनीती यांच्या संकरामुळे अनर्थ

द्रोणाचार्यांच्या वधाची ही कथा आहे. या एका कथेत अनेक विचित्र प्रकार घडले आहेत; त्या वेळी भिन्न भिन्न व्यक्तींनी चमत्कारिक वृत्ती प्रकट केल्या आहेत, त्यासंबंधी भिन्न मते तेथील लोकांनी प्रकट केली आहेत. आणि यामुळे गृहनीती व परनीती यासंबंधी फारच उद्बोधक असे विचार त्यातून आपणांस उचलता येतील.

रणांगणात एके दिवशी गुरु द्रोणांनी भयंकर उग्ररूप धारण केले व पांडवांच्या हजारो सैनिकांचा ते संहार करू लागले. त्यांच्यापुढे उभे राहण्याची कोणाची छाती होईना व आज पांडव पृथ्वीतलावरून नष्ट होणार असा रंग दिसू लागला. त्या वेळी श्रीकृष्ण अर्जुनास म्हणाले, " या महाधनुर्धराच्या हातांत धनुष्य आहे तोपर्यंत याला जिंकणे इंद्रालाही शक्य नाही. जर याने शस्त्र खाली ठेवले तरच याचा वध होणे शक्य आहे. तेव्हा पांडवहो, या वेळी धर्म वगैरे सर्व गुंडाळून ठेवून ( धर्म उत्सृज्य ) जेणे करून जय मिळेल अशी युक्ती तुम्ही योजिली पाहिजे. मला वाटते की अश्वत्थामा मेला तर हा लढणार नाही. तेव्हा युद्धात तो मारला गेल्याचे कोणी तरी याला सांगावे."

श्रीकृष्णाची ही मसलत अर्जुनास आवडली नाही, पण इतरांना ती मान्य झाली व सत्यनिष्ठ, अहिंसाप्रिय अशा धर्मराजानेही तिला अनुमोदन दिले. नंतर भीमाने अश्वत्थामा नावाचा एक हत्ती ठार मारला व द्रोणांच्या जवळ जाऊन 'अश्वत्थामा मारला गेला' असे तो मोठ्याने ओरडू लागला. प्रथम द्रोणांची खात्री पटेना. तेव्हा त्याने, हे खरे की खोटे, असे युधिष्ठिरास विचारले. त्रैलोक्याचे जरी राज्य मिळाले तरी युधिष्ठिर असत्य भाषण करणार नाही अशी त्याची खात्री होती.

या वेळी श्रीकृष्णाने युधिष्ठिरास बजावले की, 'युधिष्ठिरा, द्रोण असाच लढत राहिला तर तुझ्या सर्व सेनेचा फडशा होईल. तेव्हा त्याच्यापासून तू आमचे रक्षण कर. अरे, अशा प्रसंगी सत्य भाषणापेक्षा असत्याचीच अधिक महती आहे !' युधिष्ठिराची सत्यनिष्ठा अगदी एकांतिक होती. पण या वेळी व्यवहार त्याने ओळखला व 'कुंजर अश्वत्थामा मारला गेला' असे त्याने उत्तर दिले व उत्तर देताना कुंजर शब्द अगदी हलके उच्चारला. त्यामुळे आपला पुत्र अश्वत्थामा हाच मेला असे वाटून द्रोणाने शस्त्र टाकून दिले व ती संधी साधून धृष्टद्युम्नाने अर्जुनाच्या निषेधाला न जुमानता त्याचा वध केला. —( द्रोणपर्व, अ. १९०, १९२ )

द्रोणांच्या या असल्या वधामुळे अर्जुन अगदी चिडून गेला व पुढे अश्वत्थामा जेव्हा चवताळून पांडवांच्या सैन्यावर तुटून पडला व संहार करू लागला तेव्हा त्याची कड घेऊन तो स्वपक्षीयांना दुरुत्तरे करू लागला व प्रत्यक्ष युधिष्ठिराची निर्भर्त्सना करू लागला. तो म्हणाला, 'ज्यांना अनाथाप्रमाणे गाठून धृष्टद्युम्नाने अत्यंत अघोरपणे मारिले त्या आचार्यांचा वाली आता उभा आहे. माझ्या गुरूचे केश धृष्टद्युम्नाने धरले, त्याची वीर अश्वत्थामा कदापि

क्षमा करणार नाही. राजा, क्षणिक अशा राज्यासाठी पितृतुल्य अशा गुरूचा तू वध करविलास. तू धर्मज्ञ असूनही अत्यंत अधर्म केला आहेस ! माझ्याने हे पाहवत नाही. आमच्या हातून हा भयंकर अधर्म घडला आहे. आपण नीच लोभ्यांनी केवळ राज्यासाठी या वृद्ध आचार्यांचा वध केला. हे आपल्या हातून अति भयंकर पापकर्म घडले आहे. अशा प्रसंगी जिवंत राहण्यापेक्षा मृत्यूच श्रेयस्कर होय. '—( द्रोण १९६ ).

## अर्जुनाचा व्यामोह

धृष्टद्युम्न, भीमसेन व धर्मराज यांची अर्जुन निर्भर्त्सना करीत होता ती कोणत्याही अधम वासनेमुळे नसून अत्यंत सात्त्विक अशा गुरुभक्तीच्या उमाळ्यामुळेच करीत होता. पण असे सात्त्विक-भाव, अशी गुरुनिष्ठा ही एरवी कितीही अभिनंदनीय असली तरी शत्रुपक्षीय लोकांच्या बाबतीत त्यांना आवर घातला नाही तर हे सद्गुणच घातक होतात ही श्रीकृष्णाची व्यवहारनीती त्याला कळत नव्हती. हा गुरू असला तरी आपल्या लहानशा अभिमन्यू बाळाला एकट्याला गाठून ठार मारणारा हा गुरू आहे हे अर्जुन त्या वेळी विसरला आणि त्याला शस्त्र टाकल्यानंतर मारण्यात अधर्म झाला असे तो म्हणाला. आपल्या प्रिय द्रौपदीचे वस्त्र ओढ-णाऱ्या दुर्योधनाचे रक्षण करण्यासाठी, म्हणजे पर्यायाने त्या नीच कृत्याचे समर्थन करण्यासाठीच तो लढत आहे हेही त्याने ध्यानात घेतले नाही. त्याला अधर्माने मारण्याची श्रीकृष्णाची मसलत त्याला पटली नाही. पण याला मारला नाही तर हा आपणास ठार करील व पुन्हा आपल्या स्त्रीवर तो दुर्योधन तसलाच घोर प्रसंग आणील, आणि तसे करण्यास, तो अधर्म घडवून आणण्यास, हा द्रोण जिवंत राहिल्यास पर्यायाने साह्यच करील हेही अर्जुन विसरला.

म्हणजे गुरुभक्ती, सत्य अहिंसा, शरणागतास अभय इत्यादी श्रेष्ठ तत्त्वे ही एकांतिकतेने वापरली तर ती धर्मालाच विघातक होतात ही व्यवहारनीती तो विसरला. आज शेकडो वर्षे भारतीयांची हीच स्थायीवृत्ती आहे.

धर्मप्रेम, गुरुभक्ती, सत्यनिष्ठा, यांचा उमाळा अनावर होऊन अर्जुन जेव्हा युधिष्ठिराची व स्वपक्षीयांचीच निर्भत्सना करू लागला व 'अश्वत्थाम्यापुढे आता तुम्ही कसे टिकता ते पाहतो,' असे आपणच म्हणू लागला, तेव्हा भीम पराकाष्ठेचा क्रुद्ध होऊन गेला. त्या वेळेस भीमसेनाने अर्जुनास जे उत्तर दिले ते उपहास, व्याजोक्ती, वक्रोक्ती यांनी इतके नटलेले आहे की वक्तृत्वाचा तो आदर्श होऊन बसला आहे.

## भीमसेनाचे अमोघ वक्तृत्व

भीमसेन म्हणाला, 'शाबास धर्मशीला अर्जुना ! शाबास ! आज तू एखाद्या अरण्यवासी मुनीप्रमाणे किंवा अगदी एखाद्या स्वधर्मदक्ष, क्षमाशील ब्राह्मणाप्रमाणे धर्माच्या गोष्टी सांगत आहेस. अर्जुना, तुझा पराक्रम इंद्रासारखा आहे. पण महासागर ज्याप्रमाणे मर्यादेचे उल्लंघन करू शकत नाही त्याप्रमाणे तुला आज धर्माचे अतिक्रमण करवत नाही. वास्तविक अश्वत्थाम्याचे निवारण करणे वगैरे गोष्टींची तुजपुढे काहीच प्रतिष्ठा नाही. परंतु अधर्म घडेल म्हणून ते करण्यास तुझे मन धजावत नाही ! तेरा वर्षे सतत जाळीत असलेला क्रोध एका बाजूस सारून तू आज धर्माचीच कास धरीत आहेस तेव्हा तुझी कोण प्रशंसा करणार नाही ! सुदैवाने तुझे मन आज धर्माकडे वळले आहे. आणि तुझ्या पूर्व-पुण्याईच्या बळाने तुझी बुद्धी अशीच क्षमाशील राहील ! तू धर्माने

वागत असता शत्रूंनी अधर्माने तुझे राज्य हिरावून घेतले, द्रौपदीला भर सभेत आणून तिची अप्रतिष्ठा केली, आपणांस वास्तविक योग्य नसताना झाडाच्या साली व कातडी नेसवून तेरा वर्षेपर्यंत वनवासास घालविले, या सर्व काळजास पीळ पाडणाऱ्या गोष्टी क्षात्रधर्माप्रमाणे वागावयाचे म्हणून मी सहन केल्या. आणि आज ती अति नीच अधर्माची कृत्ये मनात सलत असल्यामुळे शत्रूंचा निःपात करून टाकण्यास आम्ही उद्युक झालो असताना तू धर्मज्ञानाची इच्छा करीत आहेस ! तू कठोर भाषण करून माझ्या काळजाला घरे पाडीत आहेस. आमच्या जखमेवर मीठ चोळीत आहेस आणि वाक्शल्यांनी माझे अंतःकरण विदीर्ण करीत आहेस ! अरे, तुझ्या पुरत्या षोडशांशाचीसुद्धा ज्याला सर नाही त्या अश्वत्थाम्याची तू प्रसंशा करतोस ! अर्जुना, तू मोठा धार्मिक आहेस ! पण हा स्वतःचा दोष मात्र तुझ्या ध्यानात येत नाही. अरे, शत्रूची प्रशंसा करून आपल्याच लोकांना भिवविण्यात तुला लाज कशी वाटत नाही ? तू काय समजला आहेस ? मला तूं अश्वत्थाम्याच्या गोष्टी सांगतोस ! अरे मी क्रुद्ध झालो तर पर्वताच्या ठिकऱ्या करीन, पृथ्वी विदीर्ण करून टाकीन व इंद्रासह देवांनाही रणातून पळवून लावीन. हे वीरा, अशा प्रकारचा तुझा भाऊ आहे तोपर्यंत द्रोणपुत्राचे भय धरण्याचे कारण तुला नाही. ' –( द्रोण १९७ ).

अर्जुन व धृष्टद्युम्न यांची यानंतर याच विषयावरून पुष्कळ बाचाबाची झाली. पण सुदैव असे की अर्जुनाने आपल्या गुरुभक्तीची तड पोचविली नाही. त्या निष्ठेमुळे त्याने धर्मभीमांना सोडून दिले असते तर अनर्थच कोसळला असता. पण लवकरच तो शांत झाला. आपण पितामह भीष्मांच्या बाबतीत असलाच ' अधर्म ' केला आहे हे त्याच्या ध्यानी आले व त्याने आपल्या गुरुभक्तीला

आवर घातला आणि धर्मभीमांशी द्रोह तर त्याने केला नाहीच पण अश्वत्थाम्याच्या नारायणास्त्राच्या प्रयोगात भीमाचा नाश होण्याची वेळ आली असताना त्याने स्वतः जीव धोक्यात घालून त्याला वाचविले व अश्वत्थाम्याची कड घेण्याची क्षणैक आलेली लहर सोडून देऊन पुनरपि त्याने त्याला युद्धासाठी आव्हान केले.

पण अर्जुनाने ही समंजसता दाखविली नसती व त्याने धर्मभमिांचा त्याग केला असता तर जो अनर्थ झाला असता त्याची मीमांसा करताना आपणांस काय म्हणावे लागले असते ? व्यवहारनीतीचे, गृहनीतीचे व परनीतीचे योग्य ज्ञान नसल्यामुळे शौर्य, पराक्रम सर्व वाया जाऊन पांडवांचा नाश झाला असाच निर्णय करावा लागला असता व अर्जुनाच्या धर्मप्रेमामुळे दुर्योधनाच्या अधर्माचा उत्कर्ष झाला असे म्हणावे लागले असते.

पण सुदैवाने तसे झाले नाही. श्रीकृष्णासारखा महान व्यवहारवेत्ता गुरू पांडवांना मिळाला, धर्मराजाने आपल्या सत्यनिष्ठेला मुरड घातली, अर्जुनाने गुरुभक्तीला व धर्मप्रेमाला मुरड घातली, धर्माचा उत्कर्ष यामुळेच होईल, नाही तर आपला पराभव होऊन धर्मनष्ट चांडाळांचे राज्य पृथ्वीवर माजून अधर्माचा विजय होईल हेही त्यांनी समंजसपणे लक्षात घेतले आणि त्यामुळे मोठा अनर्थ टळला

## धर्माचा रथ

धर्मराजाने द्रोणाचार्यांना असत्य सांगितले म्हणून पूर्वी त्याचा रथ जमिनीला न टेकता चार बोटे उंचून असा चालत असे, तो एकदम खाली आला व जमिनीवरून चालू लागला अशी कथा सांगतात. पण ही कथा अर्धवट आहे. कथेचा उत्तर भागही सांगणे अवश्य आहे. युधिष्ठिराने तसे असत्य भाषण केले नसते तर रथा-

सकट तोच पृथ्वीच्या उदरात गाडला गेला असता, आणि मग असत्य किंवा सत्य कोणतेच भाषण त्याला करता आले नसते. केवळ सत्याच्या बळावर त्याचा तरीही विजय झाला असता, परमेश्वराने त्याला व त्याच्या पक्षाला या सत्यनिष्ठेमुळे वाचवले असते असे म्हणावे तर तेही खरे नाही. कारण सत्याचा वाली जो परमेश्वर त्या परमेश्वरानेच–श्रीकृष्णानेच – त्याला असत्य भाषण करण्याचा उपदेश केला होता.

परनीतीचे विवेचन आतापर्यंत सविस्तर केले. स्वतःचे रक्षण व शत्रूचा संहार हे तिचे ध्येय आहे. ते साध्य करताना सत्य, अहिंसा, धर्म यांना मुरड घालून ध्येयवाद, एकांतिकता सोडून देणे अवश्य आहे. कपट करून शत्रूंत भेद करणे, मायावीपणा करून शत्रूला फसविणे, विश्वास दाखवून त्याचा घात करणे, इत्यादी कोणताही सूक्ष्मासूक्ष्म मार्ग अवलंबिल्यावाचून गत्यंतर नाही, कारण जगात सत्याचा किंवा धर्माचा विजय होत नसून बलाचा–ऐहिक बलाचा–विजय होत असतो इत्यादी सिद्धांतांचे स्पष्टीकरण आपण ऐकले. आणि ही प्रवचने कोणा सामान्य माणसांची नसून भीष्म, श्रीकृष्ण यांसारख्या धीमान, जगताच्या उद्धारार्थ अवतरलेल्या थोर विभूतींची ती आहेत हेही आपल्या ध्यानात आले. आता या सर्व परनीतीचा सारांश ज्यात आहे असे शत्रुंजय राजाच्या हितार्थ भरद्वाजमुनींनी केलेले प्रवचन शेवटी जोडल्यास अस्थानी होणार नाही.

## राजनीतीचा सारांश

भरद्वाज म्हणाले, " राजा शत्रुंजया, आपत्तीच्या प्रसंगी योग्य प्रकारची मसलत करावी, योग्य प्रकारे पराक्रम गाजवावा, योग्य

प्रकारे युद्ध करावे आणि प्रसंग पडला तर योग्य रीतीने पलायनही करावे. त्याविषयी विचार करू नये. नम्रता केवल वाणीत असावी, पण अंतःकरण वस्तऱ्यासारखे तीक्ष्ण असावे. जे कार्य केले असता शत्रूचे व आपले सारखेच हित होईल त्या कार्यासाठी शत्रूशी संधी करावा. तथापि, त्याजवर विश्वास ठेवू नये आणि कार्य झाले म्हणजे सुज्ञ मनुष्याने लागलीच शत्रूपासून दूर व्हावे. मित्राप्रमाणेच शत्रूचेही मधुर भाषणाच्या योगाने सांत्वन करीत असावे. पण सर्पयुक्त असलेल्या गृहाची जशी भीती बाळगावयाची तशीच त्याची भीती बाळगावी. आपल्या बुद्धिसामर्थ्यानुरूप शत्रूचा तिरस्कार करीत असावे आणि कोणतीही गोष्ट होऊन गेल्यानंतर मग तिजबद्दल त्याचे सांत्वन करावे. शत्रू जर निर्बुद्ध असेल तर पुढे लाभ होणार आहे असे दाखवून त्याचे सांत्वन करावे व ज्ञानसंपन्न असेल तर तात्कालिक लाभ दाखवून त्याचे सांत्वन करावे. कल्याणेच्छू राजाने शत्रूपुढे प्रसंगानुसार हात जोडावे, शपथ वाहावी, सामोपचाराचे अवलंबन करावे, शिरसाप्रणाम करून भाषण करावे व अश्रूही ढाळावे. आपला काळ उलट असेल तोवर शत्रूला डोक्यावर घ्यावा, पण योग्य काल आलेला दिसताच दगडावर आपटलेल्या मडक्याप्रमाणे त्याचा चुराडा करून टाकावा.

प्रसंगविशेषी शत्रूला आशा दाखवावी, पण तिला कालाची मर्यादा सांगावी आणि नंतर ती सफल होण्याला विघ्ने आणावी. आलेल्या विघ्नांचेही काही तरी कारण सांगावे आणि त्या कारणांच्याही मुळाशी कोणता तरी अंतःस्थ हेतू असल्याचे सांगावे. शत्रूपासून जोपर्यंत भीती नाही तोपर्यंत आपण भ्याल्यासारखे वागावे, पण त्यापासून भीती आहे असे दिसून येताच निर्भय मनुष्याप्रमाणे त्याच्यावर प्रहार करावा.

शत्रुंजया, राजनीतीचे तात्पर्य थोडक्यात असे की, 'कोणाकडूनही आपला उच्छेद होऊ देऊ नये. सौम्य असो अथवा भयंकर असो, हवे ते कर्म करून दीन दशेतून आपला उद्धार करून घ्यावा, आणि प्रथम समर्थ व्हावे आणि सामर्थ्य आल्यानंतर धर्म आचरावा.'

कर्मणा येनकेनैव मृदुना दारुणेनैच
उद्धरेत् दीनमात्मानं समर्थो धर्ममाचरेत् ॥

–आदि, १४०, ७२

• • •

# ४. महाभारतातील प्रवृत्तिधर्म

## प्रवृत्तिधर्म

इहलोकात जन्माला आलेल्या प्रत्येक मानवाचे मोक्ष किंवा आत्मकल्याण हे अंतिम साध्य आहे असा भारतीय तत्त्ववेत्त्यांचा सिद्धांत आहे. मनोनिग्रह, तप व ज्ञान या साधनांनी प्रत्येक सुबुद्ध मानवाने मोक्ष प्राप्त करून घेण्याचा प्रयत्न करणे हेच त्याचे श्रेष्ठ कर्तव्य होय असे एकमुखाने या पुरुषांनी सांगितले आहे. त्यांच्या मते मोक्षसुख किंवा ब्रह्मानंद हा सर्वांत उच्चप्रतीचा आनंद असून त्याच्या प्राप्तीने मानव हा जन्ममरणाच्या दुःखद चक्रातून सुटून जातो व त्याला पुन्हा दुःखाचा स्पर्शही होत नाही. म्हणून ते अतिशय श्रेष्ठ प्रकारचे सुख दीर्घ प्रयत्नाने प्राप्त करून घेऊन प्रत्येकाने आपल्या आत्म्याचे कल्याण साधून घेणे हेच कर्तव्य होय, हा परमधर्म होय असे भारतीय तत्त्ववेत्त्यांचे निश्चित मत आहे.

## मोक्षाचे स्थान

मोक्ष हे प्रत्येक मानवाचे अंतिम साध्य आहे हा सिद्धांत भारतीय तत्त्ववेत्त्यांचा म्हणून सांगितला जातो हे सर्वथैव युक्त

असेच आहे. पण त्याबरोबरच या मोक्षसाधनेसाठी संन्यास घेणे, संसार सोडणे, बायकामुलांचा पाश तोडून टाकणे, प्रपंचाच्या उलाढालीतून अलिप्त राहाणे हे अवश्य आहे, असे भारतीयांचे मत आहे, असेही प्रतिपादन केले जाते. हे प्रतिपादन मात्र सर्वथैव प्रमाणशून्य असून समाजाच्या ऐहिक व पारमार्थिक उत्कर्षालाही विघातक आहे. भारतीयांच्या विनाशाला व दुर्गतीला जी काही अनेक कारणे झाली त्यांत ही संसारविन्मुखता, वैयक्तिक व राष्ट्रीय प्रपंचाबद्दलची अनास्था हे एक प्रमुख कारण आहे हे निर्विवाद होय.

महाभारतात प्रवृत्तिधर्म हाच प्रामुख्याने सांगितलेला आहे हे मत लो. टिळकांनी गीतारहस्यात सिद्ध करून दाखविलेले आहे. त्याविषयी येथे चर्चा करण्याचा उद्देशच नाही. तात्त्विक दृष्टया केलेली ती सर्व चर्चा जिज्ञासूंनी गीतारहस्यातील ' विषयप्रवेश ' व ' संन्यास आणि कर्मयोग ' या प्रकरणात ( पृ. ९, १०, ३११, ३२२ ) अवश्य पहावी. प्रवृत्तिधर्माची महती महाभारतात वर्णिलेली आहे की नाही हा प्रश्न माझ्या मते आता वादातीत आहे. तेव्हा येथे आता त्याची चर्चा करावयाची नाही. त्या प्रवृत्तिधर्माचे प्रतिपादन महाभारतात कसे केलेले आहे हे येथे सांगावयाचे आहे. महाभारत हा मुख्यतः ऐहिक उत्कर्षाची प्रेरणा देणारा, त्याचे मार्ग सांगणारा व त्या ऐहिक वैभवावाचून सर्व व्यर्थ होय असे निक्षून प्रतिपादन करणारा राष्ट्रीय ग्रंथ असल्यामुळे त्यांत प्रवृत्ति-धर्माचे विवरण अगदी सविस्तर केलेले आहे. प्रवृत्तिधर्मच का श्रेष्ठ, मोक्षधर्म त्यावाचून कसा पंगू ठरतो, त्या प्रवृत्तिधर्माला धन, ऐश्वर्य यांचे किती महत्त्व आहे, तो गृहस्थाश्रमावाचून कसा अशक्य होईल, इत्यादी विवेचन विपुल तपशिलासह महाभारतात

केलेले आढळते. भारतीय तत्त्ववेत्त्यांच्या या धर्मात दुबळ्या दैववादाला थारा नाही. 'संतोष, समाधान हेच सुख', असले रडवे प्रतिपादन नाही, षड्रिपूंची संतमंडळींच्या तोंडची ठराविक निंदा नाही, अज्ञान, भोळेपणा, यांतच भूषण मानण्याची जी घातकी प्रवृत्ती तिला आसरा नाही. तर ऐहिक ऐश्वर्य, वैभव, दिगंतभूमीचे साम्राज्य, त्रिखंडात दुमदुमणारी कीर्ती यांच्या आकांक्षा मानवी चित्तात निर्माण करून त्यासाठी मरणमारणाचा संग्राम करण्याची प्रेरणा देणारा संदेश या भव्य ग्रंथात आहे. 'सर्पाच्या दाढा उपटण्याचा प्रयत्न करीत माणसाने तडकाफडकी मरून जावे पण पराक्रमहीन राहू नये.' 'श्येनपक्ष्याप्रमाणे आकाशात गिरक्या घेत राहून शत्रूवर झेप घालावी', 'तृप्ती आणि दया यांनी वैभवाचा नाश होतो', 'मोडून पडावे पण वाकू नये' अशी चैतन्याने रसरसलेली वचने या ग्रंथात आहेत. आणि नुसती वचने आहेत असे नव्हे तर श्रीकृष्ण, अर्जुन, भीम इत्यादी नरपुंगवांनी आपल्या असामान्य बाहुबलाने व अचाट बुद्धिबलाने ही वचने सत्यसृष्टीत आणण्यासाठी जो विशाल उद्योग आरंभिला व प्रचंड पराक्रम केला त्याची अत्यंत स्फूर्तिप्रद वर्णनेही या ग्रंथात आहेत.

**यथा समुद्रो भगवान् यथाहि हिमवान् गिरिः**
**ख्यातावुभौ रत्ननिधी तथा भारतमुच्यते ।**

—१८।५।६५.

'जसा भगवान समुद्र आणि जसा पर्वतराज हिमालय हे रत्ननिधी म्हणून प्रसिद्ध आहेत तसेच महाभारत हेही रत्नांची खाण म्हणून प्रसिद्ध आहे.' असे जे महाभारताबद्दल म्हटले आहे ते यासाठीच. असो. अशा या ग्रंथात प्रवृत्तिधर्माचे जे प्रतिपादन केलेले आढळते ते प्रस्तुत प्रकरणात आता द्यावयाचे आहे.

## मोक्षालाही पराक्रम अवश्य

मोक्ष हे जरी अंतिम ध्येय असले तरी मोक्ष ही मनाची एक अति उन्नत अशी अवस्था असल्यामुळे ती समाजाच्या अत्यंत वरच्या व प्रगत अशा अवस्थेतच शक्य आहे. ज्या समाजातील लोकांचे आचार शुचिर्भूत आहेत, विचार प्रगल्भ व पवित्र आहेत, जेथे उत्तम राज्यव्यवस्था असून लोकव्यवहार सरळपणे चालतात, जो समाज विद्यासंपन्न व पराक्रमी असून परकीय आक्रमणापासून आपले रक्षण करण्यास समर्थ असतो. अशाच समाजात मोक्षकल्पनेचा उद्गम व परिणती आणि मोक्षसाधनाचे प्रयत्न शक्य आहेत असा महाभारतीय तत्त्ववेत्त्यांचा पहिला सिद्धान्त आहे. यस्यैवबलमोजश्च स धर्मस्य प्रभुर्नरः। –( शां. १५२।१८) अज्ञानात खितपत असलेला, रानटी, भुकेकंगाल हीन, दीन, दरिद्री, पराक्रमशून्य, परतंत्र अशा समाजाचा व मोक्ष या अत्यंत उदात्त कल्पनेचा काहीएक संबंध नाही. एखादी व्यक्ती अशाही समाजात मोक्षसाधन करील, नाही असे नाही. पण एका व्यक्तीच्या मोक्षासाठी धर्मप्रवृत्ती झालेली नाही. अखिल समाजाला मोक्षधर्माची जर शिकवण द्यावयाची असेल – आणि तेच भारतीय तत्त्ववेत्ते आपले कर्तव्य समजतात–तर त्या समाजाची अवस्था वर सांगितल्याप्रमाणे सुसंस्कृत अशी असलीच पाहिजे.

क्षुधा निर्णुदति प्रज्ञां धर्मबुद्धिं व्यपोहति
क्षुधापरिगतज्ञानो धृतिं त्यजतिचैव ह।

—१४।९०।९१.

क्षुधेमुळे माणसाचा बुद्धिभ्रंश होतो आणि त्याच्या धर्मनिष्ठेचाही लोप होतो. त्याचप्रमाणे क्षुधा माणसाचे ज्ञान नष्ट करून त्याचे धैर्यही हिरावून घेते— हे कठोर सत्य या प्रज्ञावंत पुरुषांना चांगले

माहीत आहे. त्यामुळे धर्माच्या प्रसारासाठी राष्ट्रात सुस्थिती असणे अवश्य आहे असे त्यांचे निश्चित मत आहे. ( धर्म हा शब्द असल्या संदर्भात पारमार्थिक मोक्षधर्म अशा अर्थाने घ्यावयाचा. ) आणि राजधर्मात दण्डनीतीचे माहात्म्य सांगताना त्यांनी याचे उत्कृष्ट विवेचन केले आहे.

## राजधर्म सर्वश्रेष्ठ

सुस्थिती असेल, शांतता असेल, माणसांचे व्यवहार नियंत्रित असतील, तरच धर्माकडे प्रवृत्ती होत असते हे जाणून धर्म-व्यवस्थेत भारतीय तत्त्ववेत्त्यांनी राजधर्माला अग्रस्थान दिलेले आहे. राज्यव्यवस्था उत्तम टिकवून धरणे याइतके पुण्यप्रद त्यांच्या मते दुसरे काहीच नाही. कारण पुढील सर्व इमारतीचा तो पाया आहे. म्हणून प्रथम प्रत्येकाने सर्व कर्तव्ये बाजूस सारून त्यासाठी सर्वस्व अर्पण केले पाहिजे. भीष्म म्हणतात —

**यथा राजन् हस्तिपदे पदानि, संलीयन्ते सर्व सत्त्वोद्भवानि ।**
**एवं धर्मान् राजधर्मेषु सर्वान् सर्वावस्थान् संप्रलीनान् निबोध ।।**

—शांति ६३।२५.

' हे राजा, ज्याप्रमाणे एकट्या हत्तीच्या पावलात इतर सर्व प्राण्यांच्या पावलांचा समावेश होतो त्याप्रमाणे एका राजधर्मात इतर सर्व धर्मांचा सर्वप्रकारे अंतर्भाव होतो, हे तू पक्के समज. '

महाभारतात राजधर्माची महती दुसऱ्या एका ठिकाणी अशीच वर्णन केली आहे. कोसल देशाचा राजा वसुमन्त याने बृहस्पतीला पुढीलप्रमाणे प्रश्न केला, ' हे देवगुरो, प्राण्यांचा अभ्युदय होण्याचे साधन कोणते? कोणत्या कर्माच्या योगाने त्यांचा नाश होतो, आणि कोणाचे आराधन केले असता त्यांना अविनश्वर म्हणजे शाश्वत

सुखाची प्राप्ती होते ? ' यावर बृहस्पतीने जे विवेचन केले ते फार महत्त्वाचे आहे. शाश्वत सुखाच्या प्राप्तीसाठी ऐहिक धनवैभवाचा त्याग केला पाहिजे असे न सांगता प्रथम राज्यव्यवस्था उत्तम पाहिजे हे बृहस्पतीने बजावले हे विशेष आहे.

बृहस्पती म्हणाला—' हे महाप्राज्ञ, राजा हाच लोकांच्या धर्माचे मूळ आहे असे दिसून येते. राजाच्या भीतीमुळेच प्रजा परस्परांना भक्षण करीत नाहीत. मर्यादा सोडून वागणाऱ्या व परस्त्रीवर आसक्त होणाऱ्या सर्व लोकांना, धर्माच्या अनुरोधाने शिक्षा करून राजाच ताळ्यावर आणतो. राजाने पालन केले नाही तर बलवान लोक निर्बलांच्या धनाचा अपहार करतील. कोणालाही ही वस्तू माझी आहे असे निश्चितपणे म्हणता येणार नाही. राजा नसेल ( म्हणजे शासन व्यवस्थित नसेल ) तर स्त्री, पुत्र, द्रव्य व परिवार ही सर्व नाहीशी होऊन सर्वत्र शून्य होऊन जाईल. धर्माचरण करणाऱ्या लोकांवर नानाप्रकारे शस्त्रप्रहार होतील. अधर्माला आधार मिळेल. सर्व लोक दरवडेखोर बनतील. ब्राह्मण अध्ययन करणार नाहीत. कृषी व वाणिज्य यांचा नाश होईल, धर्म रसातळास पोचेल व वेदत्रयाचे अस्तित्वच नाहीसे होईल. यज्ञविधी चालणार नाहीत, विवाहाचे अस्तित्व रहाणार नाही व समाज नष्ट होईल.

राजा रक्षण करीत असला म्हणजे लोक स्वच्छंदपणे घराची दारे उघडी टाकून निर्भयपणे झोप घेतात. स्त्रिया सर्व प्रकारच्या अलंकारांनी भूषित होऊन पुरुष मनुष्य बरोबर घेतल्यावाचून, निर्भयपणे मार्गावरून जाऊ शकतात. लोक धर्माचाच अंगीकार करतात, परस्परांना क्लेश देत नाहीत, इतकेच नव्हे, तर एकमेकांवर अनुग्रह करतात. राजा, शेती व व्यापार यांवर सर्व जग अवलंबून असते

व राजा नीट पालन करीत असेल तरच यांची व्यवस्था नीट राहते. सारांश ज्याचे अस्तित्व नसल्यास कोणत्याही प्राण्याचे अस्तित्व रहाणार नाही व ज्याचे अस्तित्व असेल तरच सर्व समाजाचे अस्तित्व असते त्या राजाचा बहुमान कोण करणार नाही ! ( यस्याभावेन भूतानामभावः स्यात् समन्ततः । भावे च भावो नित्यं स्यात् कस्तं न प्रतिपूजयेत् । —शांति ६८।३७ )

राजा ही एक व्यक्ती नाही. ती तशी आहे असे समजून राजाचा अवमान करणे अश्लाघ्य होय. राजा हा प्रजेचे प्रौढ असे अंतःकरणच होय. जो मनुष्य राजाचे प्रिय व हित करण्याविषयी उद्युक्त होतो व जो सर्व लोकांत त्याचा दरारा उत्पन्न करण्याचा कार्यभार आपल्या शिरावर घेतो त्याला इहपरलोकांची प्राप्ती होते.' –( शांति अ. ३८ )

समाजाचे अस्तित्व टिकविणे हा प्रत्येक मानवाचा श्रेष्ठधर्म होय हे महाभारती तत्त्ववेत्त्यांनी किती ठामपणे सांगितले आहे हे यावरून दिसून येते. मोक्ष हे जरी अंतिम साध्य असले तरी समाजाच्या सुस्थितीकडे दुर्लक्ष झाले तर समाजाचे अस्तित्वच नष्ट होईल व मग सर्वच धर्म उत्सन्न होतील ही जाणीव फार प्रखरपणे या थोर पुरुषांच्या मनांत होती व म्हणूनच प्रवृत्तिधर्मांचा त्यांनी जोराने पुरस्कार केला आहे. राजधर्म हा सर्व धर्मांत श्रेष्ठ होय या म्हणण्यातले रहस्य हेच आहे. आणि हा धर्म सांभाळून समाजाची सुस्थिती टिकवून धरणे याची जबाबदारी जरी राजावर असली तरी त्याचे एकट्याचेच ते काम नसून समाजातील प्रत्येक व्यक्तीचे ते कार्य आहे, कोणीही यातून सुटू शकत नाही, असे त्यांना सांगावयाचे आहे. म्हणूनच राजाचे हित करणारा, त्याच्या शासनाचा दरारा सर्वत्र पसरणारा यालाही इहपरलोकांची प्राप्ती होते असे बृहस्पतीने सांगितले आहे. मोक्षासाठी एकटा प्रवृत्तिधर्मच

पुरेसा आहे, काही काल प्रवृत्ति स्वीकारली तरी पुढे निवृत्ती स्वीकारणे अवश्य आहे, असे मुळीच नाही असे महाभारतकारांचे मत तर आहेच, पण निवृत्तिवादी लोकही या प्राथमिक धर्मातून सुटू शकत नाहीत असे त्यांचे स्पष्ट मत आहे. एकाददुसरा माणूस संसार सोडून गेला तर निराळे. त्यामुळे समाजाचे काही बिघडणार नाही. पण अनेकांची अशी प्रवृत्ती होऊ लागली किंवा निवृत्ती श्रेष्ठ आहे, असा नुसता विचार प्रबळ झाला तर समाजच नष्ट होईल आणि मग प्रवृत्ति नाही, निवृत्ति नाही आणि त्यांनी प्राप्त होणारा मोक्षही नाही अशी अनर्थकारक स्थिती प्राप्त होईल. हा विचार महाभारतात राजधर्मप्रकरणी अनेक वेळा सांगण्यात आला आहे. ब्राह्मण यज्ञयाग करीत असले, तपश्चर्या करीत असले म्हणजे त्यातून जे पुण्य निर्माण होईल त्याच्या बळावर सर्व व्यवस्था ठीक होईल असे महाभारतकारांना मुळीच वाटत नाही. कारण राज्यव्यवस्था ठीक नसेल तर वेदत्रयांचे अस्तित्वच नष्ट होईल, ब्राह्मण यज्ञ करीनासे होतील व तपश्चर्या त्यांना करता येणार नाही. असे असल्यामुळे प्रथम सर्व सामर्थ्य माणसांनी राज्य स्थापणे, त्याचे स्वातंत्र्य टिकविणे, त्यात शांतता प्रस्थापित करणे यासाठी खर्च केले पाहिजे असे भारतात पुन्हा पुन्हा सांगितले आहे.

भीष्म म्हणतात, ‘ जर या लोकात शासनकर्ता राजा नसेल तर बलिष्ठ लोक दुर्बलांना भक्षण करून टाकतील. जो पुरुष दास नसेल त्याला दास केले जाईल ( दासाला प्रवृत्ती किंवा निवृत्ती कशाचेच स्वातंत्र्य नाही) व स्त्रिया बलात्काराने हरण केल्या जातील. म्हणून या भूतलावर ज्या लोकांना कल्याणाची इच्छा असेल त्यांनी समाजावर अनुग्रह करण्यासाठी राजा निर्माण केलाच पाहिजे.’ —( शांति ६७ ).

सत्य, त्रेता, द्वापर, कलि इत्यादी युगे राजाच निर्माण करतो असे जे महाभारतात पुन्हा पुन्हा सांगितलेले आढळते त्याचे मर्म हेच आहे, 'जेव्हा राजा योग्यप्रकारे व पूर्णपणे दण्डनीतीच्या अनुरोधाने वागतो तेव्हा श्रेष्ठ अशा कृतयुगाची प्रवृत्ती होते. त्या कृतयुगात केवळ धर्मच अस्तित्वात असतो.' असे सांगून राजा दण्डनीतीचे अवलंबन जसजसे कमी करीत जातो तसतशी त्रेता, द्वापर ही युगे निर्माण होतात व जेव्हा राजा दण्डनीतीचा सर्वथैव त्याग करतो तेव्हा कलियुग निर्माण होऊन सर्वत्र अधर्म पसरतो असे भीष्मांनी सांगितले आहे. —( शां. ६९ ).

राज्याच्या व समाजाच्या सुव्यवस्थेची जबाबदारी फक्त राजावरच असते असे नाही. राजा जर प्रजेचे पालन योग्य प्रकारे न करील तर तो चोर होय, असे समजून लोकांनी त्यास दूर करावे किंवा वेळ पडल्यास ठारही मारावे व दुसरा कर्ता, प्रजेचे पालन करणारा राजा सिंहासनावर आणावा असे महाभारतात अनेक वेळा सांगितले आहे.

> अरक्षितारं हर्तारं विलोप्तारं अनायकम् ।
> तं वै राजकलिं हन्युः प्रजाः संनह्य निर्घृणम् ॥
> —१३।६१।३२.

> अहं वो रक्षितेत्युक्त्वा यो न रक्षति भूमिपः ।
> स संहत्य निहन्तव्यः श्वेव सोन्माद आतुरः ॥
> —१३।६१।३३.

प्रजेचे रक्षण न करिता तिजपासून जो कर घेतो, व प्रजेला सन्मार्गाला न लावता जो लुबाडतो तो राजरूपी कली प्रजेने सज्ज होऊन निष्ठुरपणे ठार मारावा. 'मी तुमचे रक्षण करीन' असे

म्हणून जो राजा त्याप्रमाणे प्रजेचे रक्षण करीत नाही त्याला, सर्वांनी एक होऊन, सडक्या, पिसाळलेल्या कुत्र्याप्रमाणे ठार करावे.

## प्रजाही जबाबदार

यावरून राष्ट्राची सुस्थिती, शांतता व परचक्रापासून रक्षण याची सर्व जबाबदारी केवळ राजावर नसून ती सर्व प्रजेवर आहे हे स्पष्ट होते आणि म्हणूनच राष्ट्ररक्षण हा प्रत्येकाचा आद्यधर्म होय असा भारतीय तत्त्ववेत्त्यांचा स्पष्ट सिद्धान्त आहे हे निर्विवाद-पणे ठरते.

वरील विवेचनाचा तात्पर्यार्थ असा होतो. मोक्ष हे प्रत्येक मानवाचे अंतिम साध्य आहे. पण या मोक्षासाठी निवृत्तिधर्माचीच आवश्यकता आहे असे नाही. प्रवृत्तिधर्माने संसारात आमरण राहूनही मोक्ष मिळविता येतो. येथपर्यंत प्रवृत्ती व निवृत्ती हे दोन्ही धर्म सारख्याच योग्यतेचे आहेत असे दिसते. पण पुढील कारणा-मुळे तसे म्हणता येत नाही. मोक्ष ही अति उन्नत अशी मानसिक अवस्था आहे. ती मानवांना प्राप्त व्हावयाची असेल तर त्या समाजाची स्थिती फार उत्तम असणे अवश्य आहे. राष्ट्र बलवान, धनसंपन्न, स्वतंत्र व पराक्रमी असे असल्यावाचून त्यातील माणसांना स्थितप्रज्ञाची अवस्था अथवा मनाची ब्राह्मीस्थिती प्राप्त करून घेणे शक्य नाही. राष्ट्र बलसंपन्न व्हावयाचे तर प्रजेतील प्रत्येक मनुष्याने त्यासाठी कष्ट करण्यास, त्याग करण्यास सिद्ध असले पाहिजे. शरीर, मन, बुद्धी यांची सामर्थ्ये प्रथमतः त्याने या कार्यासाठीच अर्पिली पाहिजेत. राष्ट्रातील कर्त्या पुरुषांचा निवृत्ति धर्माकडे कल होऊ लागला तर हे साधणार नाही व समाज

उत्सन्न होईल व मग माणसे धर्माचरणास असमर्थ होतील. तेव्हा मोक्षाच्या दृष्टीने विचार केला तरी समाजाचे रक्षण करणे, हाच प्रत्येक मानवाचा आद्यधर्म आहे असा सिद्धान्त होतो.

## अर्थाची महती

राष्ट्ररक्षण हा आद्यधर्म असा सिद्धान्त ठरल्यानंतर त्या राष्ट्राची उन्नती मुख्यतः ज्या अर्थावर, धनावर अवलंबून आहे त्या अर्थाला धर्मव्यवस्थेत फार महत्त्वाचे स्थान प्राप्त होणे हे क्रमप्राप्तच आहे. आणि महाभारतकारांनी धनाचे हे महत्त्व जाणून त्याला योग्य तें स्थान दिलेलेही आहे.

पितामह भीष्मांनी धनाचे महत्त्व पुढीलप्रमाणे वर्णन केलेले आहे :

राज्ञः कोशबलं मूलं, कोशमूलं पुनर्बलम् ।
तन्मूलं सर्वं धर्माणां धर्ममूलाः पुनः प्रजाः ॥
—शां. १३०।३६.

एवं कोशस्य महतो ये नराः परिपन्थिनः
तानहत्वा न पश्यामि सिद्धिमत्र परंतप ॥
—शां. १३०।४३.

धनेन जयते लोकमिमं चामुं च भारत
सत्यं च धर्मवचनं यथा नास्त्यधनस्तथा ॥
—शां. १३०।४४.

कोश (खजिना) व सैन्य हे राजाचे मुख्य बल होय. त्यांतील सैन्य हे कोशावर अवलंबून असते. सैन्य हेच सर्व धर्मांचा आधार असून धर्म प्रजेचा आधार असतो. म्हणजे पर्यायाने सर्व धर्मांचा आधार कोश (धन) हाच होय. सर्व धर्मांचा आधार असा जो

कोश त्याची प्राप्ती करून घेतांना जे आड येतील त्यांचा वध केला पाहिजे. कारण त्यावाचून धनप्राप्ती होईलसे दिसत नाही. राजा, धनाच्याच साह्याने इह व परलोक प्राप्त होतात हे धर्मवचन सत्य आहे. हे युधिष्ठिरा, धनहीन पुरुष हा असून नसल्यासारखाच होय."

बारा वर्षे वनवासात राहून आल्यानंतर युधिष्ठिराला सुद्धा धनाशिवाय सर्व व्यर्थ आहे हे ध्यानी आले. तो श्रीकृष्णाला म्हणाला, 'कृष्णा, निर्धन पुरुष जिवंत असून मेल्यासारखाच आहे. धन हाच श्रेष्ठ धर्म आहे असे म्हणतात. सर्व काय ते धनावरच अवलंबून आहे. धनहानी झाली की तीबरोबर पुरुषाचे धर्म, काम हे ठार होतात आणि मग ते जिणे कसले? मनुष्य जोपर्यंत लक्ष्मीच्या कृपाछत्राखाली आहे तोपर्यंतच तो पुरुष या संज्ञेस पात्र होतो व त्याची धर्मनिष्ठा अढळ राहाते, त्याच्या अंतःकरणाची चलबिचल होत नाही. आपले कार्य त्याला पार पाडता येते. अधर्माकडे त्याचे मन जात नाही. हे मधुसूदना, आमचे राज्य गेले व अनेक वर्षे आम्ही हालात काढली. तेव्हा आता कोणत्याही न्यायाने पाहिले तरी आम्हांस संपत्ती घालविणे योग्य नाही. म्हणून आता प्राणव्ययानेही संपत्ती मिळविण्यास आम्ही कमी करणार नाही.' —( उद्योग अ. ७२ )

महाभारतात धर्म, अर्थ व काम यांची महती अनेक ठिकाणी गाइलेली आहे. आणि ती वाचताना एक गोष्ट सहज ध्यानात येते ती ही की या तीनही पुरुषार्थांचे भारतीय तत्त्ववेत्ते सारखेच महत्त्व मानतात. धर्माचे ( शुद्ध, सत्य, प्रेम, अहिंसा यांचे ) महत्त्व अतिशय आहे. याबद्दल वादच नाही. पण त्याकडे जास्त लक्ष देऊन अर्थ व काम यांची हानि कोणी करू लागला तर त्याचा

नाश झाल्याखेरीज राहणार नाही असे भारतात अनेक वेळा अनेक विचारी पुरुषांनी सांगितलेले आहे.

बलरामाने एका प्रसंगी असे उद्गार काढले आहेत—

धर्मार्थौ धर्मकामौच कामार्थौ चाप्यपीडयन्
धर्मार्थकामान् योऽभ्येति सोत्यन्तं सुखमश्नुते ।
—शल्य ६०।२२.

" जो मनुष्य विषयवासनेने धर्मार्थास धक्का लागू देत नाही, अर्थ साधण्यासाठी धर्मकाम बुडवीत नाही, आणि केवळ धर्माच्या पाठीस लागून अर्थकामावर पाणी सोडीत नाही तर धर्म, अर्थ व काम ( ऐहिक विषयाबद्दलच्या वासना ) या तिहींचे एकसमयावच्छेदेकरून समसमान सेवन करतो तोच आत्यंतिक सुख भोगतो. "

धृतराष्ट्राला उपदेश करताना कणिकानेही हाच अभिप्राय व्यक्त केला आहे. कणिक म्हणाला, ' राजा, धर्म, अर्थ व काम या तिन्हींपैकी एक दुसऱ्यास उपसर्ग करणार नाही, अशाप्रकारे त्यांचा उपभोग घ्यावा. म्हणजे पीडा न होता सुखोत्पत्ती होईल. कोणी धर्माकडेच विशेष लक्ष देईल तर त्यास अर्थहानी व कामनाश ही दुःखे प्राप्त होतील. कोणी अर्थाकडेच सर्व लक्ष देईल तर धर्म व काम यांच्या हानीमुळे त्याला क्लेश होतील व कोणी केवळ कामासक्तच झाला तर धर्मार्थांची हानी होईल. यास्तव या तीनही पुरुषार्थांचे सेवन एकमेकांस उपसर्ग न पोचेल अशा रीतीने केल्यास त्यापासून इष्ट ती सुखें मिळून दुःखापासून अलिप्त राहता येईल. '

याशिवाय अर्जुन, भीम, द्रौपदी यांनी युधिष्ठिराशी संभाषण करताना आपले अनुभवसिद्ध रोकडे व्यवहारी बोल त्यास अनेक वेळा ऐकविले आहेत. कौरवांना जिंकल्यावरही युधिष्ठिर जेव्हा

पुन्हा अरण्यात जाण्याची भाषा बोलू लागला तेव्हा अर्जुन त्यास म्हणाला, ' राजा, अर्थ असेल तरच धर्म, काम आणि स्वर्ग यांची प्राप्ती होते. लोकांची जीवितयात्राच अर्थावाचून चालणार नाही. हे नरश्रेष्ठा, धनाच्या योगाने कुळाचा उत्कर्ष होतो व धन असेल तर धर्माची वाढ होते. निर्धनाला ना इहलोक वा परलोक. द्रव्य नसता धर्मकृत्ये यथासांग करता येत नाहीत. पर्वतापासून जशी नदी तसा द्रव्यापासून धर्म उत्पन्न होतो. (धनात् हि धर्मः स्रवति शैलादपि नदी यथा ) राजा, लोक पातकी मनुष्यासंबंधी हळहळतात, आणि निर्धनाच्यासंबंधीही हळहळतात. मला तर पातकी व दरिद्री यांच्यामध्ये काही भेद दिसत नाही. —( शांति ८ ).

अरण्यात राहात असताना भीमानेही धर्माला अर्थाचे महत्त्व पटवून देण्याचा परोपरीनें प्रयत्न केला होता. तो म्हणाला, ' हे पुरुषश्रेष्ठा, आपल्या अंगी इतर सर्व गुण असले तरी अर्थ नसल्यास धर्माचे आचरण करणे शक्य नाही. राजा धर्म हे सर्व जगताचे मूळ असून धर्माहून श्रेष्ठ असे दुसरे काही नाही हे खरे, पण हा धर्म, विपुल अर्थ असेल तरच, आचरण करता येणे शक्य आहे. सारांश जरी धर्माची इच्छा असली तरी प्रथम अर्थ संपादन केला पाहिजे. म्हणून हे राजा, तू आपल्या पराक्रमाने प्रथम अर्थ संपादन कर. कारण ऐश्वर्यरूपी अभ्युदय हाच धर्म होय असे ज्ञानी लोकांनी सांगितले आहे.'—( वन. अ. ३३ ).

दुसऱ्या एका प्रसंगी अर्जुनाने अर्थाच्या महत्त्वासंबंधी पुढीलप्रमाणे आपला अभिप्राय व्यक्त केला आहे. ' हे राजा, ही पृथ्वी म्हणजे कर्मभूमी आहे. म्हणून या ठिकाणी कृषी वाणिज्य व गोरक्षण आणि नानाप्रकारची कलाकौशल्ये हीच प्रशस्त होत. या सर्व गोष्टी म्हणजे अर्थच होत. या अर्थावाचून धर्माचे किंवा

कामाचे अस्तित्वच राहणार नाही अशी श्रुती आहे. ( निवृत्तेर्थे न वर्तेते धर्मकामाविति श्रुतिः ।—शांति. १६७।१२ ) अर्थप्राप्ती झाली असता हे दोन्ही पुरुषार्थ संपादन करता येतात. धर्म व काम यांच्यासाठी जो अर्थाचा विनियोग करतो तो पुरुष श्रेष्ठ होय. हे राजा, जटा व कृष्णाजिने धारण करणारे, किंवा शिरोमुंडन केलेले यती, नैष्ठिक ब्रह्मचारी, विद्वान इ. प्रकारचे लोक अर्थाचाच अभिलाष करितात. तेव्हा अर्थशास्त्राच्या श्रेष्ठत्वाचे ज्ञान होणे हाच खरा प्रकाश असून ते न होणे हाच अंधकार होय. हे ज्ञानसंपन्न श्रेष्ठा, जो पुरुष आपल्या सेवकांना ऐश्वर्यसंपन्न करून शत्रूंना दंड करतो तोच खरा अर्थवान होय असे माझे मत आहे.'

महाभारतातील कर्त्या पुरुषांना अर्थाची महती किती वाटत होती हे वरील विवेचनावरून कळून येईल. धर्माची महती त्यांनी अनेक ठिकाणी सांगितलेली आहेच. धर्म हेच पुरुषाचे साध्य होय. धर्मावाचून मनुष्य पशूसारखा होईल असे अनेक ठिकाणी त्यांनी सांगितलेले आहे व ते योग्यच आहे. कर्तव्यनिष्ठा, ध्येयनिष्ठा यांचे महत्त्व कधीच कोणी कमी करू शकणार नाही. पण त्याबरोबरच तो श्रेष्ठ धर्म साध्य होण्यासाठी अर्थ हे अत्यंत प्रभावी साधन असून त्यावाचून धर्मनिष्ठा ही टिकू शकत नाही म्हणून अर्थाकडे केव्हाही दुर्लक्ष करू नये असे भारतीय तत्त्ववेत्त्यांचे सांगणे आहे.

## दारिद्र्य हे पातक होय

धर्मनिष्ठेच्या भरात अनेक वेळा धनाची निंदा व दारिद्र्याची स्तुती केली जाते. भावनेच्या भरात काही विशेष उद्देशाने तसे करणे केव्हा केव्हा युक्त ठरते. पण ते परमार्थाने घेणे हा अविचार आहे. आणि हा अविचार आपल्या देशात पुढे पुढे फार प्रबळ

झाल्यामुळे लोक ऐश्वर्यापासून भ्रष्ट झाले. वास्तविक पाहता दारिद्र्याची स्तुती कधीही कोणी करू नये असे भारतकारांनी बजाविले आहे. ते म्हणतात—

अभिशस्तं प्रपश्यन्ति दरिद्रं पार्श्वतः स्थितम् ।
दरिद्रं पातकं लोके न तत् शंसितुमर्हति ॥

——शांति ।८।१४.

दरिद्री मनुष्य जवळ उभा राहिला असता एखाद्या पातकी मनुष्याप्रमाणे लोक त्याच्याकडे पाहतात. या लोकात दारिद्र्य हे एक पातकच आहे ! म्हणून त्याची प्रशंसा करणे योग्य नाही.

## क्षात्रतेज

धन हे जसे राष्ट्राचे बल आहे, त्यावर जसे राष्ट्राचे भवितव्य अवलंबून आहे त्याचप्रमाणे प्रखर असे जे क्षात्रतेज त्यावरही ते अवलंबून आहे. तेही राष्ट्राचे बल आहे किंबहुना तेच प्रधानबल होय असे महाभारतकारांचे मत आहे. पण अनेक मानवांत स्वार्थ प्रबल असतो आणि त्यांच्या अंगच्या क्षात्रतेजालाही जागृती आणण्यास व तें कायमचे टिकविण्यास ऐश्वर्याचे विलोभन अवश्य असते म्हणून धनाची महती गावी लागते. सारासार विचार केला तर ही दोन्ही बले परस्परावलंबी आहेत असे दिसते. धन, ऐश्वर्य यांच्या प्राप्तीमुळे व त्याच्या रक्षणासाठी, माणूस आपले क्षात्रतेज प्रगट करतो, त्याचप्रमाणे पुष्कळ वेळा क्षात्रतेजाने माणूस लक्ष्मीला वश करून घेतो. पण एवढे खरे की धन असूनही क्षात्रतेज नसेल तर सर्व व्यर्थ होते. त्यामुळेच क्षात्रतेजाची भारतीय तत्त्ववेत्त्यांनी फार महती गाइली आहे आणि ज्ञानाशिवाय मोक्ष नाही वगैरे सिद्धान्त बाजूला ठेवून रणात छातीवर वार घेत मृत्यू

पावणाऱ्या वीराला योगयुक्त संन्याशाचीच गती मिळते असे सांगितले आहे.

वनवास संपवून पांडव परत आले तरीही दुर्योधन त्यांना त्यांचे राज्य देईना. तेव्हा युद्ध हे टळत नाही असे युधिष्ठिरालाही दिसू लागले. तरी पण धर्माधर्माच्या अनिश्चयामुळे त्याचे मन शंकाकुल होतच होते. 'आम्हांला पाच गावे दिलीस तरी आम्ही संतुष्ट आहो, मग आम्ही राज्य मागणार नाही.' असा त्याने दुर्योधनाला निरोप पाठविला. आणि 'क्षत्रियधर्म म्हणजे मूर्तिमंत पापच आहे, युद्ध हे एकंदरीत वाईटच, जय मिळाला तरी, शत्रूला मारला, ही गोष्ट मनाला खातच राहाते, शत्रूच्या पाया पडून आपला राज्यभाग मागून घेण्याने जर युद्ध टळत असेल, शांती मिळत असेल, तर तेच श्रेयस्कर'. वगैरे तत्त्वज्ञान तो सांगू लागला. त्या वेळी त्याची ती युद्धनिन्मुखता नष्ट करण्यासाठी श्रीकृष्णांनी पुढील स्फूर्तिदायक भाषण केले. ते म्हणाले, 'हे राजा, क्षत्रियाने रणांगणांत उभे राहावे हाच त्याचा शाश्वतधर्म होय. युद्धात जय झाला किंवा न झाला तरी त्याने युद्धच केले पाहिजे. दीनासारखी याचना करणे हा क्षत्रियाचा धर्म नाही. हे महाबाहो, तू पराक्रमी असून असा दीन का होतोस? ऊठ, तरवार गाजव आणि वाटेल तर सर्वच राज्य घे. तुझी समेटाची आशा व्यर्थ आहे. दयेस्तव, दैन्यास्तव किंवा धर्मार्थास्तव तुझी इच्छा कौरव पूर्ण करणार नाहीत. अशांची तू कीव काय करीत बसला आहेस? अरे, वाटेल त्याने खेटर चढवावे अशा लायकीचे ते लोक आहेत आणि 'त्यांना मी कसा मारू' हा मंत्र तू घोकीत बसला आहेस. ऊठ आणि त्यांना ठेचून टाक. हत्यार उचलण्यास तुला नवे निमित्त नको आहे. जुनी पुष्कळ आहेत.' –( उद्योग अ. ७२ ).

## द्रौपदीचा संताप

युधिष्ठिराने समेटाचा आग्रह धरला आहे व श्रीकृष्ण त्याप्रमाणे कौरवांशी समेट करण्यास जात आहे हे ऐकून द्रौपदी अत्यंत संतापून गेली. सूडाच्या भावनेने ती तेरा वर्षें सारखी जळत होती. वैरवन्ही तिच्या चित्तात अहोरात्र प्रज्वाळलेला होता. आणि त्याचा उपशम न करता आपले पती पुन्हा याचकासारखी समेटाची इच्छा करू लागले ही कल्पना तिला असह्य झाली आणि अशा स्थितीत श्रीकृष्ण दिसताच ती विजेसारखी कडकडकड करू लागली. ती म्हणाली, ' कृष्णा, माझा अवमान करून क्षणभर तरी दुर्योधन जिवंत राहातो त्याअर्थी अर्जुनाच्या धनुर्विद्येला धिक्कार असो आणि त्या भीमाच्या सामर्थ्याचाही धिक्कार असो. कृष्णा, तूं संधी करू पाहत आहेस; पण दुःशासनाने आसडा मारलेला माझा हा केशपाश तुझ्या लक्षात असू दे. हे भीमार्जुन आज याचकासारखे संधी करू पाहत आहेत! तरी चिंता नाही. माझे वृद्ध पिताजी व माझा महारथी बंधू हे माझ्यासाठी लढतील. शिवाय माझे महाबलशाली असे पाच पुत्र आहेत. अभिमन्यूला नायक करून ते माझ्यासाठी लढतील. सख्या कृष्णा, माझ्या वेणीला ज्याने आसडा मारला तो दुःशासनाचा हात छिन्नभिन्न होऊन रक्ताने व धुळीने भरलेला असा जोपर्यंत माझ्या दृष्टीला पडला नाही तोपर्यंत माझ्या मनाला शांतता मिळणार नाही. पेटलेल्या अग्नीप्रमाणे हा संताप पोटात ठेवून प्रसंगाची वाट पाहात असता आज तेरा वर्षे लोटली आणि आज माझ्या प्रिय भीमराजालाहि धर्म आठवला आहे. '

असे बोलून ती विशालनयना, द्रौपदी अश्रूंनी कंठ दाटून येऊन सकंप व गद्गद स्वराने रडू लागली. तेंव्हां द्रवीभूत अग्नी-

प्रमाणे तिच्या डोळ्यांतील कढत अश्रू तिच्या परस्पर संलग्न पुष्ट स्तनांवर अविरत पडू लागले व शोकाने व संतापाने तिच्या काळजाचे पाणी होऊन तेच नेत्रावाटे लोटत आहे की काय असा भास होऊ लागला. --( उद्योग ८२ ).

शिष्टाई संपवून हस्तिनापुराहून श्रीकृष्ण परत फिरले त्या वेळी कुंतीने आपल्या पुत्रांना पुढीलप्रमाणे निरोप पाठविला. 'केशवा, त्या धर्मवेड्या युधिष्ठिराला सांग की, अर्थज्ञानरहित वेदाची केवळ घोकंपट्टी करणाऱ्या ब्राह्मणाची बुद्धी जशी मद्दड होऊन जाते व तो जशी वेदाची नुसती वटवट करीत बसतो त्याप्रमाणेच तू धर्म, धर्म करीत बसला आहेस. तुझी बुद्धी मंद झाली आहे आणि तू एक गौबाई झाला आहेस. अरे, हा कसला धर्मसंचय? असले धर्माचे खूळ घेऊन बसू नको. धर्माच्या भ्रमाखाली भलते काही तरी करू नको. शत्रुमर्दन करणे व प्रजेचे पालन करणे हा क्षत्रियाचा धर्म होय. युधिष्ठिरा, सांप्रत तू जी वृत्ती धरिली आहेस ती धारण करण्यासाठी मी तुला जन्म दिला नव्हता. तुझ्या या शत्रुहित-तत्परतेमुळे पुत्रवती होऊनही मला घासभर अन्नासाठी दुसऱ्याच्या तोंडाकडे पाहावे लागत आहे. मला कोणीच वाली उरला नाही.'

पण या सर्वांपेक्षा क्षात्रधर्माचा खरा तेजस्वी संदेश महाभारतातील विदुला-पुत्रसंवाद या प्रकरणात आहे. संजय नावाचा राजपुत्र सिंधुदेशच्या राजाकडून पराभूत झाल्यामुळे दीन व निराश होऊन हातपाय गाळून बसला होता. राज्य परत मिळविण्याचा उद्योग करावा असे त्याच्या मनातच येईना. त्या विचाराने त्याला कापरेच भरे. त्याची आई विदुलाराणी ही अत्यंत मानी व क्षात्रधर्माभिमानी असल्यामुळे पुत्राचा हा मुर्दाडपणा तिला सहन होईना. असा पुत्र असण्यापेक्षा निसंतान झालेले पत्करेल असे तिला वाटे

व त्यामुळे अगदी संतापून पण पुत्रासाठी तळमळून, जिवाची काहिली होत असताना तिने त्याला उपदेश केला आहे. विदुलेचा हा क्षात्रधर्माचा संदेश इतका प्रखर, इतका तेजस्वी व इतका हृदयभेदक आहे, स्वाभिमान, आवेश, चैतन्य यांनी तो इतका रसरसलेला आहे की, तो वाचीत असताना क्षात्रधर्माची अग्निमय मूर्तीच आपल्यापुढे उभी आहे की काय असा भास होतो. असा संदेश ज्या देशातील माता आपल्या पुत्रांना देतात त्या देशातच धैर्यशील, अजिंक्य, अपराजित व अमोघप्राक्रमी असे पुरुष निर्माण होतात.

युधिष्ठिराचा दळेपणा नष्ट होऊन क्षत्रियाला शोभेसा पराक्रम करण्यास तो उद्युक्त व्हावा म्हणून कुंतीने मुद्दाम त्याला हा विदुलेचा उपदेश ऐकविला होता.

## उद्योग-प्रयत्नवाद

धन आणि क्षात्रतेज यांच्याप्रमाणेच उद्योग हे प्रवृत्तिधर्माचे तिसरे साधन आहे. पौर्वात्य लोक आणि विशेषतः भारतातील लोक हे दैववादी झालेले होते व अजूनही बव्हंशी तसेच आहेत हे खरे. पण भारतीय तत्त्वज्ञानाचा जो राष्ट्रीय ग्रंथ म्हणजे महाभारत त्यात तर ठायी ठायी प्रयत्नवादाचा इतका पुरस्कार केलेला आढळतो की हे लोक दैववादी का व्हावे हे कळेनासे होते. दैवच श्रेष्ठ आहे या अर्थाची काही वचने महाभारतात आहेत, नाही असे नाही. पण तशी कोणत्याही ग्रंथात सापडतील. एवढ्या मोठ्या राष्ट्रीय संसारात तशा मताची काही माणसे असणारच. पण या संसारातले श्रीकृष्ण, भीष्म, भीम, अर्जुन यांसारखे जे कर्ते पुरुष ते तर सदैव उद्योगाचीच प्रशंसा करताना आढळतात

आणि तरी भारतीय लोक दैववादी झाले हे पाहिले म्हणजे पुढच्या काळात भारतीय तत्त्वज्ञानाचा येथल्या लोकांना विसर पडून प्रयत्नवादाला अत्यंत मारक असे कलियुगाचे व निवृत्तीचे तत्त्वज्ञान त्यांनी स्वीकारले असले पाहिजे यात शंका राहात नाही.

पण त्याबरोबरच या तत्त्वज्ञानाचा अंगीकार करताच पुन्हा कृतयुग सुरू होईल असा पूर्ण आत्मविश्वास वाटत असल्यामुळे या थोर पुरुषांची अमृतवचने येथे द्यावी असे ठरविले आहे.

विदुलेने आपल्या पुत्राला जो उपदेश केला त्याचा उल्लेख वर आलाच आहे. त्यात पुरुषप्रयत्नाचे तिने केलेले विवेचन अत्यंत मार्मिक आहे. आपल्या घरातील पुरुष – पती, पुत्र, बंधू – उद्योग सोडून स्वस्थ बसले म्हणजे स्त्रियांच्या चित्ताचा किती ज़ळफळाट होत असेल ते त्यावरून चांगले व्यक्त होते. धर्मराज अरण्यात दुर्योधनाच्या प्रतिकाराचा विचार न करताच स्वस्थ बसलेले पाहून द्रौपदीलाही असाच उद्वेग वाटला व तिने त्यांना उद्देशून पुढील-प्रमाणे भाषण केले :

ती म्हणाली, 'राजा, आज आपल्यावर मोठा अनर्थ ओढवला आहे. पण तुम्ही जर प्रयत्न केला तर तो टळेल यात शंकाच नाही. प्रयत्न केल्यानंतरही जर फलप्राप्ती झाली नाही तर पांडवांच्या हातून कार्यसिद्धी होत नाही, असे तरी एकदा ठरेल. दुसऱ्याच्या, अर्थात शत्रूंच्या प्रयत्नास फल येते का आपले प्रयत्न यशस्वी होतात हे प्रयत्न केल्यानंतर जे फल येईल त्यावरूनच कळेल. तो केल्यावाचून कसे कळणार ? 'दुसऱ्या पुरुषाने जे जे केले असते ते सर्व मी केले आहे, असे असताही जर त्याचे फल मला मिळाले नाही तर त्याचा दोष माझ्याकडे नाही.' असे समाधान धैर्यसंपन्न पुरुषाने मिळविले पाहिजे. प्रयत्न करूनही जर फल

मिळाले नाही तर मग खेद वाटणार नाही. कारण कार्यसिद्धीला प्रयत्नाप्रमाणेच इतरही कारणे असतात. प्रयत्न केला म्हणजे सिद्धी होईल किंवा एखादे वेळी न होईल. पण प्रयत्नाकडे प्रवृत्तीच नसणे हे अगदी अश्लाघ्य आहे. प्रयत्नच केला नाही तर सिद्धी मिळणार की नाही हे कळण्यास मार्ग नाही.

प्रयत्न केला तरीही एखादे वेळी कार्यसिद्धी होत नाही याचे कारण असे की कार्यसिद्धीला इतर पुष्कळ गोष्टी जुळून याव्या लागतात. त्या जुळून आल्या नाही तर फल कमी मिळते किंवा एखादे वेळी मुळीच मिळत नाही. पण तेवढ्यामुळे उद्योगच करू नये हे म्हणणे चुकीचे आहे. कारण कार्याविषयी उद्योगच केला नाही तर सिद्धिरूपी फल निश्चितच मिळणार नाही हे एक आणि दुसरे म्हणजे आपल्या अंगी असणारे शौर्यादि गुण कळूनच येणार नाहीत. देश, काल इत्यादी कार्यसिद्धीची अंगे आहेत हे खरे आणि म्हणूनच सुज्ञ मनुष्य आपला उत्साह आणि सामर्थ्य यांच्या बरोबरच देश, काल, सामादिक उपाय व आपले कल्याण यांचा विचार आपल्या बुद्धीने करीत असतात. पण देश, काल व हे उपाय यांनी कार्यसिद्धी होईलच असे नाही. पराक्रम हाच काय तो कार्यसिद्धी कशी होते हे ठरवितो. यश हे मुख्यत्वेकरून पराक्रमावरच अवलंबून आहे. युधिष्ठिरा, शत्रूचा पराजय करण्याची संधी आलेली दिसताच त्याविषयी उद्योग करू लागणारा मनुष्य, उद्योग जरी सफल झाला नाही, तरी कर्तव्य बजवल्यामुळे आपल्या व दुसऱ्याच्या ऋणातून मुक्त होतो. राजा, काल व स्थिती यांच्या मानाने प्रयत्न करणे हेच सिद्धीचे मूळ कारण आहे. हे भरत-कुलश्रेष्ठा, पूर्वी माझ्या पित्याने एक पंडित ब्राह्मण घरी ठेवून घेतला होता. त्याने ही बृहस्पतिप्रोक्त नीती माझ्या पित्याला सांगितली व

बंधूंना शिकविली. त्या वेळी त्यांच्याकडून मी ती घरामध्ये ऐकिली होती.' —( वन. अ. ३२ ).

## पुरुषप्रयत्न

श्रीकृष्ण शिष्टाईला जाण्यापूर्वी त्यांचे व भीमसेनाचे बरेच बोलणे झाले. त्या वेळी त्यांनी दैव व पुरुषप्रयत्न याविषयी जे विवेचन केले आहे ते अत्यंत शास्त्रीय व सारगर्भ असे असून श्रीकृष्णाच्या नेहमीच्या पद्धतीप्रमाणे अत्यंत रेखीव असे आहे. ते म्हणाले, 'वृकोदरा, या लोकात दैव आणि पुरुषप्रयत्न यांपैकी कोण बलवान हा निर्णय समजावा अशी सर्वांना जिज्ञासा असल्यामुळे त्याचा निर्णय करण्याविषयी पुष्कळ पंडित प्रयत्न करीत असतात. पण तो विषयच असा संशयात्मक आहे की त्याचा निभ्रांत व समाधानकारक उलगडा कोणाच्याने करवत नाही. कारण, जगात पहावे तो जी कृती एक वेळ पुरुषाच्या कार्यसिद्धीला कारण होते तीच दुसरे वेळी कार्यहानीला कारण होते. एवंच, पुरुषयत्न सफल होतोच असे म्हणण्याला संदेह आड येतो. बरे, कोणत्याही गोष्टीतील दोष पूर्वी जाणणारे लोक, असे असे होईल, म्हणून भाकित करून ठेवितात आणि पुढे पहावे तो वायूच्या गतीप्रमाणे ती गोष्ट भलत्याच दिशेला जाते. मोठ्या विचाराने व न्यायाने एखादे कर्म पुरुषाने आरंभून ते मोठ्या काळजीने चालविले असताही दैवाच्या फटकाऱ्याने पालथे पडते. बरे, त्याचे उलट सहजसिद्ध दैवकृत कर्माचा पुरुषप्रयत्नानेही प्रतिकार घडतो. म्हणजे दैव किंवा संचित यांचाही जोर पुरुषप्रयत्नापुढे सदा चालतोच असे नाही. शिवाय, हे पंडुनंदना, पुरुषप्रयत्न सोडून नुसत्या दैवाच्या हवाल्यावर बसल्याने मनुष्याचा उदरनिर्वाहही होणार नाही. तेव्हा

दैव व पुरुषप्रयत्न या दोघांचे आनुकूल्याने सिद्धी प्राप्त होते असे दिसते. हा विचार मनात ठेवूनच पुरुषाने कार्यास प्रवत्त व्हावे. आणि असा ज्याचा बुद्धिनिश्चय झालेला असतो तोच कोणत्याही कामाला बेधडक हात घालतो. कारण त्याने त्यातली गोम पूर्वीच ओळखिली असल्यामुळे काम फसले तरी तो दुःख मानीत नाही व झाले तरी हर्ष मानीत नाही. आणि हे भीमसेना हाच सिद्धान्त प्रस्तुत प्रकरणीही अनुमत आहे. म्हणजे आपण शत्रूंशी-कौरवांशी-युद्ध केल्यास जय प्राप्त होईलच असे म्हणता येत नाही. आणि नाहीच होणार असेही म्हणता येत नाही. सारांश, माझ्या बोलण्याचा मथितार्थ असा की पुरुषाने प्रयत्न करीत असावे. केवळ दैव फिरले असे म्हणून निस्तेज, विषण्ण किंवा म्लान होऊन बसू नये.' —( उद्योग अ. ७७ ).

पितामह भीष्मांचे मत शेवटी देऊन हे 'पुरुषप्रयत्न' प्रकरण संपवू. ते म्हणाले, 'वत्सा युधिष्ठिरा, तू सदैव उत्साहाने प्रयत्न करीत जा. कारण, उत्साहावाचून राजांना त्यांचे दैवच फलदायक होत नाही. दैव व उद्योग हे दोन्ही सारख्याच प्रकारचे आहेत तरी उद्योग हा श्रेष्ठ आहे असे माझे मत आहे. तेव्हा जरी तुझ्या उद्योगाला पुष्कळ संकटे आली, तरीही अंतःकरणाला ताप न होऊ देता सदोदित तू उद्योगच करीत रहा. कारण हे राजा, असे करणे हीच श्रेष्ठ राजनीती आहे.' —( शांति अ. ५६ ).

## गृहस्थाश्रम

धन, ऐश्वर्य यांची आकांक्षा व त्यासाठी प्रयत्न, क्षात्रवृत्तीचे अवलंबन व पुरुषप्रयत्नावर दृढ निष्ठा ही प्रवृत्तीधर्माची लक्षणे येथवर सांगितली. या सर्वांचा परिपोष होण्यास गृहस्थाश्रम हा

अत्यंत अवश्य आहे, संन्यासप्रवृत्ती ही याला निश्चित मारक होईल हे न सांगताही कळण्याजोगे आहे. महाभारतात चारही आश्रमांचे वर्णन आलेले आहे. संन्यासधर्माचे महत्त्वही काही ठिकाणी सांगितलेले आहे. पण गृहस्थधर्माची अतिशय महती गाऊन तो आश्रम सर्वश्रेष्ठ होय असे जे अत्यंत आग्रहाने अनेक ठिकाणी सांगितले आहे त्याचे कारण हेच होय. कारण गृहस्थाश्रमावाचून प्रवृत्तीधर्माला अर्थच नाही.

पराशर मुनींनी मोक्षधर्मप्रकरणीसुद्धा गृहस्थाश्रमाचे महत्त्व पुढीलप्रमाणे सांगितले आहे.

> यथानदीनदाः सर्वे सागरे यान्ति संस्थितिम्
> एवमाश्रमिणः सर्वे गृहस्थे यान्ति संस्थितिम्
> —(शांति २९५।३९).

'ज्याप्रमाणे सर्व नद्या व मोठाले नद हे सागराच्या आश्रयाने राहतात त्याचप्रमाणे इतर आश्रमातील लोक गृहस्थाश्रमी पुरुषावर अवलंबून असतात.'

याचप्रमाणे वेदव्यासांनीही आपले मत दिले आहे.

> गृहस्थस्त्वेष धर्माणां सर्वेषां मूलमुच्यते।
> —( शां. २३४।६ ).

गृहस्थाश्रमी पुरुष हा सर्व धर्मांचा आधार आहे असे ते म्हणतात. युधिष्ठिराला उपदेश करतानाही व्यासांनी हाच अभिप्राय व्यक्त केला आहे. ते म्हणाले, 'गृहस्थाश्रमी मनुष्याच्याच आधाराने देव, पितर, अतिथी आणि पोष्यवर्ग आपली उपजीविका चालवीत असतात. यास्तव हे पृथ्वीपते तू त्यांचे पोषण कर. हे प्रजाधिपते पक्षी, पशू आणि इतरही सर्व प्राणी यांचे पोषण गृहस्थाश्रमी करीत असतो. म्हणूनच गृहस्थाश्रमी श्रेष्ठ होय.

गृहस्थाश्रम हा चारही आश्रमांमध्ये आचरण्यास कठीण आहे. यास्तव दुर्बलांना दुःसाध्य अशा या गृहस्थाश्रमाचा तू अंगीकार कर. ”

गृहस्थाश्रमाची ही महती सर्वांनाच मान्य आहे. निवृत्तिवादी लोकसुद्धा याला विरोध करू शकत नाहीत. पण त्यांचे म्हणणे असे असते की, इहलोकीचे सर्व व्यवहार व्यवस्थित चालून समाज सुस्थितीत राहावा, तो ऐश्वर्यसंपन्न व्हावा यासाठी गृहस्थाश्रम हा अवश्य हे खरे. पण ही कर्तव्ये मनुष्याने पार पाडल्यानंतर मोक्षासाठी त्याने संन्यास घेणेच अवश्य आहे. महाभारतात काही मुनींनी या तऱ्हेचे मतही दिलेले आहे. पण ते काही मुख्य भारतीय तत्त्वज्ञान नव्हे. श्रीकृष्ण, व्यास, भीष्म हे थोर भारतीय पुरुष याचा पुरस्कार करीत नाहीत. श्रीकृष्णांनी तर मोक्षासाठी संन्यासधर्माची मुळीच जरूर नाही असे स्पष्ट मत दिले आहे. भगवद्गीतेचा मथितार्थ असाच आहे हे गीतारहस्यात स्पष्ट झालेलेच आहे, पण त्याशिवाय अन्य ठिकाणीही श्रीकृष्णांनी आपले हे मत निःसंदिग्धपणे मांडलेले आढळते.

ते म्हणतात, ‘कोणाचा द्रोह न करिता पवित्र राहून शुद्ध अशा स्थली वेदाध्ययन करीत कुटुंबातच राहावे’ अशी या कामी शास्त्राज्ञा स्पष्ट आहे. तरी ज्ञानी ब्राह्मणांतही याविषयी निरनिराळी मते रूढ आहेत. कोणी म्हणतात कर्मानेच परलोकप्राप्ती होते, कोणी म्हणतात कर्मत्यागपूर्वक ज्ञानानेच होते. असे आहे तरी ही गोष्ट कोणालाही कबूल करणे भागच आहे की, विद्वान झाला तरी भक्ष्यभोज्य पदार्थ खाल्ल्यावाचून त्याची काही तृप्ती होत नाही. आणि ब्रह्मवेत्ते संन्यासी झाले तरी त्यांना गृहस्थाकडे भोजन शास्त्रानेच विहित आहे. तेव्हा कर्म आणि संन्यास हे दोन्ही जरी

विहित असले तरी कर्माधार जो गृहस्थाश्रम तोच संन्यासापेक्षा श्रेष्ठ आहे. कारण संन्यासादि अन्य आश्रमात साधणारे जे ज्ञान ते गृहस्थाश्रमातही साध्य होते हे जनकादिकांच्या उदाहरणारून स्पष्ट होते. परंतु गृहस्थाश्रमात साधणाऱ्या स्वतःचे, पितरांचे व अतिथींचे पोषण या गोष्टी संन्यास, ब्रह्मचर्य या आश्रमांत साध्य होत नाहीत. अतएव कर्म व ज्ञान या उभयतांचा साधक जो गृहस्थाश्रम तोच श्रेष्ठ आहे हे सिद्ध आहे.' —( उद्योग २९ ).

## प्रजापालन हाच मोक्ष

गृहस्थाश्रम हाच सर्व आश्रमात श्रेष्ठ असून मोक्षासाठीही संन्यासधर्माची जरूर नाही असे वरीलप्रमाणेच इतर ठिकाणीही बरेच वेळा सांगण्यात आलेले आहे. भीष्म युधिष्ठिराला सांगतात, 'हे राजा सर्व आश्रमांमध्ये गृहस्थाश्रमाचेच धर्मसिद्धत्व अत्यंत उज्ज्वल असून तो अत्यंत पवित्र आहे असे म्हटलेले आहे. आम्हीही त्याच धर्माचे सेवन करीत आहो. हे नरश्रेष्ठा अंतःकरणाचा निरोध करून अत्यंत प्रसन्नचित्ताने जो राजा प्रजापालनामध्ये मग्न होऊन राहतो त्याला वेदाध्ययननिष्ठ व सत्कर्म करणारे असे जे ब्राह्मण त्यांच्या धर्माची प्राप्ती होते. सर्व प्राण्यांचे पालन व स्वराष्ट्ररक्षण यांच्या योगाने राजाला संन्यासाश्रमाच्या फलाची प्राप्ती होते. प्राणांचे केवल द्यूतच असा जो संग्राम त्यामध्ये एक स्वतःचे रक्षण किंवा मृत्यू या दोनच गोष्टी घडावयाच्या असा ज्या राजाचा निश्चय असतो त्याला संन्यासाश्रमाचे फल मिळते.–( शांति ६६ ) संग्राम हाच क्षत्रियांचा धर्म होय. शत्रुनाशावांचून श्रेष्ठ असे दुसरे त्याचे कोणतेही कर्तव्य नाही. दान, अध्ययन आणि यज्ञ हे क्षत्रियांनी संपादन केलेल्या संपत्तीच्या रक्षणाचे उपाय आहेत.

राजाने सर्व प्रजांना आपापल्या धर्मांप्रमाणे वागावयास लावून धर्मांच्याच योगाने शांतिसंबंधीची सर्व कर्मे करावी. प्रजेचे पालन केल्यानेच राजाच्या इतिकर्तव्याची परिसमाप्ती होते. मग तो दुसरे काही करो वा न करो.'—( शांति ६० ).

किं तस्य तपसा राज्ञः किं च तस्याध्वरैरपि
सुपालितप्रजो यः स्यात् सर्व धर्मविदेव सः ।

—शां. ६९।७३.

जो राजा प्रजेचे उत्तम पालन करतो तो सर्व धर्म जाणणाराच होय. अशा राजाला तपाची जरूर काय आणि यज्ञाची तरी त्याला गरज काय?

वरील विवेचनावरून क्षत्रियांनाच फक्त संन्यास अनवश्य आहे पण ब्राह्मणांना मात्र त्यावाचून गती नाही, मोक्षप्राप्तीसाठी त्यांनी संन्यास घेणे अवश्य आहे, असे भारतीयांचे मत आहे, असा गैरसमज होण्याचा संभव आहे. पण तो खरा नाही. संन्यास अगदी अवश्यच आहे, त्यावाचून मोक्ष मिळणारच नाही असा दण्डक कोणाच्याच बाबतीत नाही. शुकाला ब्राह्मणधर्मांचे स्वरूप कथन करताना व्यास म्हणतात—

आचार्येणाभ्यनुज्ञातश्चतुर्णामेकमाश्रमम्
आविमोक्षात् शरीरस्य सोऽवतिष्ठेद् यथाविधि ॥

—शां. २३४.

( गुरुकडून ज्ञान संपादन झाल्यावर ) गुरूची अनुज्ञा घेऊन चार आश्रमांपैकी कोणत्याही एकाचा स्वीकार करून त्याचे आमरण यथाशास्त्र आचरण करीत राहावे.

येथे ब्राह्मणाने संन्यासच घ्यावा असे सांगितलेले नाही. गृहस्थाश्रमही तितकाच योग्य आहे आणि ब्राह्मणाने आमरण गृहस्थाश्रमात

राहिलेले चालेल असेही व्यास सांगत आहेत. पितामह भीष्मांनी एके ठिकाणी हेच सांगितले आहे. ब्राह्मणाने संन्यासाश्रमात कसे वागावे हे सांगितल्यानंतर ते म्हणाले, ' तसेच, वेदांचे अध्ययन केल्यानंतर जो ब्राह्मण ऋषींच्या धर्माने युक्त असणाऱ्या गृहस्थाश्रमरूपी कठीण धर्माचे एकाग्र अंत:करणाने आचरण करतो त्यालाही त्या आश्रमास विहित असलेली कृत्ये करून व प्रजा निर्माण करून सुखोपभोग घेतल्यानंतर ब्रह्मपदाची प्राप्ती होते. '– ( शांति अ. ६१ ). त्याच ओघात पुढे बोलताना भीष्म म्हणाले, ' याप्रमाणे जो यज्ञशील ब्राह्मण यथाविधी गृहस्थाश्रमाचा अंगीकार करून राहतो व गृहस्थाश्रमास योग्य व अत्यंत पवित्र अशीच उपजीविका संपादन करतो त्याला स्वर्गलोकी अत्यंत पवित्र अशा फलाची प्राप्ती होते. त्याने ज्या इच्छा मनात धरलेल्या असतात त्यांचा नाश होत नाही व म्हणूनच देहत्यागानंतर त्या सर्व ठिकाणी नेत्र, शरीर व मुख यांनी युक्त असणारे असे स्वरूप धारण करून अनंततत्वप्राप्तीच्या इच्छेने त्याच्याकडे येतात. अर्थातच मोक्षाची इच्छा असल्यास तो मुक्तही होतो.'–(शां. ६१).

मोक्ष हे जरी प्रत्येकाचे अंतिम साध्य आहे तरी त्यासाठी संन्यास अवश्यच आहे असे नाही. आमरण गृहस्थाश्रमात राहूनही मोक्षप्राप्ती करून घेता येते असे भारतीय तत्त्ववेत्त्यांचे मत होते, असे वरील वचनांवरून स्पष्ट दिसून येते.

यानंतर, काही ठिकाणी संन्यासाचेही गुणवर्णन केलेले आढळते, तेही आपण तपासून पाहिले पाहिजे. ते पाहता पहिली गोष्ट अशी दिसून येते की, संन्यास हा विहित आहे असे काही ठिकाणी जे सांगितलेले आहे ते फक्त ब्राह्मणांपुरते आहे. इतर वर्णीयांना संन्यासाची अनुज्ञा अगदी क्वचितच दिलेली आढळेल.

कौरव-पांडवांचे युद्ध झाल्यानंतर धर्मराजाला सर्व राज्य प्राप्त झाले होते. पण त्याचे मन एकाएकी फिरले. युद्धामध्ये आपल्या हातून फार हत्या झाली या कल्पनेने त्याला अत्यंत उद्वेग वाटू लागला. व आपण संन्यास घ्यावा असे त्यास वाटू लागले. तो म्हणाला, 'ज्या अर्थी संन्यास करणाऱ्या मनुष्यास जन्ममरणाची प्राप्ती होत नाही असे श्रुतिवाक्य आहे त्या अर्थी अंतःकरणाचा निश्चय करणारा तो संन्यासी योगमार्गाची प्राप्ती होऊन ब्रह्मस्वरूपी बनून जातो हे खास. म्हणूनच अर्जुना, आता शीतोष्णादिक द्वंद्वांचा त्याग करून ध्याननिष्ठ होऊन ज्ञानप्राप्तीच्या इच्छेने मी तुम्हा सर्वांचा निरोप घेऊन वनात जाणार.'

धर्मराजाचे हे बोलणे ऐकून भीम, अर्जुन, द्रौपदी यांना फार विस्मय वाटला व संतापही आला. शेवटी संन्यासच घ्यावयाचा होता तर मग हा युद्धाचा खटाटोप कशाला केला, असे ते सर्व त्याला म्हणू लागले व त्याची निर्भर्त्सना करू लागले. भीम म्हणाला, 'राजा, तुजवाचून दुसऱ्या कोणाही क्षात्रधर्माचरण करणाऱ्या मनुष्याच्या ठिकाणी क्षमा, दया, ही वास करीत नाहीत. जर तुझा असा विचार आहे हे आम्हांस पूर्वीच कळले असते तर आम्ही शस्त्रग्रहणही केले नसते आणि शरीरपतन होईपर्यंत भिक्षाच मागून राहिलो असतो. राजा, 'हा ज्येष्ठ आहे' असा विचार करत आम्ही तुज मंदबुद्धीच्या अनुरोधाने वागत होतो, याबद्दल आम्हीच निंदेस पात्र आहो. हे नरश्रेष्ठा, मी सांगतो याचा आता विचार कर. अरे, वार्धक्याने जर्जर होऊन गेलेल्या अथवा शत्रूंनी पीडित करून सोडलेल्या मनुष्याने आपत्काली संन्यास घ्यावा असे शास्त्र आहे. म्हणूनच बुद्धिमान लोक या संन्यासाचे नाव सुद्धा घेत नाहीत. इतकेच नव्हे तर सूक्ष्मदृष्टी लोक क्षत्रियाने

संन्यास घेणे म्हणजे धर्माचा अतिक्रम आहे असे मानतात. अरे, जर संन्यासाच्या योगाने एखाद्या राजाला सिद्धी मिळाली असती तर पर्वतांना व वृक्षांनाही सत्वर सिद्धी मिळाली असती. कारण हे देखील नेहमी संन्यासी, निरुपद्रवी व निरंतर ब्रह्मचर्याने वागणारे असेच आहेत.' —( शांति. अ. १० ).

भीमाप्रमाणेच द्रौपदीही युधिष्ठिरावर फार चिडून गेली होती. ती म्हणाली, " हे नरश्रेष्ठा, वनवासात असताना 'वनवास संपल्यावर आपण दुर्योधनाचा वध करू व पृथ्वीचा उपभोग घेऊ.' असे तू म्हणाला होतास. आणि आज आता त्याच्या उलट वागून आमच्या अंतःकरणावर काय म्हणून प्रहार करीत आहेस? हे राजा, सर्व प्राण्यांशी मित्रत्वाने वागणे, आणि दान, अध्ययन व तप करणे हा ब्राह्मणांचा धर्म असेल कदाचित्, पण तो क्षत्रियांचा धर्म नव्हे. दुष्टांना हाकून लावणे, सज्जनांचे पालन करणे व संग्रामातून पलायन न करणे हा क्षत्रियांचा धर्म होय. हे नृपश्रेष्ठा, तुझ्या ह्या वेडेपणामुळे सर्व पांडवही वेडे बनून गेले आहेत. कारण हे जर वेडे नसते तर इतर नास्तिकांसहवर्तमान त्यांनी तुला बद्ध करून स्वतःच पृथ्वीचे पालन केले असते." —( शांति. १४).

काही वेळाने इतर ऋषींनी युधिष्ठिराला उपदेश केल्यावर अर्जुन त्याला म्हणाला, 'हे नरश्रेष्ठा, तू क्षत्रियांचा धर्म लक्षात आण. तप आणि त्याग हे ब्राह्मणांच्या परलोकप्राप्तीस कारणीभूत होणारे धर्म आहेत. क्षत्रियांचा संग्रामामध्ये मरण हाच धर्म होय. यास्तव हे भरतकुलश्रेष्ठा, सर्व धर्म जाणणारा, धर्मात्मा, बुद्धिमान, चतुर आणि लोकांमध्ये निकृष्ट कोणते व उत्कृष्ट कोणते हे अवगत असलेला अशा प्रकारचा तू राजा संतापजन्य शोक सोडून दे व स्वकर्मे करण्याविषयी उद्युक्त हो.' —( शां. २२ ).

याप्रमाणे अर्जुनाने विनविले तरी त्या कुरुकुलोत्पन्न कुंतीपुत्र युधिष्ठिराने उत्तर दिले नाही; तेव्हा व्यासमुनी त्याला म्हणाले, 'हे सौम्या युधिष्ठिरा, अर्जुनाचे हे भाषण अगदी खरे आहे. शास्त्रामध्ये दृष्टिगोचर होणारा जो श्रेष्ठ धर्म तो गृहस्थाश्रमाचेच अवलंबन करून राहिलेला आहे. यास्तव हे धर्मज्ञा, तू शास्त्रात सांगितल्याप्रमाणे यथाविधी स्वधर्माचे आचरण कर. हे महाराजा, तप, भिक्षा, ध्यान एकांतवास हे व्यापार ब्राह्मणांनाच फलदायक होतात. क्षत्रियाचे हे व्यापार नव्हत. दण्डधारण हाच क्षत्रियाचा श्रेष्ठधर्म होय.' —( शां. २३ ).

क्षत्रियाला संन्यास विहित नाही, त्याने राज्यपालनच केले पाहिजे, त्यानेंच त्याला मोक्षप्राप्ती होते असे भीम, अर्जुन, द्रौपदी यांनी युधिष्ठिरास अगदी निक्षून सांगितलेले आहे व त्यावर शेवटी व्यासांनी आपल्या संमतीचा शिक्का दिलेला आहे.

संन्यास हा भारतीय तत्त्ववेत्त्यांना कितपत इष्ट आहे हे यावरून कळून येईल. प्रथमतः मोक्षासाठी तो अवश्य नाही, गृहस्थाश्रमात राहूनही मोक्ष मिळतो असे त्यांनी सांगितले. नंतर विकल्पाने त्यांनी दिलेली सवलत हीसुद्धा फक्त ब्राह्मणांना आहे असे सांगितले. आणि यापुढे जाऊन संन्यासधर्माची ब्राह्मणांतही फाजिल प्रवृत्ती झाली तर समाज उत्सन्न होईल हे जाणून त्यांनी संन्यास हा फक्त म्हातारपणीच घ्यावा असा दण्डक घालून दिलेला आहे.

व्यास म्हणतात, 'जेव्हा गृहस्थाश्रमी पुरुषाला, आपले शरीर वृद्धपणामुळे पांढरे होऊन सुरकुतलेले आहे असे दिसून येईल व आपल्या मुलाला मूल झाल्याचे तो अवलोकन करील तेव्हाच त्याने वनाचा आश्रय करावा.' —( शांति अ. २४४ ). पितामह भीष्मांनीहि हाच अभिप्राय व्यक्त केला आहे. 'बुद्धिमान अशा

गृहस्थाश्रमी ब्राह्मणाने वेदाध्ययन आणि षट्कर्माचरण ही करावी व गृहस्थाश्रमोचित सर्व कर्मे केल्यानंतर त्याने वानप्रस्थाश्रमाचा स्वीकार करणे प्रशस्त होय.' —( शां. अ. ६३ ).

महाभारतात क्वचित गृहस्थाश्रम व वानप्रस्थाश्रम हे टाळून ब्रह्मचर्यातून एकदम संन्यासाश्रमात जावयास ब्राह्मणांना अनुज्ञा दिलेली आहे. (शांति ६१). त्याचप्रमाणे क्षत्रिय, वैश्य व शूद्र यांनाही संन्यासाश्रमाची अनुज्ञा दिलेली आहे. ( शांति ६३ ) पण एकंदर विवेचनाचा ओघ पाहिला तर पुढीलप्रमाणे भारतीय तत्त्ववेत्त्यांचे मत आहे असे स्वच्छ दिसून येते.

गृहस्थाश्रम व संन्यास हे दोन्ही आश्रम मोक्षप्राप्तीस सारखेच योग्य आहेत. संन्यास अवश्य आहे असे मुळीच नाही. उलट गृहस्थाश्रमात राहिल्याने राष्ट्राची सेवा करता येते व त्यामुळे समाजाचे हित होते. म्हणून केवळ मोक्ष देण्यास तो समर्थ आहे म्हणून संन्यासाकडे कोणाचीच प्रवृत्ति नसलेली बरी. त्यातूनही संन्यास अवश्य वाटलाच तर ब्राह्मणांनी फक्त त्याचा स्वीकार करावा. पण तोही प्रपंचाची सर्व कार्ये यथासांग झाल्यावर, गृहस्थाश्रमाची सर्व कर्तव्ये पार पाडल्यावर, वृद्धापकाळी करावा हेच युक्त आहे. आणि संन्यासासंबंधी हे धोरण ठेवले तरच राष्ट्राचा उत्कर्ष होईल. परिपक्व बुद्धीच्या, कर्तृत्वशील अशा पुरुषांपैकी अनेकांची जर संन्यासाकडे प्रवृत्ती होऊ लागली तर राष्ट्राचा नाश होईल.

महाभारताला राष्ट्रीय ग्रंथ का म्हणतात ते वरील विवेचनावरून ध्यानात येईल. राष्ट्राचा उत्कर्ष हाच मुख्य धर्म होय, असे त्यात मोठ्या आग्रहाने प्रतिपादन केलेले आहे. धन, बल, क्षात्रधर्म, संसारप्रेम यांवाचून राष्ट्र जगणे अशक्य आहे हे जाणून या तत्त्ववेत्त्यांनी त्यांचा पुरस्कार करून त्यांचे महत्त्व काय ते मोठ्या

विस्ताराने वर्णिलेले आहे. आता शेवटच्या भागात प्रवृत्तिधर्माला कोणत्या प्रकारची मनोवृत्ती त्यांच्या मते अवश्य आहेत यासंबंधी त्यांनी जे विवेचन केले आहे ते सांगून हे प्रवृत्तिधर्मप्रकरण संपवितो.

## व्यक्तिधर्म व राष्ट्रधर्म

गृहनीती व परनीती असे नीतीचे दोन भाग करून भिन्न क्षेत्रात भिन्न धर्म कसे ग्राह्य असतात ते मागील प्रकरणी सांगितलेच आहे. तोच विचार येथेही केला पाहिजे. ज्यांना केवळ मोक्षाचीच इच्छा आहे, राष्ट्ररक्षणाची काळजी जे वाहत नाहीत किंवा जे ज्ञानवृद्ध, तपोवृद्ध होऊन केवळ आत्मज्ञानाच्याच उपासनेत आहेत, किंवा विशिष्ट प्रकारच्या वृत्तीमुळे जे काही कारणाने जगाच्या प्रपंचाबद्दल उदासीन आहेत त्यांचा धर्म एक प्रकारचा होईल. पण ज्यांना पराक्रमाची आकांक्षा आहे, राष्ट्र वैभवास चढविण्याचा उद्योग ज्यांनी आरंभिला आहे, ज्यांच्या दुर्दम्य शक्ती त्यांना स्वस्थ बसू देत नाहीत, जगताच्या उलाढाली पाहून, त्यात उडी टाकून वैभवाच्या शिखरावर आपण आरोहण करावे अशी ज्यांना प्रेरणा होत असते त्यांचा धर्म निराळा. निर्मत्सर वृत्ती, संतोष, भोळी वृत्ती, षड्रिपूंचा तिटकारा हा उपदेश पहिल्या प्रकारच्या लोकांना युक्त आहे. पण विजिगीषू, जयिष्णू परंतप वीरांना तो अगदी त्याज्य होय. म्हणून महाभारतात असंतोष, संताप, साहस, सावधानता, प्रतिकारबुद्धी यांची ठायी ठायी प्रशंसा केलेली आढळते.

क्षत्रियस्य हि धर्मोऽयं हन्यात् हन्येत वा पुनः ॥

—७।१९७।३८

एकतर मारावे नाही तर मरून जावे हाच क्षत्रियधर्म होय; 'परं-

विषहते यस्मात् तस्मात् पुरुष उच्यते ' ॥ ( ५।१३३।३५ ) शत्रूचा प्रतिकार करतो म्हणून पुरुष म्हणतात; ' न निर्मन्युः क्षत्रियोऽस्ति । लोके निर्वचनं स्मृतम् ' – ' ज्याला अपमानाची चीड नाही तो क्षत्रियच नव्हे. ' ( वन, २७, ३७ ); नामर्षं कुरुते यस्तु पुरुषः सोऽधमः स्मृतः ॥ ( २, ५०, १७ ); ज्या पुरुषाला ( दुसऱ्याने अपमान केला तरी ) क्रोध येत नाही, तो अधम समजावा; संतोषो वै श्रियं हन्ति ( २, ४९, १४ ) असंतोषः श्रियो मूलम् ॥ असंतोष असेल तर वैभव प्राप्त होते, संतोषामुळे त्याचा नाश होतो. —( सभा. ५५।११ ).

अशा तऱ्हेची जयिष्णू वृत्तीला प्रोत्साहक अशी शेकडो सुभाषिते महाभारतात विखुरलेली आहेत. सावधनाता, दक्षता, साहसी वृत्ती यांचीही महाभारतांत प्रशंसा अनेक ठिकाणी केली आहे.

न हि प्रमादात् परमस्ति कश्चित् वधो नराणांमिह जीव लोके
प्रमत्तमर्था हि नरं समन्तात् त्यजन्त्यनर्थाश्च समाविशन्ति ।
—१०, १०, १९

या लोकी मनुष्यांना बेसावधपणापेक्षा अधिक घातक असे काहीच नाही. बेसावध राहणाऱ्या मनुष्याला सर्व प्रकारची संपत्ती सोडून जाते, आणि त्याच्यावर संकटे मात्र कोसळतात.

भोळ्या भावाला, देवावर भार घालून स्वस्थ बसण्याला भक्तिमार्गात कितीही किंमत असली तरी संसारात त्याला मुळीच किंमत नाही, इतकेंच नव्हे तर तो घातुक ठरतो असे येथे सांगितले आहे. माणसांच्या नेहमी चुका होतात त्या याच. एका प्रांतात सांगितलेले वचन ते दुसऱ्या प्रांतात आणून सर्वनाश करून घेतात.

नासम्यक्कृतकारी स्यात् अप्रमत्तः सदा भवेत् ।
कण्टको ह्यपि दुश्छिन्नो विकारं कुरुते चिरम् ।
—( शां. १४०, ६० ).

निष्काळजीपणाने काही करू नये, नेहमी सावध असावे. कारण एकादा कांटा सुद्धा जर अयोग्य रीतीने तुटला तर तो पुष्कळ काळपर्यंत विकार उत्पन्न करतो.

साहसी वृत्तीचा पुढील उपदेश प्रसिद्धच आहे.

न संशयमनारुह्य नरो भद्राणि पश्यति
सशयं पुनरारुह्य यदि जीवति पश्यति ।
—( शां. ४०, ३४ ).

साहस करून जीव संकटात घातल्यावाचून ऐश्वर्य मिळत नाही. आणि साहसात उडी टाकूनही मृत्यू आला नाही— कारण तोच संभव फार—तरच हे ऐश्वर्य दिसावयाचे.

ही वचने पाहिल्यावर भारतीय तत्त्वज्ञानाची चांगली कल्पना येते. राष्ट्राचा उत्कर्ष, वैभव, ऐश्वर्य, साम्राज्य या भव्य आकांक्षा त्या पुरुषांच्या चित्तांत होत्या. आपल्या लोकांनी यांसाठी अहोरात्र प्रयत्न करावे अशी त्यांची इच्छा होती. म्हणून जयिष्णू वृत्तीला पोषक अशीच अमृतवचने त्यांच्या मुखांतून नित्य येत असत. षड्रिपूंची निंदा करणे त्यांना मान्य नव्हते. संताप, क्रोध, द्रोह, ऐश्वर्याचा लोभ यांवाचून माणसाच्या हातून पराक्रम होणे शक्य नाही हे ते जाणून होते. साहसी वृत्ती, नित्य मरणमारणाच्या संग्रामाची सिद्धता यांवाचून ऐश्वर्य मिळणे अशक्य आहे हे त्यांना पक्के ठाऊक होते. बल, क्रौर्य, भेद यांवाचून शत्रू नमत नाही असा त्यांचा अनुभव होता. हा आपला सर्व अनुभव त्यांनी

भारतीयांच्या कल्याणासाठी या राष्ट्रीय ग्रंथात ग्रथित करून ठेवला आहे. या सूर्यप्रकाशाच्या साह्याने आपण आपला मार्ग आखला तर भारताचे प्राचीन काळचे वैभव आजही प्राप्त करून घेणे आपल्याला फार कठिण नाही.

## राष्ट्रधर्म व विश्वधर्म

महाभारतात सांगितलेला धर्म हा व्यवहारधर्म आहे, राष्ट्रधर्म आहे. ते प्रपंचविज्ञान आहे. राष्ट्रीय प्रपंच यशस्वी करावयाचा असेल तर त्याचाच अवलंब करणे अवश्य आहे. विश्वधर्म, मानवताधर्म हा याहून अगदी निराळा. त्याची तत्त्वे राष्ट्रीय प्रपंचात शिरली तर समाजाचा अधःपात होतो. नाश होतो. संतांच्या काळात हेच झाले, शिव-समर्थांनी त्यातून महाराष्ट्राला आणि पर्यायाने भारताला सोडविले. त्यानंतर ब्रिटिशांच्या राज्यात जो स्वातंत्र्य-संग्राम झाला त्यात प्रारंभी धर्म हे साधन आहे, साध्य नव्हे, गृहनीती व परनीती या भिन्न आहेत हा विवेक जागरूक होता. पण महात्माजींच्या काळात आपल्या राजकारणात, आपल्या राष्ट्रीय प्रपंचात पुन्हा विश्वधर्म, मानवताधर्म यांतील तत्त्वे घुसली. पण महात्माजींनी पुढे स्वतःच त्यांना मुरड घातली आणि वल्लभभाई, सुभाषचंद्र, यांनी तर त्या तत्त्वांना क्षणमात्रही थारा दिला नाही. तरीही फाळणीच्या रूपाने त्या सत्यअहिंसेच्या व्यापक अराष्ट्रीय धर्माची किंमत आपल्याला द्यावीच लागली. आज स्वातंत्र्यानंतरच्या काळात आपल्या राष्ट्रीय प्रपंचावर पुन्हा विश्वधर्माची काळी छाया घनदाट पडू पहात आहे. पंचशील, जगत्कल्याण, विश्वशांती यांवरील पंडित जवाहरलालजी यांची स्वहितनिरपेक्ष निष्ठा, चीन-पाकिस्तान यांच्या नेत्यांच्या सद्भावने-

वरील त्यांची श्रद्धा, त्यांच्याविषयी भारतीयांच्या चित्तात अणुमात्र संताप येऊ न देण्याविषयीची त्यांची दक्षता, दरवेळी शत्रुपक्षालाच झुकते माप देण्याची त्यांची वृत्ती, लष्करी बळ आम्ही कधीही वापरणार नाही अशी शत्रूला त्यांनी दिलेली अभिवचने, लष्करी कराराने मित्रराष्ट्रे जोडून ठेवण्याला त्यांचा विरोध, ही सर्व विश्व-धर्माची लक्षणे आहेत. त्यांनी विश्वाचे कल्याण किती होईल याविषयी शंका आहे. पण भारताचे अकल्याण होईल, होत आहे याविषयी शंका नाही. अशा वेळी महाभारतातील राष्ट्रधर्माच्या तत्त्वांचा आपण अभ्यास केला व त्याचा अवलंब केला तर विश्वधर्माच्या आपत्तीतून आपला देश मुक्त होईल अशी आशा करण्यास बराच आधार निर्माण होईल असे वाटते.

● ● ●

कॉन्टिनेन्टल प्रकाशन

## आमची काही आगामी प्रकाशने

महाराष्ट्र संस्कृती
डॉ. पु. ग. सहस्रबुद्धे

मराठी नाटकातील विनोद
डॉ. बा. वा. दातार

नाटककार खाडिलकर
डॉ. वि. म. कुलकर्णी